नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक ३६४ * * अकोला * रविवार, दिनांक २९ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## देशात प्रथमच मोबाइल ॲपद्वारे मतदान

■ वृत्तसंस्था, पटना, दि. २८ :
देशात पहिल्यांदाच मोबाइल ॲपद्वारे मतदान होत आहे. बिहारमधील २६ जिल्ह्यांमधील ४२ नगरपालिकांमध्ये पोटनिवडणुका होत आहेत. पायलट प्रोजेक्ट म्हणून सहा नगरपालिकांमध्ये ई-व्होटिंग केले जात आहे.
मतदान केंद्रांवर पोहोचू न शकणाऱ्यांना मतदानाची सोय व्हावी यासाठी हा प्रकल्प करण्यात आला आहे. मतदानासाठी दोन अ?प्स लॉंच करण्यात आले आहेत. ही सुविधा मिळविण्यासाठी आगाऊ नोंदणी करावी लागत होती. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, ५० हजारांहून अधिक लोकांनी ई-मतदानासाठी नोंदणी केली होती. सकाळी ७ ते दुपारी १ वाजेपर्यंत ई-मतदान झाले.

## थोडक्यात

### भारतासोबत लवकरच मोठा व्यापार करार

■ वॉशिंग्टनः अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की अमेरिका आणि चीनमध्ये व्यापार करार झाला आहे. व्हाइट हाऊसमध्ये ट्रम्प यांनी दावा केला की लवकरच भारतासोबतही एक मोठा करार होईल. ते म्हणाले, सर्व देश अमेरिकेशी व्यवहार करू इच्छितात, परंतु अमेरिका फक्त निवडक देशांशी व्यापार करार करेल. उर्वरित देशांना २५% किंवा ३५% कर भरावा लागेल. तथापि, ट्रम्प यांनी चीनसोबतच्या व्यापार करारातील तरतुदींबद्दल सविस्तर माहिती दिली नाही.



### खैबर प्रांतात आत्मघातकी हल्ला १३ सैनिक ठार, २९ जखमी

**इस्लामाबाद :** शनिवारी पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात एका आत्मघातकी हल्लेखोराने लष्करी ताफ्याला लक्ष्य केले. या हल्ल्यात १३ सैनिक ठार झाले. तर १० सैनिक आणि १९ नागरिक जखमी झाले. वृत्तसंस्था एएफपीच्या वृत्तानुसार, हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेल्या वाहनाची लष्करी ताफ्याला धडक दिली.
खैबर पख्तूनख्वा येथे तैनात असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याने एएफपीला सांगितले की, स्फोट इतका शक्तिशाली होता की दोन घरांच्या छतांवर पडून सहा मुले जखमी झाली. या बॉम्बस्फोटाची जबाबदारी पाकिस्तान-तालिबान (टीटीपी) शी संबंधित हाफिज गुल बहादूर गटाने घेतली आहे. खैबर प्रांत हा टीटीपीचा बालेकिल्ला मानला जातो.

### इराणी अधिकाऱ्यांचे अंत्यसंस्कार

**तेहरान :** इस्रायलशी १२ दिवसांच्या युद्धात मारल्या गेलेल्या ६० इराणी अधिकाऱ्यांचे अंत्यसंस्कार शनिवारी करण्यात आले. यामध्ये ३० लष्करी कमांडर आणि ११ अणुशास्त्रज्ञांचा समावेश आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी तेहरानमध्ये हजारो लोक जमले होते.
अधिकाऱ्यांचे मृतदेह वाहनांवर इराणी ध्वजांनी गुंडाळलेल्या शवपेट्यांमध्ये ठेवण्यात आले होते. शवपेट्यांसोबत अधिकाऱ्यांचे फोटोही ठेवण्यात आले. यावेळी इस्त्राईलाचा निषेध केला गेला.

# हिंदीच्या विरोधामागे राजकारण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :
पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना तृतीय भाषा म्हणून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून काढण्यात येत असलेल्या मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे.
ही केवळ राजकीय भूमिका आहे असे मी म्हणणार नाही. कोणाच्याही समोर प्रश्नचिन्ह निर्माण करणार नाही. मात्र महानगरपालिकेच्या निवडणुका नसत्या तर कदाचित इतका वेगळ्या पद्धतीने विरोध झाला नसता. असा दावा फडणवीस यांनी केला आहे.
मनसे प्रमुख राज ठाकरे हे माझे चांगले मित्र आहेत. म्हणून काय झाले? मात्र त्यांच्या काही भूमिका आहेत. तर माझ्या काही भूमिका आहेत. सर्वांच्या सारख्या भूमिका असत्या तर सर्व एका पक्षात राहिले असते. त्यामुळे भूमिका वेगळ्या असू शकतात. मात्र उद्धव ठाकरे यांनी



जर एखादा रिपोर्ट स्वीकारला आणि आता त्याच्या विरोधात ते बोलताय, तर याचा अर्थ केवळ राजकीयच आहे. या राज्यात माशेलकर, मुणगेकर, सुखदेव थोरात यांच्यासारख्या लोकांवर प्रश्नचिन्ह लावता येईल का? असा प्रतिप्रश्न फडणवीस यांनी विचारला आहे.
देवेंद्र फडणवीस यांना राजकारण करायचय, त्यामुळे देवेंद्र फडणवीस काहीतरी करतोय. मात्र या लोकांना देखील राजकारण करायचे आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अशा लोकांनी जर एखादा रिपोर्ट दिला आणि तो तुम्ही स्वीकारला आहे. आता तुम्ही त्यालाच विरोध करता? याचा अर्थ मराठीचा प्रेम नाही तर राजकारण असल्याचा स्पष्ट आरोप देखील फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.

**परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का चालत नाही?**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयामागचे कारणही सांगितले. यामागे एक सायंटिफिक प्रोसेस आहे. या प्रोसेस मध्ये आपले विद्यार्थी पुढे कसे गेले पाहिजे, या दृष्टिकोनातून तयार केलेले त्रिभाषा सूत्र आहे. ते तयार करत असताना विद्यार्थ्यांची बुद्धी सर्वात जास्त कधी चालते, भाषा शिकण्याची शक्यता कधी अधिक असते. या संदर्भातले रिसर्च करून त्या कालावधीमध्ये त्यांना भाषा शिकवल्या तर ते अधिकच्या भाषा शिकू शकतात, अशा प्रकारचा मुद्दा समोर आला.
हा आमच्यासाठी प्रतिष्ठेचा विषय नाही. कुठलीही भाषा शिका, हिंदीच शिकली पाहिजे असे नाही. हे आम्ही एका मिनिटात सांगितले. हिंदी सक्तीला यांचा विरोध नाही तर यांचा विरोध केवळ हिंदीला आहे. भारतामध्ये तुम्हाला इंग्रजी चालते, तीला तुमचा विरोध नाही. परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का चालत नाही? असा प्रश्न त्यांनी केला.

## प्रधानमंत्री मोदींनी साधला अंतराळवीर शुभांशू शुक्लाशी संवाद



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी ॲक्सियम मिशन ४ वर असलेले भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. पंतप्रधान कार्यालयाने ५.४९ वाजता या संभाषणाचा व्हिडिओ प्रसिद्ध केला. दोघांमध्ये १८.२५ सेकंद संभाषण झाले.
पंतप्रधान मोदींनी शुभांशू शुक्ला यांना विचारले की, तुम्ही गाजर हलवा घेऊन आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेले आहात. तुम्ही तुमच्या मित्रांना जेवू घातले का? यावर शुभांशू यांनी सांगितले की हो, मी माज्या मित्रांसोबत बसून जेवलो. शुभांशू यांनी पंतप्रधान मोदींना सांगितले - अंतराळातून भारत खूप भव्य दिसतो. आपण एका दिवसात १६ सूर्योदय आणि १६ सूर्यास्त पाहतो.
भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू दोन दिवसांपूर्वी २६ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले. ४१ वर्षांनंतर अंतराळात जाणारे ते पहिले भारतीय आहेत. २५ जून रोजी दुपारी १२ वाजता ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत ते सर्व अंतराळवीरांसह आयएसएसला रवाना झाले.

**पंतप्रधान मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ब्रिक्स देशांच्या दौऱ्यावर आहेत. ते आफ्रिकेतही जातील. मोदी २ ते ९ जुलै दरम्यान घाना, त्रिनिदाद, टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामीबिया या देशांच्या दौऱ्यावर आहेत. आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देशांसोबत भारताचे दृढसंबंध आहेत. मोदींच्या या दौऱ्याने ते वृद्धींगत होतील. या दौऱ्यादरम्यान ते ब्राझील येथे १७ व्या ब्रिक्स शिखर संमेलनात सहभागी होतील.
पंतप्रधान मोदी २ जुलै रोजी पहिल्यांदा घाना या देशाला भेट देतील. गेल्या तीन दशकात पहिल्यांदा एखादा भारतीय पंतप्रधान या देशाच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान ते राष्ट्रपती नाना अकुफो-आडो यांची भेट घेतील. आर्थिक, ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रात भागीदारीविषयी दोन्ही देशात चर्चा होईल. या देशाशी व्यापारी करारामुळे ईकोवास आणि आफ्रिकी संघाशी भारताचे नाते मजबूत होण्याची शक्यता आहे.

## शिवसेना टोमणे सम्राटांची नाही



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २८ :
सोन्याचा चम्मच तोंडात घेऊन मी जन्माला आलो नसलो, तरी मी जनतेला सोन्याचे दिवस दाखविले आहे. शिवसेना हा मालक-नोकरांचा पक्ष नाही, तर सच्चा शिवसैनिकांचा व कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. ही शिवसेना हिंदूहृदय सम्राटांची आहे, टोमणे सम्राटांची नाही, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला.
ते भंडारा येथे बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आभार सभा भंडारा येथे रेल्वे मैदानात पार पडली. शिंदे पुढे म्हणाले, मी सीएम असताना म्हणत होतो की, मी कॉमन मॅन आहे. आता मी डीसीएम आहे. म्हणजेच डेडिकेटेड कॉमन मॅन. वाघाचे कातडे पांघरून वाघ होता येत नाही. घरी बसणाऱ्यांना जनतेने घरीच बसवले आहे. कॉमन मॅन बनण्यासाठी बाळासाहेब ठाकरेंचेच विचार लागतात. ज्याने बाळासाहेबांचे विचार पायदळी तुडवले त्यांना त्याची प्रचिती आली आहे.
यावेळी व्यासपीठीवर राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार मनिषा कायंदे, आमदार नरेंद्र भोंडेकर, माजी आमदार कोरोटे, माजी आमदार चंद्रिकापूरे, संजय कुंभलकर, डॉ. अश्विनी भोंडेकर, पद्माकर बावणकरसह शिवसेनेचे जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.
भगवा म्हणजे एक विचार आहे, भगवा म्हणजे झंझावात, भगवा म्हणजे तलवारीची धार आहे, भगवा म्हणजे जिजाऊचा आशीर्वाद आहे, हे लक्षात ठेवा. विधानसभेत जसा भगवा फडकवला तसाच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भगवा फडकवण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना केले.
या कार्यक्रमादरम्यान, जिल्ह्यातील भाजपा आणि इतर पक्षातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

## भाजपला मिळणार नवा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांची नियुक्ती होणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :
भारतीय जनता पक्षाला लवकरच नवीन प्रदेशाध्यक्ष मिळणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जागी आता प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती होणार आहे.



त्यासाठी रवींद्र चव्हाण हे ३० जून रोजी आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. त्यानंतर एक जुलै रोजी त्यांची नियुक्ती जाहीर केली जाणार आहे. वरळी डोम येथे एक जुलै रोजी सकाळी ११ 1 वाजता यासंबंधीची अधिकृत घोषणा होणार असून यावेळी भाजपचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.
राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याच्या दृष्टिकोनातून भारतीय जनता पक्षाच्या वतीने तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी महाराष्ट्र, उत्तराखंड, पश्चिम बंगाल आदी राज्यातील प्रदेशाध्यक्ष निवडीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यासाठी दोन केंद्रीय मंत्री आणि एका माजी केंद्रीय मंत्र्यांची नियुक्ती देखील करण्यात आली आहे. महाराष्ट्राची जबाबदारी किरेन रिजिजू यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

## शेतीच्या बांधावरून दोघांचा खून

### विष प्राशन करून आरोपीची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २८ :
शेतीच्या बांधाच्या वादावरून ३ जणांचा बळी गेल्याची भयंकर घटना वर्धा जिल्ह्यातील निमसडा गावात घडली आहे. या प्रकरणात आरोपीने प्रथम आपली काकू व चुलत भावाची कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या केली. त्यानंतर स्वतःही विष प्राशन करून मृत्यूला जवळ केले. या घटनेमुळे जिल्ह्यात एकच खळबळ माजली आहे.
आत्महत्या करणाऱ्या आरोपीचे नाव महेंद्र मोहिजे असे होते. त्याने साधना सुभाष मोहिजे (५५) व त्यांचा मुलगा नितीन सुभाष मोहिजे (२७) या दोघांची कुऱ्हाडीने हत्या केली. या तिघांमध्ये गत काही दिवसांपासून शेतीच्या धुऱ्याच्या वाटपावरून वाद सुरू होता. गावातील काही जमिनी ठेक्याने लावण्यावरूनही त्यांच्यातील तणाव वाढला होता. शुक्रवारी सकाळी हा वाद एवढा टोकाला गेला की, महेंद्र मोहिजेने संतापाच्या भरात नितीनी व त्याची आईवर कुऱ्हाडीने हल्ला करून त्यांना जागीच ठार केले. त्यानंतर स्वतःही विष प्राशन केले. त्यानंतर काही वेळातच त्याचाही मृत्यू झाला.
या घटनेची माहिती मिळताच अल्लीपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस अधीक्षक अनुराग जैन व अतिरिक्त पोलिस अधीक्षक राहुल चौहन हे ही तातडीने निमसडा येथे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी संपूर्ण स्थितीचा आढावा घेतला.
मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वर्धा जिल्हा रुग्णालयात पाठवले. पोलिसांनी हे हत्याकांड शेतीचा मालकीहक्क व उत्पन्नाच्या वाटणीवरून झाल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी पोलिस मृतांचे शेजारी व नातेवाईकांचे जबाब नोंदवून घेत आहेत.
दुसरीकडे, बुलढाणा जिल्ह्यातही एका तरुणाने आपल्या दोन मित्रांच्या मदतीने सख्खा भाऊ व त्याच्या पत्नीवर प्राणघातक हल्ला केला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील हतेडी बुद्रुक येथे ही घटना घडली आहे.

## काटा लगा' फेम शेफालीचा संशयास्पद स्थितीत मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :
काटा लगा गाण्यातील प्रसिद्ध मॉडेल आणि अभिनेत्री शेफाली जरीवालाचा मृत्यू अत्यंत संशयास्पद परिस्थितीत झाला आहे. रात्री ती अंधेरीतील आपल्या अपार्टमेंटमध्ये बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. तातडीने रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं.



शेफाली आपल्या तरुण आणि सुंदर दिसण्यासाठी डोस घेत होती, अशी माहिती समोर आली आहे. अंधेरीतील एका प्रसिद्ध डॉक्टरच्या सल्ल्याने गेल्या ६-७ वर्षांपासून ती हे उपचार घेत होती. त्वचा गोरी, नितळ दिसण्यासाठी हे डोस घेतले जातात, असे डॉक्टरांनी सांगितले.
विशेष म्हणजे, या डॉक्टरांनी सांगितले की, शेफाली अत्यंत फिट होती. तिच्याकडून कधीही आजाराची तक्रार झाली नव्हती. मात्र, हे औषध शरीरावर काय परिणाम करू शकते, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## भारत एकसंध राहण्यात राज्यघटनेचे मोठे योगदान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :
भारताच्या शेजारी असलेल्या पाकिस्तान, श्रीलंका, बांग्लादेश या देशांची परिस्थिती आपण बघत आहोत. दुसरीकडे, भारतावर जेव्हा जेव्हा संकट आले तेव्हा भारत एकसंध राहिला आहे. यात भारतीय राज्यघटनेचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले . राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ येथे उभारण्यात आलेल्या देशातील पहिल्या संविधान प्रास्ताविका पार्कचे लोकार्पण सरन्यायधीशांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.
ते पुढे म्हणाले, भारतीय संसदेने अनुच्छेद ३७० रद्द केल्यावर सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. भारत हा संघराज्य आहे. अमेरिकेसारखी राज्यांसाठी वेगळी राज्यघटना हा विचार डॉ.आंबेडकरांना मान्य नव्हता. देशाला एकसंध ठेवण्यासाठी देशाची एकच राज्यघटना हवी,



असे बाबासाहेबांनी स्पष्ट केले होते. याच कारणामुळे सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद ३७० रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवल्याचा खुलासा तत्कालीन खंडपीठात असलेल्या न्या.गवईंनी केला.
भारतीय संविधानातील अनुच्छेद ३७० हे जम्मू आणि काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे महत्त्वाचे कलम होते. या कलमानुसार जम्मू-काश्मीरला स्वतःचे संविधान लाभले होते आणि भारताच्या संसदेला केवळ संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि संप्रेषण या विषयांवरच तिथे कायदे करता येत होते. ५ ऑगस्ट २०१९ रोजी भारत सरकारने राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे अनुच्छेद ३७० हटवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.
या निर्णयामुळे जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा रद्द झाला आणि त्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये झ्र जम्मू-काश्मीर आणि लडाख असे विभाजन करण्यात आले. अनुच्छेद ३७० हटवण्याच्या निर्णयाविरोधात अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या. यामध्ये याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की, केंद्र सरकारने राज्य सरकारच्या संमतीशिवाय हा निर्णय घेतला, जो संविधानाच्या संघराज्यात्मक रचनेच्या विरोधात आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने एकमताने निर्णय दिला की, अनुच्छेद ३७० तात्पुरता होता आणि राष्ट्रपतींना तो रद्द करण्याचा पूर्ण अधिकार आहे.



## सोन्या तू अजून शुद्धीवर नाही का?

### गुलाबराव पाटलांचा राऊतांना टोला



**मुंबई :** मराठी ही आमची भाषा आहे आणि आम्ही ते मान्य करतो. मात्र, विषय केवळ हिंदीचा आहे. हिंदीच्या बाबतीत सामूहिक निर्णय झाला पाहिजे, अशीच सर्वांची इच्छा आहे. असे परखड मत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केले आहे. इतकेच नाही तर त्यांनी संजय राऊत यांच्यावर देखील जोरदार हल्ला चढवला. 'सोन्या तू अजून शुद्धीवर आला नाही का?' असा प्रतिप्रश्न गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत यांना विचारला आहे.

राज्यात हिंदीच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येऊन मोर्चा काढणार आहेत. या मोर्चा संदर्भात बोलताना संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोणत्या बंकर मध्ये लपून बसले आहेत? अशी बोचरी टीका केली होती. त्याला मंत्री गुलाबराव पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. एकनाथ शिंदे हे तुज्या छाताडावर बसलेले आहेत, सोन्या तू अजून शुद्धीवर आला नाही का? अशा शब्दात गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे.

राज आणि उद्धव ठाकरे पुढील काळात एकत्र येतील का? या प्रश्नावर देखील गुलाबराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जाला-त्याला स्वतंत्र विचार करण्याची बुद्धी देवाने दिली आहे. शेवटी कोणी काय निर्णय घ्यावा? हा त्या पक्षप्रमुखांचा विषय आहे. ते दोन्ही पक्षप्रमुख आहेत. ते जो निर्णय घेतील, तो घेतील, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी दिली आहे.

## कांदा ब्रँडचे मार्केटिंग करणार

### पणनमंत्री रावल यांची घोषणा



**नाशिक :** कांद्याचे सतत बदलते दर ही उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठी समस्या आहे. मात्र देशातील बाजारात चव आणि दर्जा यामुळे नाशिक कांदा हा ब्रँड तयार झाला आहे. दराच्या समस्येवर कायमस्वरुपी उपाय म्हणून पणन विभागातर्फे त्याचे देशातील बाजारपेठेत मार्केटिंग करण्यात येईल. सोबतच नाशकात इंटरनॅशल फूड मार्केट उभारणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

मंत्री रावल म्हणाले की, नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष, बेदाणा, येवल्याची पैठणी यांचेही मार्केटिंग केले जाईल. कुंभमेळा ही पर्यटनासाठी सर्वात चांगील संधी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी त्र्यंबकेश्वर-शिर्डी-शनि शिंगणापूर सर्किट विकसित करण्याचा प्रयत्न मी केला. नाशिक-इगतपुरी-त्र्यंबकेश्वर या पर्यटन त्रिकोणाबाबतही विद्यमान पर्यटन मंत्र्यांशी चर्चा केली जाईल,

## विरोधकांचे मराठीवर पुतना मावशीचे प्रेम

### केशव उपाध्ये यांची टीका



**मुंबई :** महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याच्या मुद्यावरून मोठे रणकंदन माजले आहे. राज व उद्धव ठाकरे यांनी या प्रकरणी सरकारच्या विरोधात मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. त्याला सर्वच स्तरातून पाठिंबा मिळत असताना भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी विरोधकांचे मराठीवर पुतना मावशीचे प्रेम असल्याचा आरोप केला. या प्रकरणी त्यांनी उद्धव ठाकरे व शरद पवार गटावर सडकून टीका केली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुखर उद्धव ठाकरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना हिंदीची सक्ती करणाऱ्या अध्यादेशाची होळी करण्याचे आदेश दिलेत. या पार्श्वभूमीवर केशव उपाध्ये यांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांचे हे मराठी प्रेम पुतना मावशीच्या प्रेमासारखे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. केशव उपाध्ये आपल्या एका पोस्टमध्ये म्हणतात, हे तर पुतना मावशीचे प्रेम! उद्धव ठाकरे यांनी मराठी सक्तीच्या अध्यादेशाची होळी करण्याचा आदेश दिला आहे, मराठी सक्ती सांगणाऱ्या जीआरची होळी? हे यांचं मराठी प्रेम? उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना उर्दू भवनची घोषणा केली, त्यावेळी मराठी शाळांच्या दुरावस्थेची आठवण आली नाही? मुंबई महापालिकेच्या मराठी शाळांची संख्या गेल्या १५ वर्षात ४०० वरून २८० पर्यंत खाली आली. याच शाळांतील विद्यार्थी संख्याही लाखांहून ३५ हजारांवर आली. काही शाळा बंद कराव्या लागत आहेत. कुठे गेलं उद्धव ठाकरे यांचं मराठी प्रेम? असा सवाल उपाध्ये यांनी उपस्थित केला आहे.

# 'मराठी'साठी २० वर्षांनंतर दोघे भाऊ एकत्र

### नांदगावकर, संजय राऊत यांच्याकडे नियोजन : सरदेसाई, संदीप देशपांडेंकडेही जबाबदारी



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :** राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र मोर्चा काढणार असून त्याला राज्यातील सर्वच विरोधी पक्षांनी पाठिंबा दर्शवला आहे. आता या मोर्चाच्या नियोजनासाठी मनसेच्या वतीने बाळा नांदगावकर तर उद्धव ठाकरे गटाच्या वतीने संजय राऊत यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्याबरोबरच आमदार वरुण सरदेसाई, आणि संदीप देशपांडे यांच्यावर देखील महत्त्वाची जबाबदारी असणार आहे.

महाराष्ट्र सरकारच्या वतीने त्रिभाषा सुत्राच्या माध्यमातून हिंदी सक्ती करण्यात येत असल्याचा आरोप ठाकरे बंधूंनी केला आहे. या विरोधात आता एकत्र मोर्चा काढण्यात येणार आहे. ५ जुलै रोजी काढण्यात येणाऱ्या या मोर्चाची जबाबदारी मनसेच्या वतीने ज्येष्ठ नेते बाळ नांदगावकर तर शिवसेनेच्या वतीने संजय राऊत यांच्यावर सोपवण्यात आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

याबरोबरच आमदार वरुण सरदेसाई आणि मनसेचे नेते संदीप देशपांडे यांच्यावर देखील मोर्चाच्या नियोजनाची महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. या मोर्चात कोणत्याही पक्षाचा झेंडा नसेल तर केवळ मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्यांचा हा मोर्चा असेल, असे मनसेने आधीच जाहीर केले आहे.

वास्तविक राज ठाकरे यांनी केलेला नियोजनानुसार गिरगाव चौपाटीपासून आझाद मैदानापर्यंत हा मोर्चा असणार आहे. मात्र उद्धव ठाकरे यांनी हुतात्मा स्मारक ते आझाद मैदान मोर्चा काढावा, असे सुचवले आहे.

**नेते चर्चा करतील...**

दुसरीकडे संजय राऊत यांनी या विषयी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला टोलवले आहे. हुतात्मा चौकातून मोर्चा काढावा, असे उद्धव ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत ठरले होते. मात्र त्यासोबतच गिरगाव चौपाटी येथून मोर्चाला सुरुवात करावी, असा देखील पर्याय आमच्या बैठकीत चर्चेला होता, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे. वेळ आणि सर्वांना सोयीचा मार्ग, या संदर्भात बैठकीत बसून नेते चर्चा करतील, असे देखील संजय राऊत यांनी सांगितले आहे.

त्यामुळे आता या मोर्चाच्या मार्गावरुन आणि वेळे वरून अद्याप एकमत झालेले नाही.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने कोणत्याही आंदोलनाची सुरुवात ही हुतात्मा चौकातूनच केली जाते. त्यामुळे आता राज ठाकरे आपला मार्ग बदलणार की, उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्या नियोजनाप्रमाणे गिरगाव चौपाटीपासून सुरू होणा?या मोर्चात सहभागी होणार? याकडे

आधी राज ठाकरे ५ जुलैला तर उद्धव ठाकरे ७ जुलैला मोर्चा काढणार होते. मात्र, बदलती राजकीय समीकरणे लक्षात घेऊन उद्धव यांनी उद्धवसेनेचा ७ जुलैचा मोर्चा रद्द करून ५ जुलैच्या राज ठाकरे यांच्या मोर्चात सहभागी होण्याचे ठरवले. अपेक्षेनुसार शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याचे स्वागत केले, त्यानुसार ते देखील या मोर्चात सहभागी होण्याची शक्यता आहे.

सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या वर्षी विधानसभेत सपाटून मार खाल्ल्यानंतर राज आणि उद्धव ठाकरे या सख्ख्या चुलत बंधूंनी एका छताखाली यावे, असे प्रयत्न दोन्ही पक्षांच्या काही पदाधिकाऱ्यांकडून सुरू होते. मात्र, अखेर हिंदी विरोधाच्या निमित्ताने तो मुद्दा मिळाला. इयत्ता पहिलीपासून हिंदी ही तिसरी भाषा ऐच्छिक म्हणूनही शिकवता कामा नये अशी भूमिका या भावंडांनी घेतली आणि २० वर्षांनंतर हे दोघे ५ जुलै मोर्चा काढणार आहेत.

## मोर्चात अजित पवार गट सहभागी होणार नाही

### प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंची स्पष्टोक्ती



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :** हिंदी सक्तीच्या विरोधात ठाकरे बंधूंच्या वतीने ५ जुलै रोजी मुंबई भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोचार्ला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने पाठिंबा दिला असून, मोर्चात सहभागी होणार आहेत.

या मोर्चाला राष्ट्रवादी अजित पवार गट पाठिंबा देणार का? पक्षाची नेमकी भूमिका काय आहे? याबाबत राजकीय वतुर्ळात उत्सुकता होती. यावर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली असून, या मोर्चात आमच्या पक्षाचा कोणताही नेता सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

राज्यात पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विरोधक हिंदी सक्तीला विरोध करत असून, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी या वर्गात हिंदी असू नये. पाचवीपासून हिंदी असावी. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे, अशी स्पष्ट भूमिका मांडली होती. त्यामुळे ५ जुलैच्या मोर्चात अजित पवारांचा पक्ष देखील सहभागी होणार का? अशी चर्चा सुरू झाली होती. त्यावर आता सुनील तटकरे यांनी स्पष्ट विधान केले आहे.

**नेमके काय म्हणाले सुनील तटकरे?**

५ जुलैच्या मोर्चात आमच्या पक्षाचा कोणताही नेता सहभागी होणार नाही, असे सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले आहे. हा विरोधकांचा मोर्चा आहे. त्यामुळे आमच्या पक्षाला जर या विषयावर काही मांडायचे असेल, तर आम्ही मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करून तो मार्ग शोधू, असेही ते म्हणालेत.

**आम्ही हस्तक्षेप करणार नाही**

शरद पवार यांच्या पक्षाने या मोर्चाला पाठिंबा दिला आहे. याबाबत सुनील तटकरे यांना विचारले असता, मला याबाबत काहीच बोलण्याचे कारण नाही, राज्यातल्या निवडणुका महायुती म्हणूनच लढण्याचे ठरले आहे. असे असताना जर का कोणाला काही वेगळा निर्णय घ्यायचा असेल तर ते स्वतंत्र आहेत, त्यामुळे आम्ही त्याच्यामध्ये हस्तक्षेप करणार नाही. आम्हाला ज्या पद्धतीने निवडणुकीला सामोरे जायचं आहे, त्या पद्धतीने आम्ही सामोरे जाऊ, असे त्यांनी म्हटले.

**राजकीय समीकरणे बदलणार नाहीत**

५ जुलैच्या मोचार्मुळे मराठी मतांचे ध्रुवीकरण होऊन महायुतीला फटका बसेल का? असा प्रश्न विचारला असता तटकरे म्हणाले, मी या मोर्चाकडे राजकीय चष्म्यातून बघत नाही. लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, या मोर्चामुळे राजकीय समीकरणे फारशी बदलणार नाहीत, असे मला वाटते, असे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले.

## टेक्नोसॅव्ही भोंदूबाबाला अटक

### मोबाइलमध्ये हिडन ॲप टाकून पाहायचा भक्तांचे खासगी क्षण

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २८ :** हिडन मोबाईल ॲपद्वारे भक्तांच्या खासगी क्षणांवर नजर ठेवत त्यांचा मानसिक छळ करणाऱ्या एका टेक्नोसेव्ही भोंदूबाबाला बावधन पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. प्रसाद उर्फ दादा भीमराव तामदार (२९) असे त्याचे नाव आहे. तो आपल्याकडे दिव्यशक्ती असल्याचा दावा करत भाविकांची फसवणूक करत होता.

सदर भोंदूबाबा बावधन परिसरात श्रद्धा व अंधश्रद्धेच्या आडून आपली दुकानदारी चालवत होता. आपल्याला दिव्यशक्तीची आत्मभूती प्राप्त झाली आहे, असा दावा करत तो भक्तांना तुमचा मृत्यू ४-५ महिन्यांत अटळ आहे असे भाकीत सांगून मानसिकदृष्ट्या कमकुवत करत होता. त

यानंतर मंत्रजाप करण्याच्या बहाण्याने तो भक्तांना एकांतात बसवून त्यांचा मोबाईल हातात घेत असे. नंतर पासवर्ड विचारून मोबाइलमध्ये गुपचूप एक हिडन ॲप डाऊनलोड करून ठेवत असे. हे ॲप मोबाईलमध्ये बॅकग्राऊंडमध्ये कार्यरत राहून बाबाला भक्ताचा कॅमेरा, आवाज, लोकेशन यावर नियंत्रण मिळवून देत असे.

यासंबंधी एका ३९ वर्षीय व्यक्तीने बावधन पोलिसांत तक्रार दाखल केली. भोंदूबाबाने आपल्याकडे दिव्यशक्ती असल्याचा भास निर्माण करत त्याला अनेक गोष्टी करण्यास भाग पाडले. फिर्यादी व त्याच्या जवळच्या सहकाऱ्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील घटनांवर नजर ठेवली. एवढेच नाही तर फिर्यादीला अश्लील कृत्य व वेश्यागमन करण्यासही भाग पाडले.

त्याच्या तक्रारीनुसार पोलिसांनी तपास केला असता सदर भोंदूबाबाने त्याच्यासारखीच अनेकांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. अखेर या बाबाला बेड्या ठोकण्यात आल्या.

## ठाकरेंच्या मोर्चावर भाजपचे वेट अँन्ड वॉच

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर मराठी-हिंदी वाद पुन्हा एकदा गाजत असताना, ठाकरे बंधूंच्या एकत्रित मोर्चावर भाजपने वेट अँन्ड वॉचह्मची भूमिका घेतली आहे. उबाठा आणि मनसे एकत्र आल्याने निर्माण झालेल्या राजकीय घडामोडींवर भाजपकडून सध्या सावध पवित्रा ठेवण्यात येत आहे.

मराठीच्या अस्मितेवरून रंगलेल्या राजकारणाला भाजपकडून अभिजात दर्जाचे उत्तर दिलं जाणार आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातच झाल्याचं ठसठशीतपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याची रणनीती आखली जात आहे. भाजपच्या नेत्यांचा दावा आहे की, मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याने भाषा संवर्धनासाठी मोठा फायदा होणार आहे. त्या अंतर्गत अभ्यास, संशोधन, नवीन केंद्रे, साहित्य प्रकल्प यांना चालना देण्याचा प्रयत्न होणार आहे.

## विलास शिंदेंची हकालपट्टी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** राजकारणातील नाराजीचं रूपांतर थेट पक्षांतरात होताना पुन्हा एकदा दिसत आहे. विलास शिंदे यांची उबाठा पक्षातून हकालपट्टी करण्यात आली असून, त्यांनी आपल्या समर्थकांमध्ये नाराजी व्यक्त करत लवकरच शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

विलास शिंदे हे उबाठातील महत्वाचे नेते मानले जात होते. मात्र, पक्षातील वाढत्या दुर्लक्षामुळे ते अस्वस्थ होते. त्यांच्या जागी मामा राजवाडे यांची नाशिक महानगर प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती करताना उबाठा नेतृत्वाने कार्यकर्त्यांना संघटनेच्या एकसंघतेचे आवाहन केले. दरम्यान, शिंदे गटातील नेत्यांशी शिंदे यांचे चचेर्चे वृत्त पुढे येत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही हालचाल महत्त्वाची मानली जात आहे. विलास शिंदे यांचा शिंदे गटात प्रवेश झाल्यास नाशिकमधील समीकरणे बदलू शकतात.

## अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचा हिंदी सक्तीला विरोध

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** त्रिभाषा सूत्रातील हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधूंनी एकत्र येत थेट रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ५ जुलै रोजी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान दरम्यान विराट मोर्चा काढण्यात येणार आहे.

या आंदोलनाला आता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचा पाठिंबा मिळाला असून, महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी साहित्यिक, सांस्कृतिक कार्यकर्ते, अभ्यासक, विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. तर मराठवाडा साहित्य परिषदेनेही या धोरणाला विरोध केला. मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील यांनी मराठीवर घाला घालू देणार नसल्याचा इशारा दिला.

राज्य सरकारने केंद्र सरकारला खूश करण्यासाठी आणि दक्षिण भागात आपले पाय पसरण्यासाठी पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करण्याचा घाट घातला आहे.

सरकारच्या या कारस्थानाविरुद्ध मराठी माणसांनी एल्गार न केल्यास राज्यात कुणालाच अभिमानाने मी मराठी म्हणता येणार नाही, असे मत मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी काढले. मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीविरोधातील हिंदी सक्तीचा सूर बैठकीत उमटला.

पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला विरोध करण्यासाठी मराठवाडा साहित्य परिषदेच्या डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. दादा गोरे, डॉ. चंद्रदेव कवडे यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात मसापचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी कुठल्याही परिस्थितीत मसाप मराठीवर घाला घालू देणार नसल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

**मराठी स्वाभिमानासाठी एकत्र येणे स्वागतार्ह- सतेज पाटील**

दुसरीकडे काँग्रेस नेत्यांनी देखील या मोर्चाबद्दल सकारात्मक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्रात सक्तीची हिंदी लादली जात असल्याचा आरोप होत असताना, मराठी भाषेच्या रक्षणासाठी आता एक महत्त्वाचा मोर्चा एकजूटीनं निघण्याची घोषणा करण्यात आली आहे.

उबाठा आणि मनसे एकत्र येऊन मोर्चा काढणार असल्याचं स्पष्ट होताच, राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील तसेच विजय वडेट्टीवार यांनी यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

## शिक्षण, समर्पण आणि विदर्भवादाची कणखर शिदोरी

शिक्षण हे जीवनाचा मूलाधार आहे, हे आपण वारंवार ऐकतो. पण जेव्हा शिक्षणात एकाच कुटुंबातील दोन पिढ्या एकाच मंचावर पदवीधारक म्हणून उभ्या राहतात, तेव्हा ती घटना केवळ वैयक्तिक यशापुरती मर्यादित राहत नाही, तर ती समाजासाठी प्रेरणादायी ठरते.

अशाच दुर्मीळ, भावनिक आणि प्रेरणादायी क्षणाचा साक्षीदार ठरला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन व अध्ययन केंद्राचा २५ जून २०२५ रोजीचा दीक्षांत समारंभ.



**एक दुर्मीळ प्रेरणादायी योगायोग**

**प्रा. डॉ. प्रशांत विघे**
भारतीय महाविद्यालय, अमरावती.
९३२६८७७७४९

या दीक्षांत सोहळ्यात विदर्भ राज्य आंदोलन समिती व जय विदर्भ पार्टीचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत आणि त्यांची कन्या शिवानी राजपूत यांना एम. ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपी या विषयातील पदवी एकाच मंचावर प्रदान करण्यात आली. ही केवळ एक शैक्षणिक घटना नसून, संघर्ष, समर्पण आणि ज्ञानप्रेम यांचा संगम असलेला एक आदर्श प्रसंग होता.

शिकण्यास वयाचं बंधन नाही

शिकण्यास वयाचं बंधन नसतं, हे विधान केवळ सुभाषित न राहता प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत यांच्या जीवनात साकार झालेलं वास्तव आहे. प्राचार्यपदावरून निवृत्त झाल्यानंतर, वयाच्या ६५व्या वर्षी त्यांनी एम. ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपी या आधुनिक व भावनिक समजुतीच्या विषयात पदवी प्राप्त करून घेतली. ही बाब त्यांच्या निरंतर शिकण्याच्या ओढीचे, भविष्याचा वेध घेणाऱ्या दृष्टिकोनाचे आणि वैचारिक जागृतीचे प्रतीक आहे.

या वयानंतर बहुतेक जण विश्रांतीचा विचार करतात, पण डॉ. राजपूत यांनी निवृत्तीनंतरही नवनवीन ज्ञान मिळवण्याचा ध्यास सोडला नाही. समाजातील मानसिक आरोग्याच्या प्रश्नांवर कार्य करण्याची संवेदनशीलता, आणि त्या दिशेने शिक्षण घेण्याची सक्रियता सोडली नाही.

यामुळे ते केवळ एक शिक्षक किंवा नेते न राहता, तर नव्या युगाचा दिशादर्शक विचारवंत ठरतात. त्यांच्या या वाटचालीतून हे स्पष्ट होते की, भविष्याचा वेध घेण्यासाठी वय नव्हे, तर विचारांची तयारी आवश्यक असते. ही तयारीच त्यांना सामान्यांपेक्षा वेगळं आणि प्रेरणादायी ठरवते.

प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत हे विदर्भ राज्याच्या स्वबळावरच्या लढ्याचे एक खंदे नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. तरीही त्यांनी शिकण्याची ओढ जपली. एम.ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपीसारख्या मनोविज्ञानाशी संबंधित संवेदनशील विषयाचा अभ्यास पूर्ण केला. त्यांच्याच प्रेरणेतून त्यांची कन्या शिवानी राजपूत हिने देखील हेच शिक्षण पूर्ण करून पित्याच्या विचारांचा वारसा आत्मसात केला.

आज ज्या समाजात पिढ्यांमध्ये अंतर वाढत चालले आहे, तिथे एकत्र शिकणाऱ्या बाप-लेकीचा हा प्रसंग पिढ्यांमध्ये समन्वय आणि सहप्रवासाचा आदर्श ठरतो. विदर्भवादाचे शिस्तबद्ध नेतृत्व आणि सुसंस्कारित वारसा डॉ. पी. आर. राजपूत हे विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या माध्यमातून विदर्भाच्या हक्कासाठी सातत्याने लढणारे नेते आहेत.

त्यांच्या नेतृत्वात विदर्भवादाला जी वैचारिक धार प्राप्त झाली, ती शिक्षणाच्या माध्यमातून अधिक संवेदनशील होत चालली आहे.

शिवानी राजपूत हिच्या शिक्षणामधून ही विचारधारा पुढे नेली जात आहे, याचे विशेष समाधान वाटते.

या प्रसंगी महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा सौ. रंजनाताई मामर्डे यांनी या बाप-लेकीच्या यशाबद्दल विशेष अभिनंदन करत, त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या कौतुकाने महिलांच्या नेतृत्व विकासाच्या क्षेत्रातही एक सकारात्मक संदेश गेला आहे.

एम. ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपी ही पदवी केवळ शिक्षणात गूढतेची भर घालणारी नाही, तर समाजाच्या मानसिक आरोग्याच्या समस्यांवर उपचार करणारी आणि भावनिक समृद्धी घडवणारी ठरते. अशा विषयात अभ्यास करून बाप-लेकीने समाजसेवेचा नवीन अध्याय सुरू केला आहे. ही घटना केवळ एका कुटुंबाची कहाणी नाही, तर ती संपूर्ण विदर्भासाठी एक सशक्त प्रेरणा आहे, की शिकण्याची सीमा नसते, वयाचं बंधन नसतं, आणि कधीही नव्या अध्यायाची सुरुवात करता येते. या यशस्वी आणि प्रेरणादायी बाप-लेकीला शुभेच्छा!

शेवटी एवढाच सांगता येईल की, माजी प्राचार्य डॉ. पी. आर. राजपूत हे विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षक आणि सामाजिक समर्पणाचे प्रतीक आहेत. शिक्षण, समाज आणि आंदोलन या तीनही क्षेत्रात त्यांचे योगदान हे प्रेरणादायी आहे. त्यांच्या कायार्तून अनेकांना प्रेरणा मिळत असून, विदर्भाच्या तरुणांमध्ये भविष्यकाळात त्यांच्या विचारांचा प्रभाव निश्चितच राहील हे मात्र खरं !

■ ■ ■

# राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर संभाजीनगरात

### उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करण्यासाठी प्रयत्न : प्रताप सरनाईक



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याचे सुटे भाग पुनश्च वापरात येणार नाहीत, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर (भंगार केंद्र) एसटी महामंडळ सार्वजनिक- खासगी भागीदारी तत्त्वावर उभारण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये होणाऱ्या या सेंटरच्या माध्यमातून उत्पन्नाचा वेगळा व शाश्वत स्त्रोत भविष्यात एसटीला निर्माण होईल! असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. ते २७ जून रोजी या संदर्भात बोलावलेल्या एसटी महामंडळाच्या आढावा बैठकीमध्ये बोलत होते.

या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते. केंद्र शासनाद्वारे सन.२०२१ मध्ये रजिस्टर व्हेईकल स्क्रॅपिंग फॅसिलिटी (फश्रत्रझ) नावाने १५ वर्षापेक्षा जुनी वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्यांच्या सुट्ट्या भागाचा पुनर्वापर होणार नाही, अशा पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावण्यात यावी. यासाठी नवे धोरण बनवण्यात आले.

सदर धोरण महाराष्ट्र शासनाने सन. २०२३ मध्ये स्वीकारले असून ऑटोमोटिव्ह इंडस्ट्रि स्टॅंडर्ड (अक्र) च्या अटी शतीर्नुसार स्क्रॅपिंग केंद्राला मान्यता देण्याचे निश्चित केले आहे.

त्यानुसार एसटी महामंडळाला देखील राज्यात ३ ठिकाणी अशा प्रकारचे स्क्रॅपिंग सेंटर उभारण्याची परवानगी मिळाली असून त्यापैकी पहिले आणि राज्यातील सर्वात मोठे स्क्रॅपिंग सेंटर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या १०० एकर जागेवर सार्वजनिक- खासगी भागीदारीतून उभारले जाणार आहे.

**एसटीला उत्पन्न मिळवून देणारा नवा स्त्रोत**

मंत्री सरनाईक म्हणाले की, सध्या शासनाच्या परवानगी ने राज्यात ८ संस्था स्क्रॅपिंग केंद्र चालवत असून त्यांची वषार्ला किमान १००० वाहने स्क्रॅप करण्याची क्षमता आहे.

अशा संस्थांना शासनाच्या वतीने परवानगी देणारे परिवहन खाते हे देखील माझ्या अखत्यारीत असल्यामुळे एसटीचा अध्यक्ष आणि परिवहन मंत्री या नात्याने या प्रकल्पाला गती देऊन भविष्यात सर्वाधिक वाहने शास्त्रोक्त पद्धतीने स्क्रॅप करून त्याची विल्हेवाट लावणारे सर्वात मोठे सेंटर एसटीच्या माध्यमातून उभारले जाणार असून एक नवा उत्पन्नाचा स्त्रोत यातून निर्माण होईल, असा विश्वास आहे.

या आढावा बैठकीमध्ये आवश्यक मनुष्यबळाची करार पद्धतीने भरती करणे, कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या बदल्या व बढत्यांचे निकष ठरवून ते अमलात आणणे, नवे वाहन खरेदी धोरण इत्यादी विषयावर चर्चा झाली.

## संततधार पावसामुळे शेतातील विहीर खचली शेतकरी हतबल मदतीची मागणी

**तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यातील तळेगाव बाजार परिसरात चार पाच दिवसाआधि संततधार पावसामुळे तळेगाव खु शेत शिवारात विहिर पुर्ण खचल्याने शेतकरी हतबल झाला आहे. तळेगाव बाजार येथील अल्प भूधारक शेतकरी विलास रामभाऊ मानखैर यांचे शेतातील विहीर पुर्ण खचलि आहे या आठवड्यात तळेगाव बाजार परिसरात संततधार पाऊस आल्याने मानखैर यांचे शेतातील विहीर पुर्ण खचलि आहे मानखैर यांनि बागायती कापसाची लागवड केली आहे पुढे कपाशी नंतर हरबरा पेरणी करु अश्या आशेवर असतांनाच विहीर पुर्ण खचलि आहे तशे निवेदन तेल्हारा तहसीलदार यांना देण्यात आले आहे.



# ८२ गावांमध्ये संभाव्य पूरस्थितीचा धोका

## आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा प्रशासन 'अलर्ट'

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** पावसाळ्याच्या दिवसात जिल्ह्यातील ८२ गावांमधील संभाव्य पूरस्थिती नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासन अलर्ट झाले आहे. या गावात संभाव्य पूरस्थितीवर तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित सर्व यंत्रणांना दिले असून, आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक प्रशिक्षण, साहित्य उपलब्ध करण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. जिल्ह्यात पावसाळ्याच्या दिवसात नदी, नाल्यांना पूर आल्याने अनेक गावांत मोठ्या प्रमाणात नुकसान होते. गत वर्षी अतिवृष्टी आणि पुरामुळे जिल्ह्यातील ५१२ घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान आणि १५ मानवी मृत्यू झाले होते.



जिल्ह्यातील सर्वात मोठी पूर्णा नदी असून या नदीला इतर नद्या मिळतात. अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागा, चारगड, शहानूर, पूर्णा या प्रकल्पाचे विसर्गाचे पाणी पूर्णा नदीत येते. तसेच जिल्ह्यातील काटेपूर्णा, मोर्णा, पोपटखेड प्रकल्पाचे विसर्गाचे पाणी पूर्णा नदीत मिळते, त्यामुळे पूरस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी होत असते. यावर्षी आपत्ती निवारणासाठी जिल्हा प्रशासनाकडून नियोजनबद्ध तयारी करण्यात आली आहे.

यामध्ये तहसील स्तरावर प्रती तहसील २० लाइफ जॅकेट, २० लाईफ रिंग, १०० मीटर रोप, अकोट, मूर्तिजापूर तहसीलमध्ये इन्फ 'टेबल बोट वोबीएमसह विभागीय अधिकारी १. प्रती तहसील ३ सर्च लाईट, इमर्जन्सी लाईट, केळीवेळी, दोनवाडा येथे एचडीपीई ६ सीटर बोट विथ वोबीएम उपलब्ध करून देण्यात आले असून, जिल्हाधिकारी कार्यालयस्तरावर दोन रबर बोट १० लाईफ जॅकेट, १० लाईफ बोया, १ रोप- रेस्क्यु किट, २ सर्चलाईट, १ एअर पम्प उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पोलीस विभाग, होमगार्ड, नगर परिषद, अग्निशमन विभाग, महानगरपालिका प्रशासनाकडेसुद्धा हे सर्व साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासोबतच पूरबाधित गावामध्ये तात्पुरते शाळांमध्ये निवारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा अकोला दौरा



**अकोला :** ग्रामविकास मंत्री जय कुमार गोरे हे उद्या रविवारी दिनांक २९ जून रोजी अकोला जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांचे सकाळी ११:१५ वाजता अकोला विमानतळ येथे आगमन होईल. तिथून जिल्हा परिषदेकडे रवाना. सकाळी ११:३० वाजता जिल्हा परिषदेत विविध विकास कामांबाबत बैठक, दुपारी एक वाजता प्रमिलाताई ओक हॉलकडे रवाना.दुपारी १.३० वाजता प्रमिलाताई ओक सभागृह येथे माळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पालक मेळावा, दुपारी २.४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन, दुपारी ३ वाजता कार्यकर्ता संवाद बैठक, दुपारी ४.१५ वाजता विमानतळाकडे प्रयाण, दुपारी ४:३० वाजता विमानाने सोलापूरकडे रवाना.

# अकोला पोलीस दलात १८१ नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचा समावेश

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** पोलीस अधीक्षक यांनी समक्ष मुलाखत घेऊन केले स्वागत आणि कर्तव्याचे दिले आदेशदिनांक २७ जुन २०२५ रोजी मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक (भा.पो.से.) यांच्या अध्यक्षतेखाली अकोला पोलीस दलाच्या आस्थापना मंडळाची बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये अकोला जिल्हा पोलीस दलातील नवप्रविष्ठ १८१ पोलीस अंमलदारांनी पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये मुलभूत प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करून अकोला पोलीस दलाच्या आस्थापनेवर हजर झाले.मुंबई पोलीस अधिनियम भाग १ मधील नियम १४५ (२) नुसार या नवप्रविष्ठ पोलीस अंमलदारांना त्यांच्या क्षमतेनुसार नविन कर्तव्य सोपविण्यात आली आहेत. या निर्णयासाठी दिनांक २७.०६.२०२५ रोजी झालेल्या आस्थापना मंडळ बैठकी दरम्यान



संबंधित अधिकाऱ्यांच्या समक्ष प्रत्येक नवप्रविष्ठ पोलीस अंमलदाराची वैयक्तीक मुलाखत घेण्यात आली. त्यांच्या शैक्षणीक शारीरिक मानसिक क्षमतेचा आढावा घेऊन त्यांची नियुक्ती ठरविण्यात आली.

या प्रसंगी मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्री. अभय डोंगरे, सहायक पोलीस अधीक्षक श्री. अनमोल मित्तल (भा.पो.से.), श्री. सतिष कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग अकोला, श्री. गजानन पडघन उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग बाळापुर तसेच श्री. आनंद महाजन प्र. पोलीस उपअधिक्षक (मुख्या), श्री. गणेश जुमनाके राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यांची उपस्थिती होती.या नव्या पिढीतील पोलीस अंमलदारांच्या योगदानामुळे अकोला जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत अधिक प्रभावी आणि गतिमान पोलीस यंत्रणा उभी राहील असा विश्वास या वेळी व्यक्त केला.

## स्टेशनवर चोरांचा सुळसुळाट एक पाऊल नव्हे, तर दोन पावलं पुढे!

### खा. धोत्रे यांच्या माजी पीएलाही चोरट्यांनी सोडलं नाही

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** १२८३३ अहमदाबाद - हावडा एक्स. नी शेगाव - अकोला प्रवास करून अकोला येथे आल्यावर स्टेशन बाहेर येताना शर्टच्या खिशातील मोबाइल चोरीला गेला. काही वेळाने माजी पीएच्या वडिलांनी मुलगा अकोला पोहचला का विचारण्यासाठी मोबाईलवर कॉल केला असता, समोरून 'शरद मोरे, मलकापूर पोलीस बोलतोय' असं सांगण्यात आलं. नावाचा चोर पकडल्याचं सांगत, त्याच्याकडून मोबाइल मलकापूर येथे मिळाला असल्याचं सांगण्यात आलं. पुढे उद्या आधारकार्ड घेऊन या, असं सांगण्यातले आणि मोबाइलचा लॉक विचारून घेतल्यानंतर मोबाइल बंद करण्यात आला.आज माजी पीएचे वडील मलकापूर स्टेशनला गेले असता, 'शरद मोरे' नावाचा कोणताही पोलीस कर्मचारी तिथे कार्यरत नाही, अशी माहिती मिळाली.यावरून स्पष्ट होतं की मोबाईल चोरट्यांनी शक्कल लावून आधी विश्वास निर्माण केला आणि मोबाइल अनलॉक करण्यासाठी माहिती मिळवून तो बंद करून टाकला.

# शहरातील सर्व रुग्णालये,खाजगी क्लिनिक व पॅथोलॉजी लॅबमध्ये शुल्क फलक अनिवार्य करावा

## ज़करिया फाउंडेशनची आयुक्तांकडे मागणी

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** ज़करिया फाउंडेशन अकोला तर्फे महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे निवेदन देण्यात आले असून, अकोला शहरातील सर्व खासगी व शासकीय रुग्णालये, क्लिनिक तसेच पॅथोलॉजी व डायग्नोस्टिक केंद्रांमध्ये नागरिकांसाठी स्पष्ट, अद्ययावत व पारदर्शक शुल्क फलक (ठरींश इेरीव) लावणे अनिवार्य करावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.फाउंडेशनचे अध्यक्ष जावेद ज़करिया यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आजच्या काळात आरोग्य सेवा ही सामान्य जनतेची मूलभूत गरज झाली आहे. मात्र अनेक खाजगी रुग्णालये, क्लिनिक व तपासणी केंद्रांमध्ये उपचार व चाचण्यांचे दर नागरिकांसमोर खुलेपणाने प्रदर्शित न केल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक अडचणी, गोंधळ व अनावश्यक खर्चाचा सामना करावा लागतो. फाउंडेशनने पुढील तीन ठिकाणी दरफलक अनिवार्य करण्याची विनंती केली आहे: रुग्णालये: ओपीडी, आयसीयू/वॉर्ड/प्रायव्हेट रूम, शस्त्रक्रिया, डायग्नोस्टिक सेवा, औषधे, नर्सिंग व ॲम्ब्युलन्स शुल्क क्लिनिक: सामान्य सल्ला, स्पेशलिस्ट फी, प्राथमिक उपचार शुल्क पॅथोलॉजी लॅब: विविध रक्त व यकृत तपासण्या, प्रोफाइल पॅकेज, होम कलेक्शन शुल्क दरफलकाचे फायदे:

पारदर्शकता वाढते रुग्णांचा विश्वास प्रस्थापित होतो आर्थिक नियोजन सुलभ होते गैरप्रकार रोखले जातात संस्थांचे नैतिक व कायदेशीर उत्तरदायित्व सुनिश्चित होते या निवेदनात महानगरपालिकेने सर्व आरोग्य संस्थांना दरफलक लावण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत.

अशी मागणी करण्यात आली असून दरफलक प्रवेशद्वार, रिसेप्शन किंवा बिलिंग काउंटरजवळ लावावा व नियमित अद्ययावत करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. 'नागरिकांच्या हितासाठी ही अत्यावश्यक बाब असून, महानगरपालिका प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी,' असे आवाहन ज़करिया फाउंडेशनचे अध्यक्ष जावेद ज़करिया यांनी केले आहे.

## भौरद-डाबकी रोडवरचे खड्डे बुजविणार कोण

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** डाबकी ते भौरद येथील नाल्यावरचा पुर पाहिल्यावर हा रस्ता किती जीवघेणा आहे याची जाणीव होते. पण, त्या पुराच्या पाण्यापेक्षा रस्त्यावरील खड्डे हेच अधिकच जीवघेणे ठरत असल्याची ओरड या मार्गावरील संतप्त वाहनचालकांनी व्यक्त केली आहे.

गुरुवारी झालेल्या पावसामुळे डाबकी रोड ते भौरद मार्गावरील नाला दुथडी भरून वाहत होता. रात्रीच्या अंधारात पाण्याचा प्रवाह अधिक धोकादायक असतानाही अनेक दुचाकीस्वार आणि वाहनचालक आपला जीव धोक्यात घालून बनत या पाण्यावरून प्रवास करताना दिसत आहेत.या वाहनचालकांना या नाल्यावर या रस्त्यावरचा खड्डयांचा अंदाज येत नव्हता. या नाल्यावर कोणतीही सुरक्षिततेची व्यवस्था नसल्याने हा मार्ग सध्या अत्यंत धोकादायक बनला आहे.

स्थानिक प्रशासनाकडून या ठिकाणी कोणतीही तात्पुरती वाहतूक नियंत्रणाची व्यवस्था, जसे की बॅरिकेड्स किंवा वाहतूक पोलीस, लावण्यात येत नाही.

## थोडक्यात

### मनपा कर्मचाऱ्याचा केला मोबाइल लंपास



**अकोला :** जुने शहर पोलिस स्टेशन हद्दीतील गीता नगर येथील श्री संत गजानन महाराज मंदिरातील आरती आटोपून गुरुवार, २६ जून रोजी रात्री १० वा. महापालिकेचे कर्मचारी सतीश प्रफुल्लचंद्रवखारिया रस्त्याने पायी मोबाइलवर बोलत जात होते. यावेळी दुचाकीवर आलेल्या तीन इसमांनी त्यांचा मोबाइल फोन हिसकावून घेऊन पळिवला. याप्रकरणी त्यांनी २७ जून रोजी जुने शहर पोलिसांत तक्रार दिली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुरुवारी रात्री १० वाजता जुने शहरातील गीतानगर येथील श्री संत गजानन महाराज मंदिरातून आरती झाल्यानंतर सतीश वखारिया रा. गीता नगर हे रस्त्याने पायी मोबाइलवर बोलत जात असताना दुचाकीवर तीन अज्ञात इसमांनी येऊन त्यांचा मोबाइल फोन हिसकावून घेऊन लगेच दुचाकीवर पळ काढला. याप्रकरणी त्यांनी जुने शहर पोलिस स्टेशन येथे धाव घेतली. संपूर्ण घटनाक्रम पोलिसांना अवगत केला. त्यानंतर अज्ञात इसमांविरूध्द गुन्ह्याची नोंद करून जुने शहर पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, यापूर्वीसुध्दा सदर अनेकवेळा परिसरात चेनस्नॅचिंगच्या घटना घडल्या असून, चोरीच्यासुध्दा घटना घडल्या आहेत.

### चोरांची '१ लाखाची जॅकपॉट' कामगिरी!

**अकोला :** अकोला मार्गावर धावणाऱ्या दोन रेल्वे गाड्यांमध्ये तीन चोरीच्या घटना घडल्या, तर बुकिंग कार्यालयातूनही एक चोरी झाली. अशा एकूण चार चोरीच्या घटना घडल्या.- ०७७१७ हिसार स्पेशल - रु. ३३,०००/ १२१५१ समरसता एक्सप्रेस - रु. १८,०००/- + रु. ४०,०००/ बुकिंग कार्यालयातून - रु. १२,०००/-एकूण चोरी: रु. १,०३,०००/- (मोबाईल, पर्स, रोख रक्कम, महत्वाचे कागद) निष्कर्ष काय - रेल्वेचा मार्ग आणि चोरांचा धंदा एकाच रुळावर!

# व्यसन हा एक मानसिक आजार:सौ.मंदाकिनी तळोकार

## सावित्रीबाई फुले विद्यालयात नशाबंदी मंडळाची अंमली पदार्थ विरोधी जनजागृती

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** व्यसनाची प्रतिष्ठा कमी करण्याची गरज आहे. व्यसन आहे मानसिक आजार असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापिका सौ.मंदाकिनी तळोकार यांनी केले. राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती व जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त सावित्रीबाई फुले विद्यालय विद्यालयात आयोजित अंमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रमात बोलत होत्या. शाळा समितीचे अध्यक्ष महादेवराव भुईभार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक बबनराव कानकिरड यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम राजेश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले अमली पदार्थ विरोधी पोस्टरद्वारे विद्यार्थ्यांचे




ज्ञानरंजन करण्यात आले व्यसनांचे दुष्परिणाम कळत असूनही लोक व्यसनाच्या आहारी जातात. वेळ, बुद्धी ,पैशाची नासाडी व्यसनात होते. व्यसन हे प्रगतीतील अडचण ठरते. म्हणून सुजाण नागरिकांनी, महिलांनी व्यसनाचा प्रतिकार करण्यासाठी उभे राहिले पाहिजे असे प्रतिपादन नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक बबनराव कानकिरड यांनी केले. व्यसनविरोधी गीताने विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. राजश्री शाहू महाराजांनी समाजातील अनिष्ट प्रथा, चालीरीती, अंधश्रद्धा , व्यसनाविरुद्ध शासन केले होते.

## श्री संत वासुदेव महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** श्री संत वासुदेव महाराज संस्था ज्ञानपीठ, आकोट द्वारा आयोजित सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज १६ व्या पुण्यतिथी महोत्सवांतर्गत विविध धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे ३ ते १० जुलै २०२५ दरम्यान श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्त ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी व श्रींच्या चरित्राचे सामूहिक पारायण, प्रवचन, कीर्तन, अखंड हरिनाम सप्ताह आदी कार्यक्रम पार पडणार आहेत. श्रींचा पुण्यतिथी उत्सव शनिवार आषाढ शुद्ध दशमी ५ जुलैला आहे. या दिवशी सकाळी ६ वाजता महाअभिषेक



सकाळी १० ते १२ या वेळेत श्री.ह.भ.प. गोपाल महाराज उरळकर यांचे कीर्तन, दुपारी १ ते ३ महाप्रसाद सायंकाळी हरिकीर्तन, रात्री ९.४५ वाजता महाआरती व दीपोत्सवाने श्रींचे पुण्यस्मरण करण्यात येणार आहे.

आषाढी एकादशी निमित्त ६ जुलै रोजी यात्रा महोत्सव व १० जुलैला गुरुपौर्णिमा उत्सव होईल. कार्यक्रमाचे व्यासपीठ नेतृत्व श्री ह भ प अनंत महाराज अवारे यांचेकडे असून या महोत्सवात सर्व श्री.ह.भ. प. दीपक महाराज मेंढे, नंदकिशोर महाराज झामरे, गणेशराव महाराज अंबाडकर, प्रथमेश महाराज डोंगरे, देवेंद्र महाराज रेखाते, अनंत महाराज अवारे, गोपाल महाराज झामरे यांची प्रवचन सेवा तसेच सर्वश्री ह.भ.प. रवींद्र महाराज वानखडे, एकनाथ महाराज पाचमासे, अनंत महाराज अवारे, विजय महाराज चिंचोळकर, देवेंद्र महाराज रेखाते, नंदकिशोर महाराज झामरे, वासुदेवराव महाराज महल्ले यांचे कीर्तन सेवा व १० जुलैला ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांची काल्याच्या कीर्तनाची सेवा होईल.

# दिव्यांग शिक्षकांवर अन्याय करणाऱ्या शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांना निलंबीत करा : डॉ. सुधीर ढोणे

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार हे नियमबाह्य कामे करीत आहेत. दिव्यांग शिक्षक पदोन्नतीसाठी पात्र असतांनाही त्यांना डावलून बेकादेशीर मार्गाचा अवलंब करून रतनसिंग पवार यांनी अपात्र व्यक्तिंना पदोन्नती दिली आहे. त्यामुळे इतर पात्र शिक्षक व दिव्यांग शिक्षकांवर अन्याय झाला आहे. नियमबाह्य कामे करर्णाया व दिव्यांग शिक्षकांवर अन्याय करर्णाया शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांना निलंबीत करा अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते डॉ. सुधीर ढोणे यांनी केली आहे. राज्याचे ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना पाठविलेल्या निवेदनात त्यांनी ही मागणी केली आहे.



डॉ. सुधीर ढोणे यांनी मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात प्राथमिक शिक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया दि. २४ एप्रिल २०२५ रोजी पार पडली. या प्रक्रियेत मुख्याध्यापक पदावरून केंद्र प्रमुख व विस्तार अधिकारी, शिक्षण वर्ग-३ मध्ये पदोन्नती झालेल्या ७ मुख्याध्यापकांना एका पदावर तीन वर्षे पूर्ण न होताच त्यांना लगेच पदोन्नती देण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०१ ऑगस्ट २०१९, महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २७ एप्रिल २०२३, दिव्यांग पदोन्नतीबाबत दि. २० एप्रिल २०२३ रोजीचा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय, अकोला जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे पदोन्नती संदर्भातील दि. ०५/०५/२०२३ रोजीचे इतिवृत्त तसेच संदर्भासाठी बुलढाणा जिल्हा परिषदेच्या दि. १९ मार्च २०२५ रोजी पदोन्नती संदर्भात प्रसिध्द झालेल्या याद्या या सर्वच शासकीय दस्तऐवजांचा अभ्यास करता निम्नतम पदावरून पदोन्नतीसाठी किमान सेवेचा कालावधी हा तीन वर्षे विहीत केलेला आहे. असे असतांनाही रतनसिंग पवार यांनी ३ वर्ष पूर्ण न केलेल्या अपात्र व्यक्तिंना पदोन्नती देवून नियमभंग केला आहे. त्यामुळे इतर पात्र शिक्षक व दिव्यांग शिक्षक यांच्यावर अन्याय झाला आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना २१ मे २०२५ रोजी पत्रव्यवहार केला होता व त्याची प्रतिलिपी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना दिली होती. ज्यांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती त्या रतनसिंग पवार यांनीच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार वापरत स्वत:च सुनावणी घेतली. आरोपीनेच न्यायाधीशाची भूमिका घ्यावी.

या पध्दतीनेच रतनसिंग पवार यांनी सुनावणी घेतली. दिव्यांग कर्मर्चायांना तळ मजल्यावर सुनावणीची व्यवस्था करणे किंवा लिफ्टची व्यवस्था करणे अनिवार्य असतांना दिव्यांग कर्मर्चायांना त्यांनी तीर्सया मजल्यावर बोलावून शारिरीक त्रास दिला.याशिवाय दिव्यांग कर्मर्चायांना सुनावणीच्या वेळेस अपमानास्पद वागणूक देवून त्यांचा मानसिक छळ केला. शिक्षकांना शारिरीक व मानसिक त्रास देर्णाया व नियमबाह्य कामे करून पात्र शिक्षकांवर अन्याय करर्णाया रतनसिंग पवार यांना निलंबीत करावे अशी मागणी डॉ. सुधीर ढोणे यांनी केली आहे.

## शिवणी परिसरात आरोग्याचा गंभीर प्रश्न नागरिक संतप्त, आंदोलनाचा इशारा

**अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :** अकोला महानगरपालिका प्रभाग क्रमांक १४ अंतर्गत येणाऱ्या शिवणी येथील शहीद प्रशांत राऊत चौक परिसरात सध्या प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरले असून, त्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे. परिसरातील नाल्यांची साफसफाई अनेक दिवसांपासून करण्यात आलेली नाही, परिणामी नाले ओसंडून वाहत असून सांडपाणी रस्त्यांवर साचून बसले आहे. या स्थायी अस्वच्छतेमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, नागरिकांना तोंडाला रुमाल बांधून राहण्याची वेळ आली आहे. विशेषतः लहान मुलं, वृद्ध आणि महिलांना याचा सर्वाधिक त्रास होत आहे. परिसरात डासांचा प्रचंड उपद्रव वाढला असून, हिवताप, डेंग्यू व चिकनगुनियासारख्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. तरीही, आरोग्य विभागाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी अकोला पंचायत समितीचे माजी सदस्य जयेंद्र धर्माजी वानखडे यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील नागरिकांनी २७ जून रोजी महानगरपालिकेचे आयुक्त यांना निवेदन दिले. या निवेदनात त्यांनी सांडपाणी व्यवस्थापन, नाल्यांची तातडीने सफाई, परिसर निर्जंतुकीकरण व डास निर्मूलन मोहिम राबविण्याची मागणी केली आहे. वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. श्री. वानखडे यांनी निवेदनात स्पष्ट इशारा दिला आहे की, जर तात्काळ कार्यवाही न झाल्यास नागरिकांना तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल. या गंभीर आरोग्यविषयक समस्येकडे महानगरपालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.

# पंढरीशी जा रे आल्यांनो संसारा, दीनांचा सोयरा पांडुरंग!

आपला देश देवादिकांच्या संत महंतांना मानणारा आहे. आपल्या देशातील सर्वच राज्यांमध्ये अनेक मोठ मोठी तिर्थक्षेत्रे, मंदिरे व देवालये आहेत. त्यापैकी जवळ जवळ नव्वद टक्के देवालये व मंदिरे अशी आहेत की यामधील देवाला कींवा देवीला दुरुनच वंदन करता येते. जवळ जावून देवाच्या पायाला स्पर्श करुन नमस्कार करण्यास मनाई आहे. परंतु आपल्या महाराष्ट्रातील पंढरपूर हे तिर्थक्षेत्र ज्याला महाराष्ट्राचे दैवत म्हटल्या जाते. अशा पंढरपूर निवासी पांडुरंगाचे चरणावर कोणालाही डोके टेकवून नमस्कार करण्यास मनाई नाही हे विशेष.

----------

**महेश हरीभाऊ खंडाळकर**
**तेल्हारा (दहिगांवकर)**
**जि. अकोला.**
**9604373955**

----------

पंढरपूर क्षेत्री असल्यामुळे कोणी याला पांडुरंग म्हणतात तर विटेवर उभा आहे म्हणून कोणी विठोबा म्हणतात. पंढरपूर हे चंद्रभागा नदीच्या काठावर बसलेले अनाधी काळापासून आहे. म्हणूनच जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात,

*आधी रचीली पंढरी*
*मग वैकुंठ नगरी*
*जेव्हा नव्हते चराचर,*
*तेव्हा होते पंढरपूर।*
*जेव्हा नव्हती गोदागंगा,*
*तेव्हा होती चंद्रभागा।*

आपल्या महाराष्ट्राततच नाही तर संपूर्ण भारत देशात पंढरपूरला विशेष महत्व दिल्या जाते. तसे पाहीले तर बाराही महिने पंढरपूरात भक्तभाविकांची मांदीयाळी असते.. आषाढी एकादशी ते कार्तिकी एकादशी हा जो चार महिन्याचा काळ आहे त्याला चातुर्मास असे म्हणतात या काळात दर एकादशीला पंढरपूरला तर यात्राच भरत असते आणि त्या पेक्षाही आषाढी व कार्तिकीला तर देशाच्या काना कोपयार्तून भाविक भक्त लोक दर्शनासाठी येतात.

*आषाढी कार्तिकी, भक्तजन येती।*
*चंद्रभागे वाळवंटी, संत गोळा होती।।*

या संत चोखोबाच्या अभंगाप्रमाणे भक्त विठुरायाच्या दर्शनाला येत असतात. आषाढ महिना लागण्यापूर्वी जो दरवर्षी पंढरीची वारी करतो.. त्यांना पंढरपूरचे वेध लागलेले असते, म्हणू? आपसूकच त्यांच्या मुखातून

*जाईन गे माये तया पंढरपूरा।*
*भेटेन माहेरा आपुलीया ॥*

या अभंगाच्या ओळी बाहेर पडतात. दर एकादशीला जरी शक्य झाले नाही झाले तरी पण आषाढी किंवा कार्तिकी एकादशीची वारी मात्र भक्त चुकवत नाहीत आणि पांडुरंग सुद्धा वारकयार्ची वारी चुकू देत नाही... म्हणूनच तर म्हटले आहे

*पंढरीची वारी, चुकू न दे हरी ।।*

हे काही खोटे नाही. आता ही वारी कधी व केव्हापासून सुरु झाली हे जरी सांगता आलं नसंल तरी शेकडो वर्षपासून ही प्रथा वषार्नुवर्षे अविरत चालू आहे असे म्हटले तरी चुक होणार नाही.

आई वडीलांच्या सेवेत लिन झालेल्या भक्त पुंडलिकाला स्वतः प्रत्यक्षात दर्शन देण्यासाठी आले असतांनाही पुंडलिकाने आपल्या आई वडीलांचे सेवेला खंड पडू दिला नाही. देवाचे आदरतिथ्य सांभाळून, मला सेवेत व्यत्यय आणू नकोस म्हणून.. पांडुरंगाला उभे राहण्यासाठी बाजुला



असलेली विट दिली, त्या विटेवर पंढरीनाथ उभे राहीले तर अजुनही आजतागायत त्याच विटेवर उभे असतांना आपल्याला दिसतात... म्हणूनच तर त्यांच्या आरतीतही म्हटले आहे.

विटेवरी उभा आहे म्हणून त्याला विठोबा, विशेष या नावाने सुध्दा संबोधतात. संत ज्ञानेश्वरांच्या बरेच वर्ष अगोदर पासून भाविक भक्त या पंढरीनाथाचे भजन, पुजन करीत आहेत यात शंका नाही..

आषाढी एकादशीला महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयांमधून अनेक वारकर्यांच्या धिंग्रा पायी चालत दिंड्या एक दिड महिन्यापूर्वी पासूनच पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होतात. आळंदीहून संत ज्ञानेश्वराची देहुवरून जगद्गुरु तुकोबाची, पैठणवरून संत एकनाथांची, मुक्ताईनगर येथून आदिशक्ती मुक्ताईची, त्र्यंबकेश्वर वरुन संत निवृत्तीनाथांची, सासवड वरून सोपान महाराजांची, अरण येथून सावतोबाची दिंडी अशा प्रकारे अनेकच नाही तर आता तर चक्क लंडन ते पंढरपूर पायी दीडीं सोहळा १८०० कीलोमिटरचा प्रवास करत पायी निघाल्याचे कालच वाचनात आले..

'रामकृष्ण हरी' चा गजर करत बरेच वर्षांपासून येत अनेक दिंड्या निघत..आहेत

विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेगांव येथून संत गजानन महाराजांची, नागझरीवरून संतगोमाजी महाराजांची, सोनाळ्यावरून संत सोनांजी महाराज, अडगांव वरून भास्कर महाराजांची अशा असंख्य भागातून विना, टाळ तुळशी .. मृदंगासह पांढरा पोषाख खांद्यावर भगवी पताका, गळयात तुळशी माळ, असा वारक-यांचा थाट असतो. यात अठरा पगड जाती जमातीतील वारकरी असतात... यात कोणी लहान नाही.. तर कोणी मोठा नाही, त्यांची गावे भिन्न व भाषाही भिन्न पण भक्ती मात्र एकच विठोबाचीच..

*एक गाऊ आम्ही विठोबाचे नाम।*
*आणिकांचे काम नाही आता ॥*

पंढरपूरात दाखल होण्याआधी वाखरी रस्त्यावर ह्या सर्व दिंड्यां व पालख्या गोळा होतात तिथे ओळख नसतांनाही एकमेकांना मोठ्या प्रेमाने भेटतात नव्हे नव्हे..

*एका एका लागतील पायी रे*

व मोठ्या आनंदाने व उत्साहाने पुंडलिका वर दे, हरी विठ्ठलचा गजर करतात, तेथे जातीभेदही नाही तर वर्ण भेदही नाही. त्यांचे ध्येय म्हणजेच

*पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान,*
*आणिक दर्शन विठोबाचे*

हे ध्येय त्यांना गाठायचे असते. कारण पंढरपूरला गेल्यावर पांडुरंगाचेच दर्शन होते असे नाही तर पवित्र अशा चंद्रभागेचे स्नान संत देवतांचे दर्शन, किर्तन श्रवण, प्रवचन भक्त पुंडलिकाचे दर्शन होते. संत संगाचा लाभ होतो, ज्यामुळे आपण आपलं जीवन कसं जगावं कसं वागावं हे पन ज्ञान होते...

महाराष्ट्रातील पंढरपूरला भूवैकुंठ असे म्हटले आहे. या भुवैकुंठाचा स्वामी विठ्ठल आहे. तोच आपल्या सुख दुःखाची काळजी वाहणारा आहे. म्हणूनच तर संत अभंगात म्हणतात

*देवा माझे मन लागो तुझे पायी।*
*संसार व्यसनी पडू ना देई॥*

पांडुरंगही आपल्या भक्तांची काळजी आपल्या लेकरा सारखी घेतो. संत जनाबाई सांगत असे

*विठु माझा लेकुरवाळा,*
*संगे गोपाळांचा मेळा ।*

आज आपण एकविसाव्या शतकात वाटचाल करीत आहो, संगणकाच्या युगात वारकरी सांप्रदाय सुध्दा मोठ्या वेगाने विकसित होत आहे.

*पंढरीचे सुख नाही कोण्या नामा*
*नामाचा महिमा पंढरीत..*

असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हटले आहे व वारकऱ्यांनी अनुभवले आहे. विज्ञान युग जितके पुढे जात आहे तितकाच हा वारकरी सांप्रदाय सुध्या विकसीत होत असताना आपल्याला दिसत आहे. सिंहावलोकन करुन जर आपण पाहीले तर

इवलेसे रोप लावियेले द्वारी।
तयाचा वेलू गेला गगनावरी ।।

हे प्रचितीला आले आहे. पंढरपुरला आपआपल्या सोयीने कोणी पायी, कोणी रेल्वेने, एस टी,बसने..आषाढीला वारकरी येतात. एकादशीचे दुसरे दिवशी अर्थातच बारसला चंद्रभागेचे स्नान करुन विठोबाचे दर्शन नाही शक्य झाले तर.. मंदीराच्या कळसाचेचे दर्शन घेऊन भाविक जड पावलाने ओसरू लागतात.. शेवटी

*आता कोठे धावें मन,*
*तुझे चरण देखलिया।*

असे होते...जन्माला आल्यावर प्रतिवर्षी नाही जमले तर एकदा तरी आषाढी एकादशीला पंढरपुर या भूवैकुंठी जावून विठ्ठल चरणी डोके टेकवून हा जन्म कृतार्थ करावा ही आप सर्वांना विनवणी.

■ ■ ■

# हिंदी भाषेला विरोध... मराठीचे काय ?

शालेय अभ्यासक्रमात पहिलीपासून मराठी शिकवावी कि शिकवू नये यावर राज्यभरात आज रणकंदन माजले आहे. याबाबत सरकारमधील घटक पक्षांमध्येही मतभेद दिसून येत आहेत.

काहींच्या मते शालेय अभ्यासक्रमात एक भाषा म्हणून हिंदी भाषा शिकणे काहीच चुकीचे नाही, तर काहींच्या म्हणण्यानुसार राज्यात हिंदीची सक्ती म्हणजे मराठीची गळचेपी करण्याचा प्रयत्न आहे. बिहारमधील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपकडून हा घाट घातला जात असल्याचा आरोपही काही जण करत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्याने यानिमित्ताने आपणच राज्यातील जनतेचे खरे वाली आहोत हे दाखवण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये चढाओढ लागली असून यनिमित्ताने आयते कोळीत हाती आल्याने सध्या या विषयावर मोठ्या प्रमाणात राजकारण केले जात आहे, भव्य मोर्चाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत.

प्रतिदिन प्रसिद्धी माध्यमांना बातम्या पुरवल्या जात आहेत. 'हिंदी भाषेची सक्ती करायचीच असेल तर सर्वात आधी दाक्षिणात्य राज्यांमध्ये ती करण्यात यावी कारण या राज्यांतील नागरिकांना मातृभाषा आणि इंग्रजी यांव्यतिरिक्त कोणतीच भाषा येत नसल्याने या ठिकाणी परराज्यातून जाणाऱ्यांची मोठी पंचाईत होते'. असा अनाहूत सल्ला देणारेही आज मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत.

पहिलीपासून हिंदी शिकवावी की शिकवू नये याबाबतचा योग्य तो निर्णय येत्या काही दिवसांत होईलही. मात्र ज्या भाषेच्या प्रेमापोटी हिंदीला विरोध केला जात आहे, ज्या भाषेचे आपणच वाली आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष आणि नेतेमंडळींकडून केला जात आहे ती मराठी भाषा आज महाराष्ट्रात सुरक्षित आहे का ? माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा तर मिळाला मात्र तिला तिचे पुनर्वैभव केव्हा प्राप्त होणार ? या विषयावर कोणीही काहीच बोलताना आज दिसत नाही.

गेल्या काही वर्षांत इंग्रजी भाषेने मराठी भाषेवर जी कुरघोडी केली आहे ती कोणाच्याच लक्षात का येत नाही ? जर मराठीच्या प्रेमापोटी हिंदी भाषेला विरोध होत असेल तर इंग्रजी भाषेला आपण अवास्तव महत्व का देत आहोत ?

आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना अच्छे दिन आले आहेत. पाल्यांवर लहानपणापासून इंग्रजीची सक्ती करून आपण केवळ मराठीला डावलतो आहोत असे नव्हे, तर पाल्यांचा बौद्धिक विकासही खुंटत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ?

जेव्हा व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा एक असते तेव्हाच त्या भाषेचे वैभव आणि त्यातील शब्दसंपदा, ख ?्या अर्थाने आपल्या लक्षात येऊन ती भाषा आपल्या भाव भावना व्यक्त करण्याचे, संवेदना जाणून घेण्याचे, विचार व्यक्त करण्याचे साधन बनते. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. प्रतिष्ठेची ही व्याख्या आपणच तयार केली आहे ना ? आपल्याला फारसे इंग्रजी येत नाही म्हणून महाराष्ट्रात मराठी माणूस न्यूनगंड बाळगू लागला आहे.

इंग्रजी भाषेत अस्खलित बोलण्यास शिकवणाऱ्या शिकवण्या जागोजागी तयार होऊ लागल्या आहेत त्यामध्ये मोठ्या संख्येने मराठी तरुणच दिसून येत आहेत. ही गरज आज कोणी निर्माण केली? शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणाऱ्या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते.

साधे सिम कार्ड घ्यायचे झाले, तरी त्याचा अर्ज इंग्रजीत भरावा लागतो. महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रात आणि कोणत्याही संदर्भात निवेदन द्यायचे असेल किंवा अर्ज भरायचे असतील, तर त्यासाठी प्रथम पर्याय मराठीचाच असायला हवा ही सक्ती महाराष्ट्रात का केली जात नाही.

आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणा ?्या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना अधिक वेतन दिले जाते त्यामुळे अशा ठिकाणी मराठी मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली? महाराष्ट्रात राहायचे तर मराठी यायलाच पाहिजे. नीट बोलता नाही आले, तरी मराठी समजायला तर हवेच.

फळविक्रेत्याला मराठीत संवाद साधण्याचा आग्रह धरणाऱ्या एका मराठी तरुणाला मुंब्र्यात मारहाण केली जाते, माफी मागण्यास भाग पाडले जाते, त्याचा व्हिडीओ बनवून समजमाध्यमावर व्हायरल केला जातो, एव्हढे होऊनही सरकार जागे होत नाही. मराठी संघटना याविरोधात आवाज उठवत नाहीत. नेहमीप्रमाणे यामध्ये मनसे हस्तक्षेप करून मुजोर विक्रेत्याविरोधात गुन्हा दाखल करण्यास पोलिसांना भाग पाडते. स

ोसायटीमधील मराठी रहिवाशांना अन्य अमराठी भाषिकांकडून घरात घुसून शिवीगाळ आणि मारहाण केली जाते तरी मारहाण करणाऱ्याच्या विरोधात तत्परतेने गुन्हा दाखल केला जात नाही. महाराष्ट्रात मराठी भाषिकांवर अशीच दडपशाही होत असेल, माराठी भाषेची अशीच अवहेलना केली जात असेल तर मराठी माणसांनी न्याय तरी कोणाकडे मागायचा?

आपल्या भाषेविषयी आपले प्रेम लोप पावत चालल्याचे हें परिणाम आहेत. आपल्या मातृभाषेला आलेल्या या अवकळेला आपण मराठी भाषिकच कारणीभूत आहोत. आपल्या मातृभाषेविषयी आपली अशीच उदासीनता राहिली, तर पुढच्या पिढीवर मातृभाषेचे संस्कार तरी कसे होतील ? आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत.

घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी सणांचे महत्व कमी होऊन फेब्रुवारीतील 'डेज' उत्साहाने साजरे होऊ लागले आहेत, नाताळात घरोघरी खिसमस ट्री येऊ लागले आहेत, मराठी घरात नववर्ष गुढीपाड्व्यापेक्षा एक जानेवारीला अधिक उत्साहाने साजरे होऊ लागले आहे.

घरोघरी वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार तिथींना नव्हे तर इंग्रजी तारखांना साजरे होऊ लागले आहेत. मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला मात्र राज्यात मराठी भाषा वाढवण्याचे आणि समृद्ध करण्याचे, मराठी रक्षणाचे जे प्रयत्न व्हायला हवेत ते मात्र अद्यापही दिसून येत नाहीत. त्यामुळे हिंदी भाषेच्या सक्तीला जसा विरोध केला जात आहे त्या प्रमाणात मराठी भाषेच्या सन्मानासाठी आपण केव्हा प्रयत्न करणार आहोत याचा विचार प्रत्येक मराठी माणसाने करायला हवा.

------------

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■

# ईस्टीमेटवर केलेली सोन्याची खरेदी कायदेशीर आहे का?

सहसा आठ-दहा लेख संपल्यानंतर आपण आता पर्यंत काय अभ्यास केला. यावर थोडक्यात पुनरावलोकन करणे आवश्यक असते नाहीतर आचार्य चाणक्य म्हणतात की पुढे पाठ मागे सपाट अशी अवस्था होते. म्हणून आपण सोन्याबद्दल अति संक्षिप्त सारांश बघणार आहोत.

**प्रश्न : आतापर्यंत आपण काय काय बघितले?**

● सोनं आणि इन्कमटॅक्स बघतांना आपण अभ्यास केला की, विवाहित महिला, अविवाहित मुलगी तथा पुरुष यांना घरात किती सोने ठेवता येते? सोन्याची वीट तथा सोन्याचे नाणं या माफी लिमिटमध्ये का धरले जात नाही? सोन्यासाठी इन्कमटॅक्स पुरावा कधी आवश्यक आहे व कधी आवश्यक नाही.

सी.बी.डी.टी. सर्क्युलर काय आहे? अज्ञान मुलगा, अज्ञान मुलगी, संयुक्त कुटुंब , विभक्त कुटुंबमध्ये किती सोनं, नाण ठेवता येते? इन्कमटॅक्स अधिकारी तुमच्या घरी धाड टाकून कधी सोनं जप्त करु शकतात तथा कधी सोनं जप्त करू शकत नाही, इत्यादीचा सखोल अभ्यास केला. आज आपण सोन्याची नवीन माहिती बघणार आहोत, जी व्यवहाराच्या दृष्टीकोनातून खूप महत्वाची ठरावी.

**प्रश्न : घरात असलेल्या सोन्याचे खरेदी बिल आवश्यक आहे का?**

● त्या मर्यादित असलेल्या घरातील सोन्याच्या दागिन्यासाठी खरेदी बिल असले तर चांगलेच आहे परंतु जर खरेदी बिल नसेल तरी काही हरकत नाही. ती मर्यादा सार्वभोम आहे. विवाहित महिला, अविवाहित मुलगी आणि पुरुष यांच्यासाठी सोन्याची मयार्दा दिलेली आहे. त्या सोन्याच्या दागिन्यांना इन्कमटॅक्स अधिकारी कुठल्याच प्रकारचे ऑब्जेक्शन घेऊ शकत नाही.

**प्रश्न : घरातील सोन्यासाठी GST Paid बिल आवश्यक आहे का?**

● सोन्याची खरेदी जी.एस.टी. कायदा आल्यानंतरची असेल तर सोन्याचे बिल जी.एस.टी. सह असणे आवश्यक आहे. परंतु जुनी खरेदी असेल तर त्या काळात व्हॅट टॅक्स होता, ते बिल आवश्यक असते.

**प्रश्न : सहसा सोन्या- चांदीचे व्यापारी Estimate वर पैसे घेवून सोनं विकतात, ते बिल म्हणून चालते का ?**

● नाही. जे Estimate वर सोन खरेदी करतात किंवा विकतात, ते सोनं कायद्याने काळ्या पैशातून घेतलेले सोने धरले जाते. ते सोने कायदेशीर नाही.

**प्रश्न - इन्कमटॅक्समध्ये सोन्याच्या लिमिट येण्याच्या अगोदरचे केसेस चालु असतील तर अशा केसेसना त्या लिमिटचा फायदा मिळेल का?**

● सोप्या भाषेत वरील प्रश्न असा आहे की, सी.बी.डी.टी. सर्क्युलर हे ११ मे १९९४ ला आलेले आहे. त्यामध्ये सोन्याच्या दागिन्याची मर्यादा दिलेली आहे. जर इन्कमटॅक्समध्ये या पूर्वीच्या काही केसेस चालु असतील तर त्या केसमध्ये त्या सोन्याला मिळेल का?

याचे उत्तर होय असून, ११ मे १९९४ च्या आधीच्या केसेसमध्ये सुद्धा त्या सोन्यास मान्यता आहे. सध्या व्यवहारात अशा केसेस असण्याची शक्यता फार कमी आहे.

**प्रश्न - सोन्याची खरेदी कायदेशीर आहे का, हे दाखवण्यासाठी त्या दिवशी पुस्तकात रोख Cash असणे जरुरी आहे का?**

● होय, नसता ती खरेदी काळ्या पैशातून धरली जाईल.

पुढील लेखात आपण इन्कमटॅक्सबद्दल नवीन माहिती घेणार असून, ज्या वाचकांना काही सुचना किंवा इन्कमटॅक्ससंबंधी काही प्रश्न विचारायचे असतील त्यांनी 9422218428 या नंबरवर फक्त व्हॉटस्ॲप मेसेज करावे.

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंडडा**
**सीए. आकाश जी. मुंडडा**
**जालना.**




## संविधान समजावून सांगणे म्हणजे देशद्रोह का?

**वाचक लिहितात**

मागील काही दिवसांपासून विविध वृत्तपत्रांमध्ये पंढरपूर वारीचे महत्व, विशिष्ट धर्म आणि संप्रदायाचा प्रसार, प्रचार याविषयी अनेक नागरीक लिखाण करताना दिसून येतात. त्यात धर्मश्रेष्ठत्व सांगून इतर विचारसरणीच्या लोकांना चुकीचे दर्शविण्याचा बालिश प्रयत्न केला जात आहे.

पंढरपूरची वारी शतकानुशतके सुरू आहे. विठूरायाची ओढ वारकऱ्यांना पंढरीला खेचून नेते. लक्षावधी वारकरी विठूरायाच्या दर्शनाने धन्य झाल्याचे मानतात. याला कुणाचाही विरोध नाही आणि तो असण्याचे कारण नाही. तथापि, वारीत चालत जाणाऱ्या वारकऱ्यांना भारतीय संविधान आणि त्याचे महत्व सांगणे म्हणजे देशद्रोह होतो का? नागपूरच्या एका वाचक महिलेने एका वृत्तपत्रात लिहिले की, पवित्र वारीमध्ये आज काही दुष्ट प्रवृत्ती, तथाकथित पुरोगामी आणि साम्यवादी मंडळी सामील होत आहेत. संविधान समता दिंडी या नावाखाली हे लोक म्हणे वारकऱ्यांमध्ये राज्यघटनेविषयी जागृती करत आहेत. प्रत्यक्षात हे वारकऱ्यांना भ्रमित करण्याचा प्रयत्न आहे.

भारत देशाचा कारभार कोणत्याही धर्मग्रंथाच्या आधारे नव्हे तर संविधानाच्या आधारे चालतो, हे या बाईला ठावूक नाही का? संविधानाने प्रत्येक भारतीयाला बहाल केलेले हक्क, अधिकार, मुलभूत कर्तव्य त्यांना समजावून सांगणे म्हणजे भ्रमित करणे होय का? खरे तर, भोळ्या भाबड्या लोकांना अंधश्रद्धेच्या विळख्यात खितपत ठेवून आजही त्यांना भ्रमित करण्याचा या असल्या लोकांचा डाव आहे. म्हणूनच यांचा संविधानाला विरोध दिसून येतो.

■ **राजेश पौनीकर, नागपूर.**



# या ५ कारणामुळे येऊ शकतो कार्डियाक अरेस्ट

प्रसिद्ध अभिनेत्री शेफाली जरीवाला हिचे वयाच्या ४२ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. शेफालीच्या निधनाने संपूर्ण बॉलिवूडला मोठा धक्का बसला आहे. यापूर्वीही अनेक बॉलिवूड कलाकारांचं अत्यंत कमी वयात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालेलं आहे. फिटनेस फ्रीक असूनही अनेक सेलेब्स हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावले आहेत. यामागचं कारण काय असू शकतं ते जाणून घेऊया.

**१. कोरोनरी आर्टरी डिजीज**

कोरोनरी आर्टरी डिसीज हे हृदयविकाराच्या झटक्याचे सर्वात सामान्य कारण आहे. या अवस्थेत, हृदयाला रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये प्लेग (चरबी आणि कोलेस्ट्रॉल) जमा होतो.

ज्यामुळे त्या अरुंद होतात आणि हृदयात रक्त प्रवाह कमी होतो. हे प्लेग तुटू शकते आणि रक्ताच्या गुठळ्या तयार करू शकते, ज्यामुळे हृदयाला होणारा रक्तपुरवठा पूर्णपणे थांबू शकतो आणि हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. हृदयविकाराच्या झटक्याने हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

**२. हृदयाच्या स्नायूतील विकृती (कार्डिओमायोपॅथी)**

कार्डिओमायोपॅथी ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये हृदयाचे स्नायू असामान्यपणे जाड, कमकुवत किंवा कडक होतात. यामुळे हृदयाच्या पंप करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो आणि हृदयाची असामान्य लय उद्भवू शकते. कार्डिओमायोपॅथीचे बरेच प्रकार आहेत.

त्यापैकी काही अनुवांशिक घटक आहेत आणि काही इतर रोग किंवा जीवनशैली घटकांमुळे विकसित होतात. या अवस्थेमुळे हृदयविकाराचा धोका लक्षणीय वाढतो.

**३. हार्ट रिदम समस्या**

हार्ट रिदमला एरिथमिया देखील म्हणतात, हृदयविकाराच्या झटक्याचे एक प्रमुख कारण आहे. जर हृदयाच्या शक्तीत बिघाड झाला असेल तर हृदय खूप वेगवान, खूप हळू किंवा अनियमितपणे धडधडू शकते.

वेंट्रिकुलर फायब्रिलेशन हा एक विशेषतः धोकादायक एरिथमिया आहे ज्यामध्ये हृदयाचे खालचे कक्ष (व्हेंट्रिकल्स) असामान्यपणे थरथरण्यास सुरवात करतात आणि प्रभावीपणे रक्त पंप करू शकत नाहीत, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो.

**४. जन्मजात हृदयरोग :**

काही लोक जन्मापासूनच हृदयविकार घेऊन जन्माला येतात. हे रोग हृदयाच्या संरचनेवर किंवा कार्यावर परिणाम करू शकतात आणि नंतरच्या आयुष्यात हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढवू शकतात. जरी या समस्या अनेकदा बालपणात पकडल्या जातात, परंतु काही सौम्य समस्या अनियंत्रित राहू शकतात आणि लहान होईपर्यंत समस्या उद्भवू शकतात.

**५. इतर वैद्यकीय परिस्थिती आणि जीवनशैली घटक**

वर नमूद केलेल्या कारणांव्यतिरिक्त, इतर काही वैद्यकीय परिस्थिती आणि जीवनशैली घटक देखील हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढवू शकतात.

यामध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल, लठ्ठपणा, धूम्रपान, जास्त मद्यपान, तणाव आणि शारीरिक क्रिया यांचा समावेश आहे. हे घटक हृदयाचे नुकसान करू शकतात आणि हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढवू शकतात. तेंव्हा सावधगिरी बाळगायला हवी.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## विद्यार्थ्यांचे मनोगत

**दप्तराच्या ओझ्याने**
**होत आहेत अनेक व्याधी**
**तज्ञांनो पाठीवर बॅग घेऊन**
**एक मैल चालुन पहा आधी!**

**पेपरलेस पुस्तक संकल्पना**
**आणली जर प्रत्यक्षात**
**आनंददायी शिक्षण बनेल**
**भौ शंका नाही अजिबात!**

**कल चाचणीच्या आधारे**
**विषय संख्या करा कमी**
**तरच मुलांची कार्यक्षमता**
**लागेल हमखास सत्कारणी..!**

# ग्लोबललॉजिकने नागपूरमध्ये स्टेम इनोव्हेशन लॅबचे उद्घाटन केले




**नागपूर, २८ जून :** डिजिटलक प्रॉडक्ट इंजिनिअरिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी आणि हिताची समूहाचा भाग असलेल्या ग्लोबललॉजिकने आज नागपूरमधील सी. पी. बेरार हायस्कूल येथे अत्याधुनिक रोबो शिक्षा केंद्र या स्टेम इनोव्हेशन लॅबचे उद्घाटन केले. इंडिया स्टेम फाउंडेशनच्या सहकार्याने राबवण्यात आलेली ही योजना, ग्लोबललॉजिकच्या #EducateToEmpower या प्रमुख सीएसआर उपक्रमाचा भाग आहे. या उपक्रमाचा उद्देश वंचित समुदायातील विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) या विषयांमध्ये समान आणि प्रत्यक्ष शिक्षण संधी उपलब्ध करून देत त्यांना सक्षम बनवणे आहे.

कार्यक्रमात बोलताना ग्लोबललॉजिकचे असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट इंजिनिअरिंग अमित काळे म्हणाले, नागपूरमधील ही स्टेम लॅब आमच्या या विश्वासाचे प्रतीक आहे की खरी परिवर्तनाची सुरुवात प्रवेशापासून होते. गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञान आणि अनुभवाधिष्ठित शिक्षणाच्या संधींपर्यंतचा संधींपर्यंत सहज पोहोच मिळाल्यानेच खरा बदल घडतो. या भागातील तरुणांमध्ये आम्हाला अपार क्षमता दिसते आणि या उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, कौतुकाची भावना आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत, कारण हेच विद्यार्थी आपल्या डिजिटल भविष्यातील शिल्पकार ठरणार आहेत.

ग्लोबललॉजिकच्या सीएसआर प्रमुख (एपीएसी) मोनिका वालिया म्हणाल्या, ही स्टेम इनोव्हेशन लॅब केवळ एक जागा नाही, तर ही सर्जनशीलता, नवोपक्रम आणि समान शैक्षणिक संधींचे प्रवेशद्वार आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या चार विषयांच्या समन्वयातून, आम्ही अशा समुदायांतील दडलेल्या प्रतिभेला चालना देत आहोत, जिथे संधी कमी असते. हा उपक्रम आमच्या सामाजिक प्रभावाच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाचे प्रतीक आहे आणि विविध कल्पनांनी आणि असीम शक्यतांनी भरलेले भविष्य घडवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

सुधांशु शर्मा संस्थापक व संचालक, इंडिया स्टेम फाउंडेशन यांनी सांगितले, ग्लोबललॉजिकसोबतची ही भागीदारी भारतात स्टेम शिक्षण सर्वांसाठी सहज उपलब्ध, आकर्षक आणि परिणामकारक बनवण्याच्या आमच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. सीएसआर उपक्रमाद्वारे भविष्यकालीन कौशल्यांनी सज्ज मनुष्यबळ घडवण्याबाबत त्यांची वचनबद्धता केवळ रोबो शिक्षण केंद्र उपक्रमाला बळकट करते असे नाही, तर तर पुढच्या पिढीतील नवोपक्रमशील विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्याच्या आमच्या सामायिक दृष्टीकोनालाही आधार देते. ग्लोबललॉजिकच्या सहकार्यामुळे, आम्ही आमचे प्रयत्न अधिक व्यापक स्तरावर राबवू शकतो आणि भविष्यातील तंत्रज्ञान व समाज घडवणाऱ्या तरुण बुद्धीमत्तेला योग्य प्रकारे घडवू शकतो.

या स्टेम लॅबच्या सुरूवातीमुळे भारताच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) च्या दृष्टीकोनाशीही सुसंगती निर्माण होते, जे शालेय अभ्यासक्रमात स्टेम विषयांचा समावेश करण्यास प्रोत्साहन देते, प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षणाला चालना देते आणि चिंतनशील विचार व समस्या सोडवण्याच्या क्षमतेच्या विकासास पाठिंबा देते. शिक्षण क्षेत्रातील ग्लोबललॉजिकचा सातत्यपूर्ण सहभाग हा भारतातील प्रत्येक भागात भविष्यकालीन पिढी घडवण्याच्या त्यांच्या दृष्टीकोनाचे स्पष्ट प्रतिबिंब आहे ज्याची सुरुवात शालेय स्तरापासून होते.

# जेनेरालीने आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया हा त्यांचा भारतातील नवा जॉइंट व्हेंचर भागीदार असल्याची केली घोषणा

**नवी दिल्ली, २८ जून :** जेनेरालीने आज सेंट्रल बँक ऑफ इंडियाला (सीबीआय) भारतातील आपला नव्या संयुक्त भागीदार (जॉइंट व्हेंचर पार्टनर) म्हणून घोषित केले. सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही १९११ मध्ये स्थापन झालेली भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात जुन्या बँकांपैकी एक आहे. या बँकेचे मार्केट कॅपिटलायझेशन ४६१ अब्ज (५.१ अब्ज युरो) इतके आहे आणि ४,५००हून अधिक शाखांच्या माध्यमातून ही बँक ८० दशलक्षांहून अधिक ग्राहकांना सेवा देते.

सीबीआयसोबतच्या या भागीदारीमुळे जेनेरालीचे मार्केटमधील अस्तित्व भक्कम होईल आणि जीवन विमा व पीअँडसी या दोन्ही विभागांमधील त्यांचे ब्रँड पोझिशनिंग व वितरण क्षमता मजबूत होईल.

जेनेराली ग्रुपच्या इन्श्युरन्स विभागाचे डेप्युटी सीईओ जेमी अँकुस्तेगी म्हणाले, भारतातील आमच्या व्यवसायाच्या या नव्या पर्वाची सुरुवात सेंट्रल बँक ऑफ इंडियासोबत करत असल्याचा आम्हाला आनंद आहे. ही बँक स्थानिक पातळीवर एक मजबूत आणि प्रतिष्ठित भागीदार आहे. भारतासारख्या प्रचंड शक्यता असलेल्या बाजारपेठेत जेनेरालीचा विस्तार अधिक वेगाने करण्यासाठी ही भागीदारी निश्चितच उपयुक्त ठरेल, अशी आम्हाला खात्री आहे. या वाटचालीमुळे आमच्या लाइफटाइम पार्टनर २७ : ड्रायव्हिंग एक्सलन्स या धोरणाशी सुसंगत असून, निवडक प्रमुख भौगोलिक भागांमध्ये आमच्या मुख्य क्षमतांवर लक्ष केंद्रित करून वाढीचा पाठपुरावा करण्यात आम्हाला मदत होईल.

जेनेराली ग्रुपचे एशिया रिजनल ऑफिसर रॉब लिओनार्डी म्हणाले, ही भागीदारी भारतातील आमच्या व्यवसायावर असलेल्या दृढ विश्वासाचे प्रतीक आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियासोबत काम करण्याची ही संधी जेनेरालीसाठी या महत्त्वाच्या वाढीच्या बाजारपेठेत एकेक पाऊल पुढे टाकत भक्कम वाटचाल करण्याची आहे. तसेच आमच्या नवीन स्ट्रॅटेजिक प्लॅनच्या लाँचनंतर या भागीदारीसाठी ही वेळ योग्य आहे. आमच्या एकत्रित बलस्थानांमुळे 'लाइफटाइम पार्टनर' या आमच्या संकल्पनेला नव्या उंचीवर नेण्याची क्षमता आहे. यात चांगली ब्रँड ओळख निर्माण करणे आणि अधिक मजबूत वितरण व्यवस्था तयार करणे समाविष्ट असून याला आमच्या भक्कम धोरणांचे पाठबळ लाभले आहे.

## 'जागो इंडिया जागो फिटनेस अभियान' ला एक वर्ष पूर्ण

# नागपूर १७ व्या शहरात पोहोचले, ४ दिवसांच्या फिटनेस ड्राइव्हचे आयोजन



**नागपूर, २८ जून :** सुप्रसिद्ध फिटनेस आणि स्लिमिंग सेंटर, सौमेन वर्कआउट (नो मशीन झोन) ने त्यांच्या देशव्यापी मोहिमेचा पहिला वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. देशातील वाढत्या लठ्ठपणाच्या समस्येवर मात करण्यासाठी आणि निरोगी आणि सक्रिय जीवनशैली स्वीकारण्यासाठी भारतीयांना प्रेरित करण्याच्या उद्देशाने १ मार्च २०२४ रोजी ही मोहीम सुरू करण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत, नागपूर शहरात २६ ते २९ एप्रिल दरम्यान ४ दिवसांचा फिटनेस ड्राइव्ह आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये शहरातील प्रमुख उद्याने आणि उद्याने समाविष्ट होती:

जॉगर्स पार्क, जपानी बाग, शिवाजीनगर गार्डन, राजीव गांधी पार्क, धरमपेठ येथील धंतोली उद्यान

या मोहिमेचा एकमेव उद्देश होता लठ्ठपणाशी लढा देणे आणि भारताला फिटनेस-जागरूक राष्ट्रात रूपांतरित करणे. देशात लठ्ठपणाचे प्रमाण वाढत असताना, सर्व वयोगटातील लोकांना त्यांच्या जीवनशैलीचा भाग फिटनेस बनवण्यासाठी शिक्षित आणि सक्षम करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला.

गेल्या एका वर्षात, ही मोहीम कोलकाता, दिल्ली, जयपूर, मुंबई, हैद्राबाद, बेंगळुरू, भुवनेश्वर, जमशेदपूर, चेन्नई, गुवाहाटी, गोवा, अहमदाबाद, अमृतसर यासह १५ हून अधिक प्रमुख शहरांमध्ये पोहोचली आणि हजारो लोकांनी यात सहभाग घेतला. ५ वर्षांच्या लहान मुलांपासून ते ९० वर्षांच्या मोठ्यांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या फिटनेस सत्रांमध्ये, वैयक्तिकृत वर्कआउट्समध्ये आणि प्रेरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

सौमेन वर्कआउटचे मालक सौमेन दास यांनी या प्रसंगी आपले विचार मांडले, जागो इंडिया जागो फिटनेस अभियान'चा हा एक वर्षाचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांना एकत्र येताना पाहिले आहे एकाच संदेशासह सर्वांसाठी फिटनेस. १३ वर्षांच्या मुलाला आरोग्याकडे पहिले पाऊल टाकताना किंवा ९० वर्षांच्या वृद्धाला दररोज व्यायाम करून सामाजिक वर्ज्ये तोडताना पाहणे अत्यंत हृदयस्पर्शी आहे. आम्ही केवळ शारीरिक आरोग्यातच नव्हे तर मानसिकतेतही क्रांती घडवत आहोत आणि ही फक्त सुरुवात आहे.

जनतेकडून मिळालेल्या प्रचंड पाठिंब्यामुळे, ही मोहीम अधिक शहरांमध्ये विस्तारित करण्याची आणि सामुदायिक आरोग्य उपक्रमांना बळकटी देण्याची योजना आहे.

'जागो इंडिया जागो फिटनेस कॅम्पेन'च्या यशाने देशातील आरोग्याविषयी वाढती जागरूकता आणि उत्साह अधोरेखित केला आहे. सौमेन वर्कआउटच्या या जोरदार प्रयत्नामुळे प्रत्येक भारतीय आपल्या आरोग्याबद्दल जागरूक झाला आहे आणि फिटनेसला जीवनातील एक आवश्यक सवय बनवली आहे. ही मोहीम प्रत्येक वयोगटातील शक्ती आणि आत्मविश्वासाचा उत्सव आहे निरोगी भारताच्या दिशेने एक शक्तिशाली पाऊल.

# सॅमसंगकडून भारतात २०२५ बीस्पोक एआय अप्लायन्सेस लाँच



**नागपूर, २८ जून :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज आपली २०२५ बीस्पोक एआय अप्लायन्स लाइनअप लाँच केली. ही लाइनअप चार विशिष्ट ग्राहक फायद्यांवर डिझाइन करण्यात आली आहे: ईजी, केअर, सेव्ह आणि सेक्युअर, ज्यामुळे एआयसह तुमचे जीवन उत्साहवर्धक व आनंददायी होते. या अनुभवांना सॅमसंगचे नवीन एआय होम स्क्रिन इंटरफेस, बिक्स्बी वॉईस असिस्टण्टसह द्विमार्गी नैसर्गिक कम्युनिकेशन, सॅमसंग नॉक्स सिक्युरिटी आणि विनासायास स्मार्टथिंग्ज कनेक्टीव्हीटीचे पाठबळ आहे, ज्यामधून भारतातील आधुनिक कुटुंबांना अत्यंत वैयक्तिकृत, ऊर्जा कार्यक्षम आणि सुरक्षित स्मार्ट होम सोल्यूशन्स मिळतात.

''आम्हाला भारतात २०२५ बीस्पोक एआय डिजिटल अप्लायन्सेस लाइन-अप लाँच करण्याचा आनंद होत आहे, जेथे नाविन्यता आणि उद्देशाला एकत्र करण्यात आले आहे. ही फक्त स्मार्ट अप्लायन्सेस नसून भारतातील कुटुंबांसाठी डिझाइन करण्यात आलेली सर्वोत्तम सोबती आहेत,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पर्क म्हणाले.

''आम्हाला विश्वास आहे की, आमचे बीस्पोक एआय अप्लायन्सेस भारतातील आधुनिक कुटुंबांच्या अप्लायन्सेस वापरामध्ये क्रांती घडवून आणतील, ज्यामुळे ग्राहक सर्वोत्तम स्मार्ट होम राहणीमानाचा अनुभव घेऊ शकतील,'' असे सॅमसंग इंडियाच्या डिजिटल अप्लायन्सेस बिझनेसचे उपाध्यक्ष गुफरान आलम म्हणाले.

या नवीन लाँचमधील सर्वोत्तम अप्लायन्स आहे बीस्पोक एआय लॉण्ड्री कॉम्बो ऑल-इन-वन, जी घरातील जागा वाचवणारी, उच्च क्षमतेची, ऑल-इन-वन वॉशिंग मशिन आहे आणि एकाच युनिटमध्ये कपडे धुण्यासोबत सुकवले जातात. यामुळे मशिन्समध्ये कपडे हस्तांतरित करण्याचा त्रास दूर होतो, परिणामत: वापरकर्त्यांचा वेळ वाचतो आणि कपडे धुतल्यानंतर कपड्यांना वास येण्याला प्रतिबंध होतो. एआय वॉश अँड ड्राय असलेले बीस्पोक एआय लॉण्ड्री कॉम्बो लॉण्ड्रीचे वजन, कपड्याचा प्रकार आणि कपड्यावरील डागांना ओळखते, आपोआपपणे प्रत्येक लोडसाठी पाणी, डिटर्जंट, वॉश टाइम आणि ड्राइंग स्थितींना समायोजित करते. यामधून कपडे उत्तमप्रकारे स्वच्छ धुतले जाण्याची आणि वैयक्तिकृत लॉण्ड्री अनुभवाची खात्री मिळते.

# Save Earth Mission ने अहमदाबाद येथे ग्लोबल व्हिजन अनव्हीलिंग कार्यक्रमाची केली भव्य घोषणा



**अहमदाबाद, २८जून :** 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेअंतर्गत अवघ्या १ तासात ५ लाखांहून अधिक झाडे लावून, Save Earth Mission ने हवामान बदलाविरुद्ध ऐतिहासिक पाऊल उचलले आणि जगाचे लक्ष आपल्याकडे वेधले. या जागतिक विक्रम-निर्मिती कार्यक्रमाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुक झाले आणि Forbes, Fox, Business Insider, तसेच इतर प्रमुख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांवर प्रमुखतेने प्रसिद्ध झाले.आता, Save Earth Mission जागतिक स्तरावर आपली उपस्थिती नोंदवण्यासाठी सज्ज आहे.संस्थेने आपल्या सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय कार्यक्रम Save Earth Mission Global Vision Unveiling ह्याची अधिकृत घोषणा केली आहे. हा कार्यक्रम Save Earth Mission च्या जागतिक रणनीतीच्या सुरुवातीचे प्रतीक आहे, ज्याचा उद्देश २०४० पर्यंत ३० अब्ज झाडे लावणे आणि पृथ्वीला नेट झीरो कार्बन उत्सर्जनाच्या दिशेने नेणे आहे.हा ऐतिहासिक कार्यक्रम ३ जुलाई २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता IST, प्रतिष्ठित GIFT City Club, अहमदाबाद येथे आयोजित केला जाईल. ही जागतिक घोषणा Save Earth Mission च्या प्रवासातील एक मोठे आणि निर्णायक पाऊल आहे. हे एक असे व्यासपीठ आहे जिथे संस्था आपला विस्तारित रोडमॅप सादर करेल आणि आंतरराष्ट्रीय चॅप्टर्सना एकत्रित करून हवामान संरक्षणाच्या सामायिक ध्येयाकडे प्रेरित करेल. या कार्यक्रमात Save Earth Mission च्या जागतिक नेटवर्कमधील नेते, प्रतिनिधी आणि स्वयंसेवक सहभागी होतील, जे देशनिहाय वृक्षारोपण मोहिमा, नवीन भागीदारी आणि जलद गतीने पुनर्वनीकरणाच्या प्रयत्नांची पायाभरणी करतील.

कार्यक्रमाच्या ठिकाणाची निवड जागतिक सार्वजनिक मतदान प्रक्रियेद्वारे केली गेली, ज्यामध्ये अबू धाबी, दुबई, गोवा, बँकॉक आणि अहमदाबाद यासारख्या शहरांचा पर्याय म्हणून समावेश होता. सर्वाधिक मते मिळवून अहमदाबादची निवड झाली, ज्याने भारताला या जागतिक हवामान क्रांतीच्या पुढील टप्प्याचे केंद्र बनवले.

Save Earth Mission भारत चॅप्टरचे अध्यक्ष संदीप चौधरी म्हणाले की हा केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी अभिमानाचा क्षण आहे. लोकांनी आपला आवाज उठवला आणि अहमदाबादने जागतिक हवामान एकतेचे प्रतीक बनून एक नवा आदर्श प्रस्थापित केला आहे. ग्लोबल व्हिजन अनव्हीलिंग कार्यक्रमात मी Save Earth Mission चा जागतिक रोडमॅप सादर करेन, ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय वृक्षारोपण मोहिमा, सीमापार सहयोग आणि नागरिक, कॉर्पोरेट्स आणि सरकारांना एकत्र जोडून २०४० पर्यंत ३० अब्ज झाडे लावण्याच्या मिशनला पूर्ण करण्याची योजना असेल.

# निकोबारच्या २४ वे स्टोअरचे रायपूरमधील झोरा मॉलमध्ये उदघाट्न!




**नागपूर, २८ जून :** संथ जीवनशैली आणि आधुनिक भारतीय सौंदर्यशास्त्रावर आधारित डिझाईन-फर्स्ट ब्रँड निकोबारने छत्तीसगडमधील रायपूरमधील झोरा मॉलमध्ये आपले २४ वे स्टोअर उघडले. १,४०९ चौरस फूट पसरलेले हे ठिकाण निकोबारच्या विचारशील जीवनशैली नवीन प्रेक्षकांना हस्तकला, आराम आणि जाणीवपूर्वक निवडींना महत्त्व देण्याची संधी देते.

पती-पत्नी सिमरन लाल राय आणि राऊल राय,यांच्या संकल्पनेतून, निकोबारची स्थापना समकालीन जगासाठी भारतीय जीवनशैलीची पुनर्व्याख्या करण्याच्या हेतूने आणि सहज, पायाभूत आणि सुंदरपणे बनविण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत, ब्रँडने जागरूक खरेदीदारांचा एक समुदाय तयार केला असून तरल कपडे, क्युरेटेड होमवेअर आणि वेगवेगळ्या प्रवासासाठीचे कपडे अश्या वस्तूंकडे आकर्षित होतो. संस्कृती आणि कारागिरीमध्ये रुजलेल्या सामायिक डिझाइन भाषेने सर्वजण एकत्रित आहेत.

निकोबार येथील सी.ई.ओ राशी सेठिया म्हणतात, निकोबारमध्ये, प्रत्येक नवीन बेट (स्टोअर) ही आमची मुळे खोलवर नेण्याच्या दिशेने एक पाऊल आहे आणि आमची पोहोच वाढवते. रायपूर, त्याच्या मजबूत सांस्कृतिक कणा आणि नवीन युगाच्या उर्जेसह, आम्ही भारतासाठी डिझाइन करतो, जागरूक, अभिव्यक्तीशील आणि पायाभूत गोष्टींचे त्याचे प्रतिनिधित्व करतो. या चैतन्यशील आणि विकसित होत असलेल्या शहरात आमचे डिझाइन आणि जागरूक राहणीमान आणण्यास आम्ही उत्सुक आहोत.

स्टोअरचा पत्ता: युनिट क्रमांक यूजी-०२६, वरचा तळमजला, झोरा द मॉल, कृषी महाविद्यालयासमोर, रायपूर ४९२०१२

# श्री सिद्धिविनायक मंदिर न्यास आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा





**मुंबई, २८ जून :** महासागर प्रतिनिधी. श्री. सिद्धिविनायक मंदिर न्यासा तर्फे मंदिर परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन दिनांक रोजी अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिर न्यासाचे अध्यक्ष आमदार मा. सदा सरवणकर यांच्या अधिपत्याखाली चाललेल्या या मंदिरात नवनवीन उपक्रम राबवत असतात यावेळी मंदिरातील सर्व कर्मचारी, अधिकारी, कार्यकारी अधिकारी सौ. विना पाटील, कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी, उपकार्यकारी अधिकारी संदीप राठोड, यांनी सहभाग नोंदविला. यावेळी बोलताना कोषाध्यक्ष त्रिपाठींनी योगाने शरीराला व मनाला ताकदवर ठेवण्यास व स्फूर्ती ठेवण्यास मदत होते. असे यावेळी गौरवउद्गार काढले.

# रणविजय सिंघा झी टीव्हीवरील छोरियाँ चली गाव या शो चे सूत्रसंचालन करणार



**मुंबई, २८ जून :** भारताच्या विविधतेचा आणि भावनिक सखोलपणाचा उत्सव साजरा करणाऱ्या वेगळ्या नॉन-फिक्शन फॉरमॅटच्या परंपरेला पुढे नेत झी टीव्ही वाहिनी छोरियाँ चली गाव या शो ची सुरुवात करण्यासाठी सज्ज आहे. हा ताज्या दमाचा आणि खास रिॲलिटी शो इंडिया आणि भारत या दोन जगांना एकत्र आणतो. आपका अपना झी या नवीन ब्रँड ओळखीअंतर्गत हा शो प्रेक्षकांना परिवर्तन, सांस्कृतिक एकरूपता आणि मानवी नात्यांच्या हृदयस्पर्शी प्रवासावर घेऊन जाण्याचे वचन देतो.

या कार्यक्रमात १२ स्वयंसिद्ध शहरी महिला त्यांचे आरामदायक आणि जलदगती शहरी जीवन सोडून ६० पेक्षा अधिक दिवस भारतीय ग्रामीण भागात घालवतील. कुठल्याही गॅजेट्स, आरामदायक गोष्टी किंवा शॉर्टकट्स न वापरता, त्या खऱ्याखुऱ्या गावातली कामे करतील, दैनंदिन जीवनात सहभागी होतील आणि वर्षानुवर्षांच्या परंपरांची साधेपणा आणि शहाणपण अंगीकारतील. शोची कथा तीन मजबूत स्तंभांवर आधारित आहे. या फॉरमॅटमध्ये खरी भावना आणि ऊब आणत आहे टीव्हीवरील तरुण आणि लोकप्रिय चेहरा रणविजय सिंघा, जो या शोमध्ये सूत्रसंचालक म्हणून सामील झाला आहे. मात्र तो फक्त सूत्रसंचालक नाही, तर मार्गदर्शक, प्रोत्साहक, कथाकथन करणारा आणि गावकऱ्यांचा आवाजही असेल. भारताच्या खऱ्या रूपाशी असलेल्या त्याच्या नात्यामुळे तो स्पर्धकांचे आणि प्रेक्षकांचे योग्य नेतृत्व करू शकतो.

या शोबाबत रणविजय म्हणाला, जेव्हा मी छोरियाँ चली गावच्या संकल्पनेबद्दल ऐकलं, तेव्हा मला लगेचच ती जबरदस्त वाटली. कारण मी स्वतः अशा व्यक्तींपैकी आहे, ज्यांनी शहरी जीवनाच्या सुविधा अनुभवल्या आहेत पण गावाकडच्या मातीशीही माझं घट्ट नातं आहे. या फॉरमॅटने माझ्यासोबत वैयक्तिक पातळीवर संवाद साधला. हा इतर रिॲलिटी शोसारखा नाही, तर हा एक प्रवास आहे जो मानसिकतेत बदल घडवतो. जेव्हा आजच्या जलद समाधानाच्या जगात सगळं काही एका क्लिकवर मिळतं, तिथं हा शो त्या सगळ्या गोष्टींना आव्हान देतो. स्पर्धक प्रत्यक्षात कष्ट करून जेवण मिळवण्याचा खरा अर्थ समजतील. या सगळ्या अनुभवातून एक खरा बदल, साधेपणा आणि काहीतरी वेगळं पाहण्याची संधी मिळते. छोरियाँ चली गाव लवकरच प्रीमियरसाठी सज्ज आहे आणि प्रेक्षक पाहणार आहेत ग्रामीण जीवनाचं खरंखुरं दर्शन, खरी भावना आणि त्यामागचे खरे सामर्थ्य, जेव्हा १२ महिला रणविजयसोबत आपल्या सवयींच्या दुनियेबाहेर पाऊल टाकतील.

## राशीभविष्य

**मेष :** राजकीय पद आणि प्रतिष्ठा वाढेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन मित्र मिळतील. परदेश दौजयावर जाण्याची शक्यता असेल. कुटुंबात काही शुभ कार्य घडेल.

**वृषभ :** आजचा दिवस आनंदाची बातमी घेऊन येईल. जे चांगल्या नोकरीच्या शोधात आहेत. त्यांना यश मिळेल. तुमचे आरोग्य ठीक राहील. कुटुंबात शुभ कार्याचे योग बनतील. परस्पर मतभेद दूर होतील.

**मिथुन :** वाहन वापरताना काळजी घ्या. काळजीपूर्वक विचार करून कोणतेही नवीन काम करा. विरोधक राजकारणात सक्रिय राहतील. नोकरी मिळविण्याच्या प्रयत्नांमध्ये अडथळा येऊ शकतो.

**कर्क :** कोणताही कौटुंबिक वाद गंभीर वळण घेऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवावे. लांबचा प्रवास किंवा परदेश दौरा टाळा. अन्यथा प्रवासादरम्यान तुम्हाला अडचणी येऊ शकतात.

**सिंह :** आजचा दिवस धावपळीचा असेल. तुमचे मन अशांत राहू शकते. तब्येत बिघडू शकते. व्यवसायात संयमाने निर्णय घ्या. कारण एखादी मोठी डील हातातून निसटण्याची शक्यता आहे.

**कन्या :** आजचा दिवस चांगला राहील. तुमचे एखादे अडलेले जुने काम पूर्ण होईल. ज्यामुळे मनात प्रसन्नता राहील. कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. आरोग्यात चढ-उतार राहतील. व्यवसायातही लाभाचे योग आहेत.

**तुळ :** व्यवसाय थोडा मंदावेल. काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने तुमचे मनोबल आणि धैर्य वाढेल. आज, वरिष्ठ अधिकाजयांशी तुमची जवळीक वाढेल. राजकारणात तुमचे वर्चस्व वाढेल.

**वृश्चिक :** आज तुम्हाला काही चांगली बातमी मिळेल. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील. नोकरीत पदोन्नतीसह तुम्हाला महत्त्वाची जबाबदारी मिळेल. अपेक्षित यश न मिळाल्याने तुम्हाला दु:ख वाटू शकते.


**धनु :** आजचा दिवस चढ-उतारांनी भरलेला असेल. तुमच्या तब्येतीची काळजी घ्या. आज विरोधकांपासून सावध रहा. व्यवसायात मोठा धोका पत्करू नका, कारण नुकसानीची शक्यता आहे.

**मकर :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी नवीन मित्र मिळतील. व्यवसायात प्रगती होईल आणि आर्थिक लाभही होईल. नोकरीसाठी तुमचा शोध पूर्ण होईल. लग्नाशी संबंधित कामात तुम्ही अधिक व्यस्त असाल.

**कुंभ :** व्यवसायात एखादा मोठा करार किंवा निकाल तुमच्या बाजूने होऊ शकतो. तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. तुम्ही कुटुंबासोबत धार्मिक यात्रेला जाऊ शकता. कुटुंबात वाद निर्माण झाल्यास शांत रहा.

**मीन :** तुम्हाला नवीन कपडे आणि भेटवस्तू मिळतील. तुम्हाला शुभ कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. प्रवासाचे कार्यक्रम आनंददायी असतील. कुटुंबात पत्नीसोबत मतभेद होऊ शकतात.

## शब्दकोडे क्रमांक २१४९



**आडवे शब्द :-**
१) शिक्षक
६) फुरसत, अंगात येणे
९) फणसाचा एक प्रकार
१०) एक चतुर्थांश भाग
११) लग्नकार्यासाठी जमलेली मंडळी
१२) संरक्षण खात्याचा कारभार पाहणारा मंत्री
१४) सावली
१५) बोलाविणे
१७) आवडता, प्रिय
१९) हत्यार, उपकरण,
२०) एक अत्तर, एका हिंदी चित्रपटाचे नाव
२१) रविवार
२३) रोखलेली नजर
२४) सध्या
२५) संताप
२७) रस्ता
२८) राखणदार
३०) ऐन, बहर, उणीव भरुन काढणारी गोष्ट
३१) नावाचा जयघोष
३४) माळ धारण करणारा
३७) अंत:करण
३९) धन, ममता
४०) गुजराती नृत्यप्रकार
४३) गळ्यामागचा अवयव
४४) सारखा
४६) ओरखडा
४७) अति उंचावरून फिरणारा पक्षी
४८) वागणूक
४९) कार्य
५०) शपथ
५१) दौत, लेखणी ठेवण्याची लहानशी पेटी
५३) केस कापणे
५५) किंमत
५६) एका बाजूस झुकणे
५७) कसदार
५९) रसाळ
६१) चेहेऱ्यावरील तेज, कांती
६४) मनाचा झालेला ग्रह
६६) गाई-बैलांची चघळत, सावकाश खाण्याची क्रिया
६८) श्रीविष्णू, कमळाचे तळे
७०) प्रजा
७१) कुंभाराची भट्टी
७३) मार्ग
७४) जोरजोराने हसणे
७६) खसखस लावलेला एक गोड पदार्थ
७८) एक नाजूक सुगंधी फूल,
७९) मृत्यू नसलेला
८०) मुस्लीमांचा उपवासाचा महिना
८१) शरम

**उभे शब्द :-**
२) भारतीय चलन
३) प्राण
४) दार
५) होम, यज्ञात आहुति टाकणे
६) *** **** गाढवाचे पाय धरी (म्हण)
७) मंत्रीमंडळ
८) राख,
९) कागद, कापड कापण्याचे साधन
१३) शनिवार
१४) शोभिवंत, चांगला, फक्कड
१५) *** जावक
१६) एक उद्गार शिव! शिव!
१८) विरोध, प्रतिबंध
१९) तर्क, अंदाज
२२) खुंट, आचळ
२६) हत्ती
२९) माफी मागणारा
३१) एखाद्यास अति आग्रह करून एखादे कार्य करण्यास लावणे (वा.प्र.)
३२) संगीतातील एक राग
३३) कर्णेंद्रिय
३५) मडके
३६) महान
३८) आईचा भाऊ
४१) उष्ण
४२) शुद्ध सोने
४३) मनुष्य जात
४४) विषमच्या विरुद्ध
४५) मऊ
४९) लोखंड गुळगुळीत करण्याचे हत्यार
५०) सूर्याचे एक नाव
५१) चिवचिवाट, आवाजांचा गोंधळ
५२) सेवक
५४) पुन्हा
५५) राक्षस
५८) शहाणा, सुज्ञ, हुषार
६०) सदोदित, एकसारखे
६२) हिमालयातील एक प्राणी
६३) संगीतातील सताल रचना
६५) एक इंग्रजी महिना, निबर
६७) चेष्टा,
६९) महिलांची छेड काढणारा
७१) चेहरा, मुख
७२) मत्स्य
७५) किंमत, प्रत्येक
७६) बकरी
७७) वर्ष, सन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर ●रविवार,दि.२९ जून २०२५

# अकोला

पान ६

## गांधी रोड ते बसस्थानक पायी चालणेही धोकादायक



**अकोला :** गांधी रोड, धिंग्रा चौक, टॉवर चौक, जयहिंद चौक व बसस्थानक - रेल्वे परिसर सध्या अक्षरशः 'ऑटो- झोन' बनले असून, रस्त्यांवर शेकडो सवारी ऑटोरिक्षांचा अतिक्रमणमेळा सुरूच आहे. महापालिकेने उभारलेल्या अधिकृत स्टॅण्डना केराची टोपली दाखवत हे रिक्षेवाल्यांचे 'चलते स्टॅण्ड' सुरूच असल्याने ४० फूट रूंदीचा मार्ग अर्ध्यावर आणत आहेत. परिणामी, दुचाकी-चारचाकींना एका रांगेत मार्ग काढावा लागत असून, पायदळचालकांना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. भर गर्दीतच प्रवासी उतर- चढ करणाऱ्या रिक्षांमुळे मागील वाहनांना अचानक ब्रेक द्यावी लागत असल्याने परिणामी किरकोळ अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. साइड देण्याची मागणी केली तरी चालकांची शिवीगाळ- हुल्लडबाजी सुरू होते, अश्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्यामुळे ट्रॅफिक व परिवहन यंत्रणांनी अश्या वाहतुकीची कोंडी करून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंडात्मक कारवाई सुरु करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## दहा दिवसात प्रमाणपत्र सादर करा!: किरीट सोमय्या



**■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

महापालिकेने नायब तहसीलदाराच्या आदेशाने वितरित केलेले जन्मदाखले रद्द केले आहेत. यापैकी ८२ दाखले परत घेतले असून, उर्वरित नागरिकांशी संपर्क साधण्याचे काम महापालिकेकडून सुरू आहे. यापुढे काय कार्यवाही करायची यासंदर्भात प्रशासनाला सूचना दिला असल्याचे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सांगितले. किरीट सोमय्या यांनी महापालिकेत भेट देऊन आयुक्त यांच्या दालनात वरील कार्यवाहीचा आढावा घेतला. किरीट सोमय्या म्हणाले की, बनावट जन्म प्रमाणपत्रांच्या मदतीने मालेगावमधील अनेक नागरिकांनी पासपोर्ट बनवले आणि परदेशात गेले.

अकोल्यातही असे प्रकार घडू शकतात, याची चौकशी करणे अत्यंत महत्वाचे आहे. अकोला शहरात, नायब तहसीलदारांनी २२०० जन्म प्रमाणपत्र अर्ज दिले होते, जे रद्द करण्यात आले आहेत. ते परत घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत ८२ नागरिकांकडून प्रमाणपत्रे परत घेण्यात आली आहेत. तर ११०९ जणांशी संपर्क साधण्यात आला आहे परंतु अद्याप १ हजाराहून अधिक नागरिकांशी संपर्क न झाल्याने प्रमाणपत्रे परत घेण्याची प्रक्रिया लांबणीवर पडत आहे. त्यामुळे भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन पुढील १० दिवसांत प्रमाणपत्रे सादर करण्याची सूचना केली. यापूर्वी, महापालिकेच्या जन्म आणि मृत्यु नोंदणी विभागांतर्गत तहसील कार्यालयाच्या आदेशपत्रानुसार जन्म नोंद नसलेल्या नागरिकांना जन्म प्रमाणपत्रे देण्यात आलीहोती. तथापि, काही बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय नागरिकत्व मिळिवण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केल्यानंतर, जिल्ह्यातील काही नागरिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. यानंतर, अकोला तहसील कार्यालयाने महापालिकेच्या जन्म आणि मृत्यु नोंदणी विभागाला पत्र लिहून बनावट कागदपत्रांच्या आधारे जारी केलेल्या जन्म प्रमाणपत्रांची चौकशी करण्यास सांगितले. अकोला महानगरपालिका प्रशासनाने तातडीने ही प्रक्रिया सुरू केली आणि ७,००० हून अधिक जन्म दाखल्यांची यादी तयार केली आणि त्यांची कसून तपासणी केली.

## रेल्वेस्थानक परिसरातून मोबाईल लंपास

**■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

अहमदाबाद हावडा एक्स्प्रेसने शेगाव अकोला प्रवास करून अकोला येथे आल्यावर स्टेशनबाहेर येताना शर्टच्या खिशातील मोबाइल चोरीला गेल्याची घटना गुरुवार, २६ जून रोजी घडली.

यांप्रकरणी गुन्हा नोंद करत पुढील तपास अकोला लोहमार्ग पोलिसांनी सुरू केला आहे. दरम्यान, वडिलांनी मुलगा अकोला पोहोचला का, विचारण्यासाठी मोबाइलवर कॉल केला असता, समोरून शरद मोरे मलकापूर पोलिसबोलतोय असे सांगण्यात आले. चोर पकडल्याचे सांगत त्याच्याकडून मोबाइल मलकापूर येथे मिळाला असल्याचे सांगून उद्या आधारकार्ड घेऊन या, असे सांगण्यात आले आणि मोबाइलचा लॉक विचारून घेतल्यानंतर मोबाइल बंद करण्यात आला.

## डाबकी रोड रुंदीकरणाने दुकानदारांचे गणित बिघडले



**■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

डाबकी रोड केवळ एक रस्ता नाही, तर शेकडो लोकांच्या रोजीरोटीचा आणि रोजच्या जगण्याचा आधार आहे. हे रुंदीकरण लवकरात लवकर पूर्ण होऊन डाबकी रोड पुन्हा पूर्वीसारखा गजबजेल आणि इथल्या नागरिकांच्या समस्या दूर होतील. पण, महापालिकेच्या ढिसाळ कारभाराचा फटका येथील सर्वसामान्यांना बसत आहे. अकोल्यातील डाबकी रोड म्हणजे गजबजलेला रस्ता दूर्तफा दूकानांमध्ये गर्दी, पण सध्या इथे केवळ धूळ, खड्डे आणि अर्धवट कामांचा पसारा आणि पावसाने निर्माण झालेला चिखलपूरा दिसतोय. रुंदीकरणाच्या नावाखाली सुरू असलेल्या कामांनी स्थानिक दुकानदार आणि रहिवाशांचे जीवन अक्षरशः विस्कळीत केले आहे. एकेकाळी दुकानांबाहेर ग्राहकांची ग्राहकांची रीघ लागलेली असायची, तिथे आज शुकशुकाट आहे. व्यापा? ऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले असून, त्यांचे व्यवसाय ठप्प झाले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यावर ढिगारे आणि बांधकाम साहित्य पसरलेले असल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. 'आमचे पान २ वर

रोजचे उत्पन्न निम्म्यावर आले आहे. भाड्याचे पैसे काढणेही मुश्कील झाले आहे,' असे एका दुकानदाराने हताशेने सांगितले. व्यवसाय ठप्प झाल्यामुळे अनेकांच्या घरखर्चीचे नियोजन बिघडले आहे.

स्थानिक नागरिकांच्या समस्यांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.खड्डे आणि अर्धवट कामांमुळे अपघात वाढले आहेत. नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतोय. डाबकी रोड रुंदीकरणाचे काम जलद गतीने होण्याची तीव्र गरज नागरिक व्यक्त करत आहेत. पावसाळ्यात पाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## अकोला विभागात आषाढी वारीसाठी
# तब्बल २७० एसटी बसेस सज्ज!



**■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

आषाढात वारकऱ्यांसह विठ्ठल भक्तांना पांडुरंगाची ओढ लागली असते. आषाढी एकादशीला संपूर्ण राज्यातून पालख्या, दिंडीसह हरीनामाचा गजर करित लाखों वैष्णवांचा मेळा श्रीक्षेत्र पंढरपूरात भरतो. यंदाच्या आषाढीवारीच्या अनुषंगाने विठ्ठलभक्तांना आषाढी वारी घडविण्यासाठी एसटी महामंडळ सज्ज झाली आहे. एसटभ महामंडळाच्या अकोला विभागातून यावर्षी तब्बल २७० बसेस धावणार आहेत. अकोला विभाग नियंत्रक यांच्या मार्गदर्शनात २ ते १३ जुलै या कालावधीत पंढरपूर यात्रा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

आषाढी पंढरपूर यात्रा २ ते १३ जुलैपर्यंत यात्रा पार पडणार आहे. यात्रेचा मुख्य दिवस रविवार, ६ जुलै रोजी 'आषाढी एकादशी' आहे. अकोला विभागाची यात्रा नियोजन बैठक २५ रोजी पार पडली. यात्रेच्या वाहतुक व्यवस्थेकरीता सहायक वाहतुक अधीक्षक प्र. पू. इंगोले यांची यात्रा प्रमुख नेमणुक म्हणुन करण्यात आली आहे. या समितीमध्ये उपयात्रा प्रमुख वाहतूक निरीक्षक प्र. कि. इंगळे, वाहतूक निरीक्षक प्र. तु. साखरकरा, वाहतूक निरीक्षक रा. आ. कोळकर, वाहतूक नियंत्रक गो. बा. झळके, ग. बा. चव्हाण, अ. म. नारंग, आनंद जागीरदार, शा. शि.खंडारे, नि. पं. गीते यांचा समावेश आहे.अष्टमी गुरुवार ३ जुलै, रिंगण -सोहळा शुक्रवार ४ जुलै, रविवार ६ जुलै आषाढी एकादशी (मुख्य दिवस), गुरुवार १० जुलै पौर्णिमा असून याकरिता पंढरपूर येथेही जादा बसेसची/ व्यवस्था करण्यात आली आहे. अकोला विभागातील बसेस पार्कींग व्यवस्था यावर्षी 'भिमा बसस्थानक, मोहोळ रोड, देगांव शेड क्र. १७ येथे आहे. यात्रा बसेस पार्कींग व्यवस्था यावर्षी 'भिमा बसस्थानक, मोहोळ रोड, देगांव शेड पंढरपुर येथे राहणार आहे. अकोला विभागाकरिता यात्रेसाठी नागपुर प्रादेशिक विभागाकडून देण्यात येणाऱ्या बसेस उपलब्ध होणार असल्याची माहिती आहे. सदर बसेस अकोला - १, अकोला - २, वाशिम व रिसोड या आगारांना नियोजनानुसार पुरविण्यात येतील.

## स्मार्ट मीटरविरोधात शिवसेनेचे महावितरणला निवेदन

**अकोट :** भाजप सरकारच्या काळात स्मार्ट मीटर बसवण्याचा कार्यक्रम महावितरणने सुरू केला आहे. सदर कंत्राट सरकारने अदानी ग्रुपला दिला असून स्मार्ट मीटर लावण्याच्या माध्यमातून जनतेची फसवणूक चालली आहे. याचा विरोध म्हणून शिवसेनेच्यावतीने अकोट महावितरण कार्यालय येथे जाऊन मुख्य अभियंता यांना निवेदन देण्यात आले.स्मार्ट मीटर तसेच इलेक्ट्रॉनिक मीटर बसवण्याची ग्राहकांना सक्ती करू नये, ग्राहकांकडे पूर्वीचे ज्या कंपनीचे मीटर आहे तेच राहू द्यावे, या मीटरमध्ये काही बिघाड झाला असेल तर त्याच कंपनीचे मीटर परत बसविण्यात यावे, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. सदर निवेदन शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे, तालुकाप्रमुख ब्रम्हा पांडे, वैद्यकीय आघाडीचे रोशन पर्वतकार, विजय ढेपे, सहकार सेनेचे प्रा. अतुल म्हैसने, माजी पं.स. सदस्य उपस्थित होते.

## उपजिल्हा रुग्णालयातील बालकांना कपडे वाटप



**मूर्तिजापूर :** समाजकार्यात अग्रेसर ज्ञान नर्मदा बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष सुनीता विष्णू लोडम यांच्या पुढाकाराने लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त नवजात शिशू बालकांसाठी कपडे व रुग्णांना फळ, बिस्कीट, मिठाई वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता अध्यक्ष म्हणून अटल फाउंडेशन अकोला जिल्हाध्यक्ष रूपाली तिडके तर प्रमुख अतिथी वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र नेमाडे, डॉ. मंदार मुळे, रुग्णसेवक विष्णू लोडम, डॉ. स्वाती पोटे, कविता साखरे, अनघाधामोरे, माया दवंडे, सचिन धामोरे, नम्रता भिंगारे, सहाय्यक अधीक्षक संजय गणोरकर, विजय डांगे, नितीन देशमुख, नानासाहेब चेडे, माजी मुख्याध्यापक रामकृष्ण आसरे, ज्ञानेश्वर भड गुरुजी, मेजर वैभव भगत, विनोद इंगळे, शिवानी श्रीराव, विभूती लोडम, सुनिता भुजाडे, अतुल गावंडे, रेखा कोथळकर, राम लोडम आदी मान्यवर व संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी रूपाली तिडके यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तसेच ज्ञान नर्मदा संस्थेचे मार्फत सुरू आहे.

## थोडक्यात

### मनुष्याच्या मन:शांतीसाठी मेडिटेशन आवश्यक

**अकोला :** आजच्या अत्यंत धकाधकीच्या जीवनात आप तणावात जीवन जगत आहे, त्यामुळे लोकांचे आरोग्य बिघडत आहे, उत्तम आरोग्यासाठी मनशांती आवश्यक असून त्यासाठी नियमित मेडिटेशन आवश्यक आहे, असे प्रतिपादन बीके डॉ. श्रद्धा उगले यांनी केले. रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थच्यावतीने डॉक्टर डे पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थचे अध्यक्ष प्रा. प्रवीण ढोणे होते तर सचिव प्रशासन डॉ. मेघना गांधी, सचिव प्रकल्प नंदकिशोर पाथ्रीकर मंचावर उपस्थित होते. प्रमुख अतिथींचा परिचय रुजिता खेतकर यांनी करून दिला.रोटरी क्लबतर्फे डॉ. श्रद्ध उगले, डॉ. जुगल चिरानिया, डॉ. सुरेश तारे, डॉ. तुषार वोरा, डॉ. शिल्पा चिराणीया, डॉ. श्रद्धा अग्रवाल, डॉ. मयूर अग्रवाल, डॉ. मेघना गांधी, डॉ. गजानन वाघोडे, डॉ. प्रमोद चिराणीया, डॉ. अभय राऊत, डॉ. श्रीकृष्ण गावंडे, डॉ. श्रध्दा ढोणे, डॉ. सत्यजित कुचर, डॉ.इंद्रजीत देशमुख, डॉ. भूपेश पराडकर, डॉ. राहुलला डॉ. पीयूष भिसे, डॉ. उजली सोमानी आदींना डॉक्टर-डे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय भाषण प्रा. प्रवीण ढोणे यांनी केले. संचालन डॉ. मेघना गांधी यांनी केले. आभार नंदकिशोर पाथ्रीकर यांनी मानले.

### अकोल्यातील शाळांमध्ये व्यसनमुक्तीची जनजागृती



**अकोला :** जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त एमआयडीसी पोलिस स्टेशनच्यावतीने विविध शाळांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जनजागृती करत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रभावी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा शिवर, तापडिया स्कूल शिवर, सय्यद मोहसिन उर्दू स्कूल शिवणी, हनुमंत महाविद्यालय शिवणी, जुबली इंग्लिश स्कूल कुंभारी, पंजाबराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालय बाभूळगाव आणि रॅलीज इंडिया लिमिटेड कंपनी (एमआयडीसी क्र. ०३) येथे पोलिस पथकाने भेट देत व्यसन मुक्ती रॅली आणि चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत व्यसनमुक्तीचे संदेश असलेले पोस्टर्स सादर केले. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घेतली. त्या संदर्भातील प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरीही केली. या कार्यक्रमात मान्यवरांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे आरोग्यावर व आयुष्यावर होणारे घातक परिणाम समजावून सांगितले. या संपूर्ण उपक्रमाचे नेतृत्व एमआयडीसीच्या पोलिस निरीक्षक वैशाली मुळे यांनी केले. त्यांच्यासोबत पोलिस हवालदार गजानन मगर, पोलिस हवालदार संतोष वानखडे, महिला पोलिस अंमलदार रेणुका भगत आदींनी परिश्रम घेतले.


उन्हाळ्यात गाडी लावायला झाड शोधता ना ? मग आता पावसाळ्यात झाड लावायला जागा शोधा

## सहाय्यक धर्मदाय आयुक्त एमपी पाटील याची धर्मार्थ ग्रामीण आयुर्वेद रुग्णालय पातुर येथे भेट



**■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

सहाय्यक धर्मदाय आयुक्त न्यायाधीश एमपी पाटील यांनी आज स्वर्गीय डॉक्टर नलिनीताई राऊत धर्मार्थ ग्रामीण आयुर्वेद रुग्णालय पातुर येथे भेट देऊन पाहणी केली, यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉक्टर साजिद शेख सर व प्राचार्य डॉक्टर जयश्री काटोले मॅडम यांनी त्यांचे स्वागत केले व सत्कार केला, याप्रसंगी धर्मदाय कार्यालयाचे अधीक्षक श्री विशाल जाधव व इन्स्पेक्टर विक्रम पवार यांचे सह रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी श्री सोमानी सर डॉक्टर मावळे मॅडम डॉक्टर वसीम सर डॉक्टर नवीन देवकर डॉक्टर दिलीप अटकर धनंजय मिश्रा उपस्थित होते यावेळी न्यायाधीश पाटील यांनी रुग्णालयातील विविध विभागाची पाहणी केली व रुग्णांची भेट घेऊन विचारपूस केली रुग्णालयात राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती यावेळी संचालक डॉक्टर साजिद शेख सर यांनी दिली.

## तेल्हारा नगर परिषद शाळामध्ये सेमी इंग्लिश वर्गाची सुरुवात

**■तेल्हारा,दि २८ (प्रतिनिधी) :**

येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ज्ञानपीठ नगरपरिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा क्रमांक १ मध्ये तेल्हारा न.प. मुख्याधिकारी सतीश गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली नव प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रवेश उत्सव कार्यक्रमांमध्ये बोलताना मुख्याधिकारी सतीश गावंडे यांनी नागरिकांना आवाहन केले की शासकीय शाळेमध्येच विद्यार्थ्यांना घालून उज्वल भविष्य उज्वल पिढी निर्माण करावी. कारण सरकारी शाळा जगल्या तरच येथील सर्वसामान्य जगू शकेल मी सुद्धा जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेऊन मोठ्या पदावर पोहोचलो आहे त्यामुळे प्रत्येक पालकांनी आपली जबाबदारी पार पाडून सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रवृत्त करावे आणि शासकीय योजनांचा लाभ घ्यावा असे आपल्या भाषणात त्यांनी मत व्यक्त केले. यावेळी नवप्रवेशोत्सव कार्यक्रम ास न .प. चे प्रशासन अधिकारी हिरालाल अग्रवाल, शाळा समितीचे अध्यक्ष गोपाल सोळंके, उपाध्यक्ष नंदिनी पोहरकार, पालक अनिल मेतकर, निवृत्त अध्यापक गुलाबराव मानकर, ज्येष्ठ पत्रकार सुरेश शिंगणारे, पत्रकार सत्यशील सावरकर, पत्रकार पंकज भारसा कळे पत्रकार रामभाऊ फाटकर मुख्याध्यापक दीपक कोपरे, फातेमा बी शेख इसाक इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेने पहिलीपासून सीबीएसीई अभ्यासक्रमासह सेमी इंग्लिश वर्ग यावर्षीपासून सुरू केले. असून इयत्ता पहिलि १९ विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदविला आहे. नवोदित विद्यार्थ्यांचे पुष्प चॉकलेट देऊन मंचावरील मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी उन्हाळी सुटल्यानंतर २०२५-२६ या नवीन शैक्षणिक वर्षाला आजपासून सुरुवात होत असल्या मुळे शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा होत असून शाळेच्या पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, स्कूल बॅग चे वितरण केले.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Mother Name Change in My Passport No:- J9292106
**----From----**
**KAUSHALIYA MOHANDAS BAJAJ**
------TO------
**KAUSHLYABAI MOHANLAL BAJAJ**
**My Residential Address is -** Opp. Anandpur Asharam Sindhi Camp Pakki Kholi Akola 444004.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
**----From----**
**JAYKUMAR MOHANDAS BAJAJ**
------TO------
**JAY MOHANLAL BAJAJ**
My Passport No Is - J9292106
**My Residential Address is -** Near Anandpur bhavan Sindhi Camp Pakki Kholi Akola 444004.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Father Name Change in my Passport No:- J9292106
**----From----**
**MOHANDAS NEKOMAL BAJAJ**
------TO------
**MOHANLAL NIKOMAL BAJAJ**
**My Residential Address is -** Near Anandpur bhavan Sindhi Camp Pakki Kholi Akola 444004.

## छत्रपती शाहू महाराज जयंती व आ. अमोल मिटकरीच्या वाढदिवशी वृक्षारोपण



**■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**

सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विकास मंडळ कडून छत्रपती शाहू महाराज जयंती तसेच माननीय आमदार अमोल दादा मिटकरी यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व शालेय मुलांचा सत्कार समारंभ शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मा आमदार अमोल दादा मिटकरी माजी सभापती प्रतिभाताई अवचार माजी महापौर मदन भरड राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष बदर जमा साहेब म रा प्रदेश सचिव उज्वलाताई राऊत संस्था अध्यक्ष सौ रंजनाताई शिरसाट उपाध्यक्ष रूपाली वानखडे सचिव विजय भोजने, कोषाध्यक्ष सौ अंजू ताई तेलगोटे सहसचिव सौ शितलताई जंजाळ सदस्य सौ वनिता हिवराळे सौ लक्ष्मी गजभार सौ ज्योतीताई भोजने मोहन हिवराळे माजी शिक्षक देवानंद जंजाळ माजी सैनिक राजेंद्र तेलगोटे उपस्थित होते.

## निधन वार्ता

### ह.भ. प. नारायण महाराज तराळे यांचे वैकुंठगमने



**अकोला :** अकोला जिल्ह्यातील वारकरी संप्रदायातील जेष्ठ संत हभप नारायण महाराज तराळे यांचं आज वृद्धापकाळाने निधन झालंय. मृत्यूसमयी ते ९८ वर्षांचे होतेय. त्यांनी बाळापूर तालुक्यातल्या व्याळा गावी त्यांनी अखेरचा श्वास घेतलाय. वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांनी वारकरी संप्रदायाची धुरा खांद्यावर घेतलीय. त्यांनी ६० वर्ष सलगपणे पंढरीची वारी केलीय. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर त्यांनी कीर्तनातून वारकरी संप्रदायाची सेवा केलीय. त्यांचे वारकरी संप्रदायातील 'विरह अभंग' खुप प्रसिद्ध आहेय. उद्या सकाळी १० वाजता त्यांच्यावर व्याळा या त्यांच्या मुळगावी अंत्यसंस्कार होणारायेत. महाराष्ट्रभरातून उद्या त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी वारकरी मंडळी उपस्थित राहणार आहे येत.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९१२२९६००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम खोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)



# भक्तिमार्ग



बया बया बया, काय झालं बया?
दादला नको गं बाई
मला नवरा नको गं बाई।
मोडकंच घर, तुटकंच छप्पर
पन ऱ्हायाला जागा नाही
मला दादला नको गं बाई।।

– संत एकनाथ

आम्ही जावें कवण्या ठायां
न बोलसी पंढरीराया।।
सरिता गेलीं सिंधूपाशी।
जरी तो ठाव न दे तिसी।।
जळ कोपलें जळचरासी।
माता न घे बालकासी।।

– संत जनाबाई



**पाऊस कधीच एकटा येत नाही. त्याच्याबरोबर सुखाच्या असंख्य क्षणांची झुंड असते. झुंडीतले हे क्षण चहुदिशांना विखुरतात आणि प्रत्येकाला काही ना काही देऊन जातात. पावसाची झड भूमीत निजलेल्या बिजांना अंकूर देते, मरगळलेल्या अपेक्षांना आशेचे धुमारे फुटतात. हीच झड कलाकारांची प्रतिभा फुलवते. कष्टकरी शेतकऱ्यांच्या तनामनात कार्ययज्ञ चेतवण्याची प्रेरणा देते. म्हणूनच पावसासाठी भावनेच्या पायघड्या पडतात.**



## येता पावसाच्या सरी

काहींचे पदरवच अनोखी अनुभूती देणारे असतात. घरात तान्हुलं येणार असल्याची शुभवार्ता कळण्याचा अवकाश... कृश राकट बोटांना तो मऊमुलायम स्पर्श लागलेला असतो. घरात पैसारूपी लक्ष्मी येणार असल्याच्या शक्यतेनेही काहींच्या डोळ्यांपुढे भरलेल्या तिजोऱ्या फिरायला लागतात. नववधूचे पाय घराला लागणार ही कल्पनाच प्रौढ मातृ हृदयाला संसाराच्या परिपूर्तीचा आनंद देऊन जाते. वैयक्तिक पातळीवरील या साध्या घटना आनंदाची अशी उत्कट अनुभूती देऊन जात असतील तर अवघ्या चराचराला संजीवनी देणाऱ्या वरुणराजाच्या आगमनाचा आनंद काय वर्णावा? कारण हा एखाद-दुसऱ्या व्यक्तीच्या अंगणी नव्हे तर सृष्टीच्या प्रांगणी सजणारा सोहळा आहे. मंगल कार्याच्या वेळी घरामध्ये लावल्या जाणाऱ्या धूपदिपाने चार भिंती गंधभारीत होतात. मात्र हा वरुणराजा येतो तेव्हा अवघी धरती गंधवती होते. तो गंध श्वासामध्येच नव्हे; तर शरीरामध्ये भरून उरतो. त्यात गंधाबरोबरच ओलावा आहे, गारवा आहे, शांतता आहे, नाद आहे आणि लयही आहे. सुगंधाची ही कुपी अकदी अल्पकाळच उघडते पण असा प्रभाव निर्माण करणारा सुगंधी द्रव बनवणं वर्षानुवर्षांच्या प्रयत्नांनंतरही कोणाला साधलेलं नाही. घरातल्या शुभकार्यात वाद्यनाद होतो. शंक-घंटा वाजवल्या जातात, पण या शुभप्रसंगी गजर होतो तो ढगांच्या ढोलांचा. कोणाचे ना कळे... पण दणकट हात या पोकळ आवरणावर पडतात आणि कडाडणारा ध्वनी छातीच्या फासळ्या पार करून थेट हृदयात घुमतो. ढोल, मृदंग, डफ अशा सर्व मर्दानी वाद्यांचा उच्चारवरही हा परिणाम साधू शकणार नाही. वाद्यवृंदातील एखाद्या वाद्याने वेगळाच साज छेडावा तसा मधूनच वारा शीळ घालतो. वाऱ्याच्या या वेगाने वृक्ष पिंगा घालू लागताच त्याचं ते कमरेत वाकून घुमणं एका वेगळ्याच नादाची उत्पत्ती करतं. पानांची सळसळ परमोच्च बिंदू गाठते. या नांदीनंतर मात्र एक लय मिळते आणि आरंभीच्या कल्लोळानंतर मैफलीत शांतता पसरावी आणि कसलेल्या कलाकाराच्या स्वरांनी सर्वांचा कब्जा घ्यावा तसं काहीसं होतं. आता पंचेंद्रिय त्या स्वर्गीय स्वरांशी अद्वैत पावलेले असतात. एक वेगळं विश्वचं निर्माण झालेलं असतं. तिथे सगळे त्या स्वरानंदात आकंठ बुडलेले... पावसाची लय असाच आनंद देऊन जाते. कधी खर्ज, कधी मध्यम तर कधी तार सप्तकात घुमणारा त्याचा स्वर सर्वांनाच मंत्रमुग्ध करतो, त्याचे आलाप मोडून टाकतात. अवघी सृष्टी ‘मल्हार’मय होऊन जाते. या अवलिया कलाकाराने मैफिलीवर साम्राज्य गाजवलेलं असतं.

पाऊस कधीच एकटा येत नाही. त्याच्याबरोबर सुखाच्या असंख्य क्षणांची झुंड असते. झुंडीतले हे क्षण चहु दिशांना विखुरतात आणि प्रत्येकाला काही ना काही देऊन जातात. पावसाची झड भूमीत निजलेल्या बिजांना अंकूर देते, मरगळलेल्या अपेक्षांना आशेचे धुमारे फुटतात. हीच झड कलाकारांची प्रतिभा फुलवते. कष्ट शेतकऱ्यांच्या तनामनात कार्ययज्ञ चेतवण्याची प्रेरणा देते. पावसाची झळ मंदावलेल्या अर्थचक्राला गती देते. फुरंगटून दूर गेलेल्या लक्ष्मीला आवताण देते. या सरी सुकलेल्या झाडांनाच नाही तर सजिवांच्या वठलेल्या इच्छाशक्तीला पुनर्जिवीत करतात. पहिल्या पावसासरशी फुफाटखाली बसतो. आतापर्यंत सैरभैर होऊन उठणारा तो फुफाटा व्यग्रतेचाही असतो. अस्वस्थतेचा असतो. आशंकांचा असतो. पण एका सरीमध्ये ही अस्वस्थता शांत करण्याची शक्ती आहे. गृहिणीच्या अनुभवी हातांनी ओंजळभर पाण्याच्या सपकाऱ्याने चुलीत फुललेले निखारे शमावावेत तसा हा पर्जन्यराजा एका क्षणातच निराशेचे वणवे शमवतो. वेळेवर आलेला आणि निर्धारित वेळेत मनसोक्त बरसणारा पाऊस शेताशिवारात सोन्या-मोत्याची पेरणी करून जातो. पाण्याने भरलेल्या विहिरी सप्तनद्यांचं मांगल्य मिरवतात. डोंगरदऱ्यांमधून वाहणारे झरे, उंचावरून कोसळणारे प्रपात, भरलेले जलाशय, शांत वाहणारे ओहोळ पुढील वर्षभरासाठी धरतीच्या पोटातील कणग्या भरत राहतात. हा ठेवा येणाऱ्या प्रत्येक क्षणाची तहान भागवत असतो.


पाऊस म्हणजे नवजीवन जगणं सुरू असतं. पण त्यात जीवनेच्छा नसेल तर जगणं संपतं आणि कंठणं सुरू होतं. सर्वदूर भरून उरणारी शुष्कता, कोरडेपणा, रखरख, धुळकटपणा बेचैन करणारा आहे. धुळीचे लोट जीवनेच्छा झाकणारे आहेत तर धुक्याचे लोट ही इच्छा जागवणारे आहेत. विहिरीने तळ गाठला की निराशाही तळ गाठते. उन्हाच्या कहरात मातीचीच ढेकळं होतात. ती ढेकळं नव्हे तर इच्छाशक्तीच्या वाटेतले धोंडे असतात. ते फार काळ तुडवावे लागले तर आत्मनिर्धार डळमळू लागतो. मनाची उभारी कच खाऊ लागते. खोलवर सोडूनही रिकाम्या परतणाऱ्या घागरी अवकळा वाढवतात. पण आता हे संपणार आहे. आता तो येतोय...

## ज्ञानी माणसाचं लक्षण

ज्ञान आणि अज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या जगात ज्ञानी व्यक्तींसोबतच अज्ञानी लोकही आहेत. ज्ञानी व्यक्ती आपला प्रत्येक व्यवहार अत्यंत चोख करते. आपल्या कामाची आणि त्याच्या परिणामांची तिला जाणीव असते. दुसरीकडे अज्ञानी लोक कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. अज्ञानी व्यक्तीची बुद्धी कामापासून, आपल्या लक्ष्यापासून दूर पळत असते. अशा लोकांना आपल्या भल्याचा विचार करताच येत नाही. अज्ञानी लोक सतत अर्थहीन गोष्टींमध्ये वेळ घालवताना दिसतात. आपल्याला नेमकं काय हवंय, याचा थांगच त्यांना नसतो. आपलं उद्दीष्ट साध्य न करता आल्याबद्दल ते इतरांना दोष देऊन मोकळे होतात. अज्ञानी लोकांना स्वत:च्या क्षमतांची जाणीवच नसते. त्यांनी तितका वेळ त्यासाठी दिलेला नसतो. तर दुसरीकडे ज्ञानी व्यक्ती स्वत:ला आणि स्वत:च्या क्षमतांना ओळखून पुढे जाण्यासाठी प्रयत्न करत असतात.

प्रत्येक माणसाचा जीवनाकडे, जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन भिन्न असतो. एका व्यक्तीची नजर दुसऱ्याकडे असतेच असं नाही. त्यामुळे प्रत्येकजण आपल्या बुद्धी आणि विचारशक्तीप्रमाणे अंदाज लावत राहतो. अज्ञानी आणि ज्ञानी मनुष्य आपापल्या पद्धतीने जगण्याचं विश्लेषण करत राहतो. अर्थात त्यांच्या विश्लेषणात, जगाला समजून घेण्यात फरक हा असतोच. प्रत्येकासाठी या जगाचा अर्थ वेगळा असतो. कुणाला आनंद लुटायचा असतो तर कुणाला जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. काहींना जीवन म्हणजे संकट वाटतं. पण ज्ञानी लोक आयुष्य सुकर बनवण्यासाठी झटत राहतात. अज्ञानी लोक कशाचीही पर्वा नसल्याने वाट्याला आलेलं आयुष्य जगत राहतात. यात बदल घडवण्याचा प्रयत्न ते कधीही करत नाहीत. बुद्धीमान व्यक्ती जगाकडे नेमक्या कोणत्या नजरेनं बघत असेल? तिच्याकडे कोणती दृष्टी असेल? ती काय विचार करत असेल? सभोवतालच्या घटनांवर अशा व्यक्तींची काय प्रतिक्रिया असेल, याचा विचार आपण केला पाहिजे.

ज्ञान आपल्याला अनेक गोष्टींमधून मिळवता येतं. आयुष्य खूप काही शिकवून जातं. आपल्या आयुष्यातल्या घटना, माणसं ज्ञान देण्यासाठी पुरेशी असतात. त्यातून आपण काही तरी शिकत रहायला हवं. ज्ञान मिळवण्याचा आणि ते साठवून ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. याबाबत एक उदाहरण देता येईल. प्रज्ञावान, ज्ञानसंपन्न व्यक्तीला एकाने सहज एक प्रश्न विचारला. तुम्ही ज्ञानी आहात मग दिवसभर



तुम्ही काय करता? मी झोपतो, उठतो, आंघोळ करतो, जेवतो आणि कामाला जातो, असं उत्तर त्याने दिलं. यात काय नवल, मीही हेच करतो असं प्रश्नकर्त्याने सांगितलं. त्यावर ज्ञानी व्यक्तीने उत्तर दिलं की मी गाढ झोपतो. उठल्यावर मी पूर्णपणे जागृतावस्थेत असतो. आंघोळ करत असताना मला याची संपूर्ण जाणीव असते. जेवताना मी त्याचा आनंद लुटतो आणि काम मनापासून करतो.

**बोध**

मीही हेच करतो. तुम्ही मला मूर्ख समजताय, असं प्रश्नकर्ता म्हणाला. त्यावर ज्ञानी माणसाने सांगितलं, झोपल्यावर तुला स्वप्नं पडतात. उठल्यावरही तू झोपेत असतोस. स्वप्नांच्या जगात रमत असतोस. आंघोळ करताना डोक्यात इतर विचार येत राहतात. जेवताना तुझं डोकं भलतीकडे असतं. काम करताना मेंदू घरीच असतो. एखादं काम करताना त्याकडे तुझं लक्ष नसतं. लक्षपूर्वक काम करणं गरजेचं आहे. प्रत्येक गोष्ट मनापासून करणं, त्याचा आनंद लुटणं हेच ज्ञानी माणसाचं लक्षण आहे. त्यामुळे आपलं चित्त थाऱ्यावर ठेऊन प्रत्येक गोष्ट करायला हवी.

## कथा हनुमानाची



**भक्ती मार्ग**

भारतात हनुमानभक्तांची संख्या खूप मोठी आहे. महाबली हनुमान प्रगाढ स्वामीभक्ती, अजस्त्र ताकद, प्रामाणिकपणा आणि निस्सीम श्रद्धा याचं प्रतीक बनून राहिला आहे. हनुमान चिरंजीव आहे. आपल्याला राम, कृष्णाच्या अवतार समाप्तीच्या कथा माहीत आहेत पण हनुमानासंबंधी अशी एकही कथा पुराणांमध्ये आढळत नाही. म्हणूनच हनुमान आजही जिवंत आहे यावर भक्तांची प्रगाढ श्रद्धा आहे. हनुमानाशी संबंधीत काही पवित्र स्थळांवर भक्तांची अलोट गर्दी पहायला मिळते.

सिमल्याजवळील जाकू मंदिर हे हनुमानभक्तांसाठी कोणत्याही तीर्थक्षेत्रांपेक्षा कमी महत्त्वाचं नाही. रामभक्त हनुमान संजीवनी वनस्पतीच्या शोधात पर्वतावर जाण्याआधी इथे थांबले होते आणि त्याने जाकू नावाच्या ऋषींकडून काही महत्त्वपूर्ण माहिती घेतली होती. हनुमानाने परतताना ऋषींना भेटण्याचं वचन दिलं होतं. पण संजीवनी पोहोचवण्यास उशीर होण्याच्या भीतीने त्याने जवळचा मार्ग अनुसरला. नंतर हनुमानाने जाकू ऋषींची आवर्जून भेट घेतली. या भेटीत हनुमान ज्या जागेवर उभा होता तिथे त्याच्या पायाचा ठसा उमटला होता. आजही आकाराने बराच मोठा असणारा हा ठसा पहायला मिळतो.

कलियुगामध्येदेखील अनेकांना हनुमानाने दर्शन दिलं आहे. तेराव्या शतकातील संत माधवाचार्य यांनी आपल्या आश्रमात हनुमानदर्शन झाल्याचं सांगितलं होतं. इ.स. १६०० मध्ये हनुमानाने तुलसीदासांना दर्शन दिलं आणि रामायण लिहिण्याची प्रेरणा दिली. त्यानंतर समर्थ रामदास स्वामी, राघवेंद्र स्वामी आणि श्री सत्य साईबाबा यांनाही बलाबली हनुमानाचं दर्शन मिळालं असल्याविषयी श्रद्धा आहे.

आजही एका मंत्राद्वारे हनुमानाला आवाहन करता येतं. हनुमान खऱ्या भक्तांच्या सादेला प्रतिसाद देतात असं भाविक मानतात. खुद्द हनुमानानेच आदिवासींना हा मंत्र दिला असल्याचं बोललं जातं. श्रीलंकेतील पिदुरू पर्वतावर निवास असताना त्याने आदिवासींना हा मंत्र दिला होता. लंका सोडताना आपल्याला बोलावू इच्छिणाऱ्या आदिवासींना त्याने हा मंत्र दिला होता. तो असा... कालतंतु कारेचरन्ति एनर मरिष्णु, निर्मुक्तेर कालेत्वम अमरिष्णु... हनुमानभक्तांनी या मंत्राचा भावपूर्वक जप केला तर हनुमान दर्शन होतं अशी श्रद्धा आहे.

## १००१ छिद्रांचं शिवलिंग

देश-विदेशात भगवान शिवाची अनेक मंदिरं आहेत. प्रत्येक मंदिराचं काही ना काही वैशिष्ट्य आहे. काही मंदिरांना पौराणिक कथांचा संदर्भ आहे. मध्य प्रदेशातल्या रीवा शहरात शंकराचं असंच एक अनोखं मंदिर आहे. या मंदिरातल्या शिवलिंगावर १००१ छिद्रं आहेत. १००१ छिद्रं असलेलं जगातलं हे एकमेव शिवलिंग मानलं जातं. शिवलिंगावरच्या छिद्रांचं रहस्य आजही उलगडलेलं नाही. हे स्थान ‘महामृत्यूंजय मंदिर’ या नावाने ओळखलं जातं. हिंदू धर्मात महामृत्यूंजय मंत्राचं मोठं महत्त्व आहे. या मंत्राच्या जापामुळे दीर्घायुष्याचा लाभ होतो. रोग, संकटं टळतात, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे या मंदिरात येणारे भाविक शंकराची मनोभावे पूजा करतात. आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या दीर्घायुष्याची कामना करतात. या शिवलिंगाचं अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ते पांढऱ्या रंगाचं आहे. या शिवलिंगावर ऊन, पावसाचा कोणताही परिणाम होत नाही. आज एवढ्या वर्षांनंतरही ते झिजलेलं नाही. शंकराच्या या मंदिरात स्वत:साठी किंवा आप्तस्वकियांसाठी महामृत्यूंजय मंत्राचा जप केल्याने अकाली मृत्यूचं भय नाहीसं होतं. रोगांपासून मुक्ती मिळते, अशी शिवभक्तांची श्रद्धा आहे.




**अनोखी तीर्थक्षेत्रं**

भगवान शंकर भक्तांच्या सगळ्या मनोकामना पूर्ण करतो. म्हणूनच या मंदिरात येणारा प्रत्येक भाविक इच्छापूर्तीसाठी शंकराची आराधना करतो. मनोकामना पूर्ण झाल्यानंतर मंदिरात नारळ दिला जातो. तसंच शंकराच्या पिंडीवर बेलपत्र अर्पण केलं जातं.

शिवपुराणानुसार भगवान शंकराने महासंजीवनी महामृत्यूंजय मंत्राची रचना केली. शंकराने हा मंत्र गुप्त ठेवला होता. माता पार्वती आणि शिवभक्त व दैत्यांचे गुरू असलेल्या शुक्राचार्यांना शंकराने हा मंत्र सांगितला होता. या मंत्राच्या जापाने शुक्राचार्य राक्षसांना पुन्हा जिवंत करत असत.

## रूपे सूर्याची...

हिंदू धर्मात पाच प्रमुख देवता मानल्या जातात. त्यापैकी एक म्हणजे सूर्य. अनादी काळापासून सूर्याची आराधना होत आली आहे. भविष्यपुराणानुसार सूर्यदेवाला परब्रह्म म्हणजे या जगाचा निर्माता, पालनकर्ता आणि संहारकर्ता मानण्यात आलंय. सूर्यदेवाची अनेक रूपं आहेत. ही तिन्ही कामं पूर्णत्त्वास नेण्यासाठी सूर्याने एकूण बारा रूपे घेतली आहेत. सूर्याच्या या रूपांची मूर्तीस्वरूपात पूजा केली जाते. सूर्याच्या या रूपांबद्दल आणि शक्तींबद्दल जाणून घेऊ या...

* देवराज इंद्र हे सूर्याचंच रूप. इंद्राच्या रूपातला सूर्यदेव दैत्य आणि दानवरूपी दुष्ट शक्तींचा नाश करून शांतता प्रस्थापित करतो.
* धाता हेही सूर्यरूप. धातारूपात तो सृष्टीनिर्मिती करतो.
* पर्जन्यरूपात सूर्य पृथ्वीवर जलधारांची बरसात करतो.
* पूषा रूपात सूर्य मंत्रांमध्ये वास करून संपूर्ण जगाचं पालनपोषण आणि कल्याण करतो.
* सूर्याचं त्वष्टा रूप झाडं, वेली, पानाफुलांमध्ये आणि औषधी वनस्पतींमध्ये वसलेलं असतं.
* अर्यमा रूपात सूर्य संपूर्ण जगात वास करतो. सर्व जगाचं रक्षण करण्याची जबाबदारी अर्यमावर आहे.
* भग रूपात सूर्य पृथ्वी आणि पर्वतांमध्ये विराजमान आहे.
* सूर्याचं विवस्वान हे रूप अग्नीस्वरूपात अन्नाचं पचन करण्यास मदत करतं.
* अंशुरूपात सूर्य चंद्रात वास करतो आणि संपूर्ण जगाला शितलतेची अनुभूती देतो.
* विष्णू रूपात सूर्य अधर्माचा नाश करण्यासाठी प्रत्येक युगात विविध अवतार धारण करतो.
* वरूण रूपात सूर्य समुद्रात वास करतो. वरूण पाण्याच्या माध्यमातून जगाला जीवन देतो.
* मित्ररूपात सूर्य सजिवांच्या मनोकामना पूर्ण करतो.



## चीनच्या मजबूत भिंतीचं गुपित ...


चीनची महाकाय भिंत जगभरात प्रसिद्ध आहे. या भिंतीची गणना जगातल्या आश्चर्यांमध्ये केली जाते. ही भली मोठी भिंत चीनची रक्षक मानली जाते. अनेक वर्षं लोटल्यानंतरही ही भिंत आजही पाय रोवून उभी आहे. चीनमध्ये प्रामुख्याने बौद्ध धर्माचं पालन होत असलं तरी यासोबतच इतर काही धर्मांचे अनुयायीही आहेत. चीनमध्ये पाच धर्मांच्या अनुयायांची संख्या सर्वाधिक आहे. हे सगळे अनुयायी धर्माचं श्रद्धेने पालन करत असल्याने ही भिंत आजही टिकून असल्याचं मानलं जातं. चीनला प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलाय. इथल्या संस्कृतीच्या खुणा सहाव्या शतकाच्या आधीपासून अस्तित्त्वात आहेत. चीनमध्ये आज बौद्ध धर्मासोबतच ताओ, इस्लाम, कॅथलिक आणि ख्रिश्चन या धर्मांचं पालन केलं जातं.

चीनी भाषेची लिपी जगभरात सर्वात पुरातन मानली जाते. चीनमधल्या विविध धर्मांच्या अनुयायांनी आपली प्रगती करून घेतली. त्यामुळे तिथल्या समृद्ध संस्कृतीचा वारसा आजही सांगितला जातो. साधारण चौथ्या शतकानंतर चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार होऊ लागला. चीनमध्ये भाषेनुसार बौद्ध धर्माची तीन विभागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. हान भाषेतला बौद्ध धर्म, तिबेटी बौद्ध धर्म आणि पाली भाषिक बौद्ध धर्म. या तीन भाषा बोलणाऱ्या बौद्ध भिख्खू चीनमध्ये लाखोंच्या संख्येने आहेत. तिबेटी बौद्ध धर्माचं पालन तिबेट, मंगोलिया आणि छिंग हाय प्रांतात केलं जातं. पाली भाषिक बौद्ध धर्माचे अनुयायी दक्षिण-पश्चिम चीनमधल्या युनान प्रांतातल्या शिश्वांगपानना, तेहोंग ताई, चिंगपो आणि सी माओ या प्रांतांमध्ये आढळतात.

**धर्म देशोदेशीचे**

ताओ हा चीनमधला अजून एक धर्म. या धर्माची उत्पत्ती चीनमध्येच झाली. इसवी सन दुसऱ्या शतकापासून या धर्माचं अस्तित्त्व आहे. ताओ धर्मात निसर्गाची, नैसर्गिक शक्तींची आराधना केली जाते. विस्ताराच्या काळात हा धर्म दोन संप्रदायांमध्ये विभागला गेला. चीनमध्ये इस्लाम धर्माचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणावर झालाय. साधारणपणे सातव्या शतकानंतर चीनमध्ये इस्लाम धर्माचा प्रसार झाला. चीनमध्ये इस्लाम धर्माचे अनुयायी लाखोंच्या संख्येने आहेत.

साधारणपणे सातव्या शतकात चीनमध्ये कॅथलिक धर्माने प्रवेश केला. आजघडीला चीनमध्ये कॅथलिक धर्माचे लाखो अनुयायी आहेत. ख्रिश्चन धर्म चीनमध्ये काहीसा उशीरा आला. साधारणपणे एकोणीसाव्या शतकात चीनमध्ये ख्रिश्चन धर्माने प्रवेश केला. चीनमध्ये कोट्यवधी लोक ख्रिश्चन धर्माचं पालन करतात.



## एखाद्याला खूश करण्यासाठी मुलांचे भवितव्य खराब करू शकत नाही

हिंदी सक्तीवर सुप्रिया सुळेंचा संताप



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
हिंदीच्या सक्तीविरोधात राज व उद्धव ठाकरे यांनी मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या मोर्चाला शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानेही पाठिंबा दिला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनीही हिंदीच्या सक्तीवर आपला संताप व्यक्त केला आहे. सरकारने एखाद्याला खूश करण्यासाठी मुलांचे भविष्य खराब करू नये, असे त्या म्हणाल्यात.

सुप्रिया सुळे नागपुरात पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, हा आमच्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक मुद्दा आहे. हा राजकीय मुद्दा नाही. भाषा शिक्षणाचा मुद्दा अत्यंत गांभीयार्ने घेतला पाहिजे. आपण तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पुढे जायला हवे. इतर कोणतेही राज्य आपल्या जनतेवर अशा प्रकारची सक्ती थोपत नाहीत. मग महाराष्ट्र सरकार एवढा आग्रही पवित्रा का घेत आहे? हे मला समजत नाही.

आपण एखाद्याला खूश करण्यासाठी मुलांचे भविष्य खराब करू शकत नाही. आमचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष राज ठाकरे व उद्धव ठाकरे काढत असलेल्या मोर्चात पूर्ण ताकदीने सहभागी होईल. शिक्षण हा आमच्यासाठी अत्यंत गंभीर मुद्दा आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही जोरदार टोला लावला. मी सर्वांना भेटते. त्यात अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांचाही समावेश आहे. भेटीगाठी घेण्यासाठी मी 'हुडी' वगैरे काही घालत नाही. मला ज्यांना भेटायचे आहे त्यांच्याशी दिलखुलास भेटते. फोटो ट्विट करते. आमच्यात काही लपवाछपवी नसते, असे सांगत सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्यांना टोला हाणला.

मला फक्त मुख्यमंत्री फडणवीस भेट देत नाहीत. ही माझी तक्रार आहे. आज ते नागपूरमध्येच असल्याचे कळते. तुम्हाला भेटले की माझी तक्रार त्यांच्या कानावार घाला. मला त्यांच्यासोबत काही विषयांवर बोलायचे आहे. हिंदी भाषेचा प्रश्न, शेतकऱ्यांची कर्जमाफी, तेली समाजाचा प्रश्न असे काही विषय आहेत.

मुख्यमंत्री दरवर्षी संसदेचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सर्व खासदारांशी संवाद साधतात. पण गत दोन अधिवेशनापासून मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलावली नाही. माझ्यावतीने तुम्ही त्यांना खासदारांची बैठक बोलावण्याची विनंती करा, अशी मिश्किल टीप्पणीही त्यांनी यावेळी केली.

जयंत पाटील भाजपत जाण्याची चर्चा आहे. याविषयी पत्रकारांनी सुप्रिया सुळे यांना छेडले असता, त्यांनी पत्रकारानांच उलटप्रश्न करत त्यांना घेरण्याचा प्रयत्न कलो. जयंत पाटलांनी भाजपमध्ये येण्यासाठी अप्लिकेशन केले आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### त्रिभाषा सूत्राआडून मराठीला डावलण्याचा प्रयत्न - जयंत पाटील



दुसरीकडे, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना ५ तारखेच्या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. राज्य सरकार महाराष्ट्रात जी हिंदी सक्ती लादू इच्छित आहे त्याविरोधात ५ जुलै रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. प्रत्येक मराठी माणसाने या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन मी करत आहे.

कुणाचाही विविध भाषा शिकण्याला किंबहुना हिंदी भाषेलाही विरोध नाही. पण इयत्ता पहिलीपासूनचं प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून व्हावं असा आग्रह आहे. जो योग्य आहे आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्ष म्हणून आमचीही हीच भूमिका आहे. शैक्षणिक धोरणाच्या त्रिभाषा सूत्राआडून मातृभाषेला डावलण्यासाठी प्रयत्न होत असतील तर मराठी माणूस एकदिलाने त्याचा विरोध करणार. महाराष्ट्र हिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचं स्पष्ट धोरण आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## शासनाच्या प्रत्येक बाबींमध्ये न्यायालयांचा हस्तक्षेप नको

### सरन्यायाधीश भूषण गवई यांचे स्पष्ट प्रतिपादन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
नागपूर जिल्हा वकील संघटनेच्यावतीने काल, शुक्रवारी सिव्हिल लाईन्स जिल्हा न्यायालय परिसरात सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात सरन्यायाधीश भूषण गवई यांनी न्यायालयीन सक्रियतेवर अतिशय महत्त्वपूर्ण भाष्य केले. सत्कार सोहळ्यात मंचावर सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपांकर दत्ता, न्या. प्रसन्ना वराळे, न्या.अतुल चांदूरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराध्ये, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्या. नितीन सांबरे, न्या. अनिल किलोर, न्या. अभय मंत्री, प्रमुख जिल्हा न्यायाधीश दिनेश सुराणा आणि गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई आणि पत्नी तेजस्विनी गवई उपस्थित होत्या.

न्यायिक सक्रियता कायम राहावी, या मताचा आहे, मात्र संविधानाने कार्यपालिका, विधीमंडळ, न्यायपालिकेला सीमा आखून दिल्या आहेत. त्यामुळे न्यायपालिकेने प्रत्येक बाबीमध्ये हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही, असे परखड मत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केले.

न्या.गवई पुढे म्हणाले, राज्यघटनेनुसार सर्व संस्थांनी काम करणे अपेक्षित आहे. न्यायपालिकेची सक्रियता हे संवैधानिक मूल्ये टिकविण्यासाठी गरजेचे आहे. मात्र याचे रुपांतर दुसऱ्या कोणत्या बाबीमध्ये होऊ नये.

यावेळी गवई यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बनण्यापूर्वीचा किस्सा सांगितला. न्यायमूर्ती बनण्यात दोन-तीन वषार्चा विलंब झाल्यामुळे त्यांनी सर्वोच्च न्यायालयात वकीली सुरू करण्याचा विचार केला होता. मात्र वकीलांनी यासाठी नकार दिला. वकील बनशील तर केवळ पैसे कमावशील, न्यायमूर्ती झाला तर आंबेडकरांनी सांगितलेल्या सामाजिक न्यायासाठी काम करता येईल. या सल्ल्यामुळे ते आज सरन्यायाधीशपदापर्यंत पोहोचू शकले असल्याची आठवण न्या.गवईंनी ताजी केली.

न्या. दीपांकर दत्ता यांनी सरन्यायाधीश पदी गवई यांची नेमणूक अभिमानाची बाब असल्याची भावना व्यक्त केली. न्या. गवई त्यांच्या कार्यकाळात न्याय क्षेत्राला नव्या उंचीवर नेतील अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

न्या. आलोक आराध्ये म्हणाले, ह्यगवई यांच्या निर्णयाचे परीघ फार विस्तीर्ण आहे. टायगर कॉरिडॉर ते बुलडोझर जस्टिस असे अनेक लोकहिताचे निर्णय न्या. गवई यांच्या निर्णयातून दिसून येतात.

न्या. अतुल चांदूरकर यांनी सांगितले, नागपूर जिल्हा वकील संघटनेचा दीडशे वर्षांचा गौरवशाली इतिहास राहिलेला आहे. संघटनेच्या या प्रवासात न्या. गवई यांचे अमूल्य योगदान आहे. विधी क्षेत्राच्या हितासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्या. प्रसन्ना वराळे यांनी नागपूरचा रक्तिविहीन क्रांतीची भूमी म्हणून उल्लेख केला. डॉ. आंबेडकर यांनी या क्रांतीच्या माध्यमातून दिलेल्या तथागत बुद्धाच्या धम्मातील प्रज्ञा आणि करुणा न्या. गवई यांच्या व्यक्तिमत्वातून प्रतिबिंबित होते, असे न्या. वराळे म्हणाले.

## शिक्षण संस्था सचिवासह शिक्षकांना चार दिवसांची पोलीस कोठडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
बोगस शालार्थ आयडी तयार करून शिक्षकपदी नियुक्ती केल्याप्रकरणी सदर पोलिसांनी अटक केलेल्या चेतक राजेश डोंगरे (४४), सदानंद कोठीराम जांगडे (४५) आणि गंगाधर नत्थू डोंगरे सर्व रा. गोसे बु. (पवनी), भंडारा यांना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपींना चार दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

या आरोपींनी या घोटाळ्याचा मुख्य आरोपी महेंद्र म्हैसकर याच्यासोबत कट रचून आर्थिक गैरव्यवहार केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. गोसे बु. (ता. पवनी) येथील विनोद शिक्षण संस्था, विनोद हायस्कूल व कनिष्ठ कला, विज्ञान महाविद्यालयाचा मुख्य सचिव चेतक डोंगरे याला मुख्य सचिव व मुख्याध्यापक पदाचा कार्यभार देण्यात आला. तसेच चेतकचा काका गंगाधर हा याच संस्थेत सचिव म्हणून आहे.

राजेश डोंगरेने २०१८ मध्ये सदानंद जांगडे याची शिक्षकपदी नियुक्ती करण्यासाठी वैयक्तिक प्रस्ताव विभागाला पाठविला. बोगस आयडी तयार करून त्याला शिक्षकपदी नियुक्ती देण्यात आली.

मात्र, शिक्षण उपसंचालक कार्यालयात सदानंद जांगडे याचा प्रस्तावच नाही. तशी आवक-जावकमध्ये कुठेच नोंद नाही, तर मग त्याची शिक्षक पदी नियुक्ती कशी केली? सदर पोलिसांनी म्हैसकरला अटक केल्यानंतर त्याच्याकडून अनेक शिक्षण संस्थांची कागदपत्रे जप्त केली होती. त्यातील विनोद शिक्षण संस्थेचा अहवाल सदर पोलिसांना प्राप्त झाला.

त्याच अहवालावरून सदरचे ठाणेदार मनीष ठाकरे आणि त्यांच्या पथकाने गोसे येथे जाऊन मुख्य सचिव, सचिव आणि बोगस शिक्षकाला अटक केली. आरोपी चार दिवस कोठडीत राहणार आहेत. शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा पार्वता राजेश डोंगरे (७५) यांना अद्याप पोलिसांनी अटक केलेली नाही. बोगस शिक्षकांच्या नियुक्तीबाबत पार्वता डोंगरे यांनीच निर्णय घेतला होता. त्यामुळे बोगस शिक्षकांच्या भरतीस पार्वता डोंगरे जबाबदार असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे

## कर्जमाफीची तारीख पांडुरंगाला तरी सांगा...



बच्चू कडूंचा टोला

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :
येत्या ६ जुलैला आषाढी एकादशी आहे. सर्व भाविक विठुरायाच्या चरणी नतमस्तक होतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या दिवशी काही तरी बोलले पाहिजेत, याची प्रतीक्षा करीत आहोत. किमान त्यांनी पांडुरंगाला तरी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची योग्य तारीख सांगितली पाहिजे, असा टोला बच्चू कडू यांनी लगावला आहे.

बच्चू कडू म्हणाले, योग्य वेळी कर्जमाफी दिली जाईल, असे मुख्यमंत्र्यांचे म्हणणे आहे. आता योग्य तारीख कोणती हे त्यांनी पांडुरंगाला तरी सांगावी, असे आमचे म्हणणे आहे. शेतकरी दररोज आत्महत्या करीत आहेत. ६ जुलैला मुख्यमंत्र्यांनी ती योग्य तारीख जाहीर करावी, अशी आमची विनंती आहे.

शेतकरी, शेतमजूर, विधवा, दिव्यांग, बेरोजगार तरुण, ग्रामपंचायत कर्मचारी, मेंढपाळ, मच्छिमार आणि मागासवर्गीय घटकांच्या न्याय हक्कांसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात सातबारा कोरा करा ही १३८ किलोमीटरची पदयात्रा ५ जुलै पासून सुरू होणार होती. पण, ६ जुलैच्या आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर ही पदयात्रा आता ७ जुलैपासून सुरू होणार आहे.

आम्ही ७ तारखेपासून ते १४ तारखेपर्यंत आमची पदयात्रा चालणार आहे. येत्या २ ऑक्टोबरच्या लढ्यासाठी ही तयारी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू होईल, असे काही लोकांचे म्हणणे होते, पण सरकारला फेब्रुवारी महिन्यात निवडणुका घ्यायच्या आहेत, असे वाटते.

आम्ही सरकारकडे शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांच्या प्रश्नांवर मागण्या केल्या आहेत. त्या एकट्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या मागण्या नाहीत. त्या सर्वसामान्यांच्या आहेत. सरकारने त्या पूर्ण केल्या पाहिजेत, असे बच्चू कडू म्हणाले.

हिंदी सक्तीविरोधात शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या ५ जुलै रोजीच्या मोर्चात सहभागी होण्याची विनंती बाळा नांदगावकर यांनी आपल्याला केली. ५ जुलैला आम्ही या मोर्चात जाण्याचा प्रयत्न करू. आमचा मोर्चाला पाठिंबा असल्याचे कडू म्हणाले.

## राज्यातील पोलीस दलात मोठी खांदेपालट ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई/ नागपूर, दि. २८ :
राज्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका सुरूच आहे. १५ दिवसांपूर्वी ८ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यानंतर, ८ दिवसांपूर्वी ४ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या.

आएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांनंतर आता एकाचवेळी तब्बल ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, हिंगोली, धुळे अशा प्रमुख शहरांतील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

पोलिस दलातील या बदल्यांमध्ये काही अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे, तर काहींची डिमोशनसह बदली झाली आहे. बदल्यांच्या या आदेशानुसार, पुणे शहरातील शस्त्र निरीक्षक शाखेच्या पोलिस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांची बदली राज्य राखीव पोलिस बल, पुणे (गट क्रमांक १) येथे समादेशकपदी करण्यात आली आहे. तर, महेंद्र पंडित यांची स्तंभ २ मधून स्तंभ ३ मध्ये बदली झाली असून, बृहन्मुंबई पोलिस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबईत पाच आयपीएस अधिकाऱ्यांची पोलिस उपायुक्त पदावर पदोन्नती झाली असून, त्यामध्ये तुषार पाटील, विजय पवार, सुनिल लोखंडे, नम्रता पाटील आणि स्मिता पाटील यांचा समावेश आहे.

पुण्यातील वाहतूक पोलिस उपायुक्त अमोल झेंडे आणि परिमंडळ दोनच्या पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील यांची देखील बदली करण्यात आली असून, स्मार्तना पाटील यांना पोलिस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा येथे नियुक्ती देण्यात आली आहे. सरकारच्या नव्या बदली आदेशान्वये पुण्यामध्ये तीन नव्या आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

### विदर्भातील अनेकांच्या बदल्या

विदर्भातील अनेक आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत . नागपूर शहरातील विशेष शाखेच्या उपायुक्त श्वेता खेडकर यांची पिंपरी चिंचवड येथे उपायुक्त म्हणून बदली झाली आहे . राज्य गुप्त वार्ता विभाग मुंबईचे निलेश मोरे यांची भंडारा येथे अप्पर अधीक्षक पदी बदली झाली असून, भंडारा येथील कातकडे यांना चंद्रपूर येथे पाठविण्यात आले आहे .चंद्रपूर येथे कार्यरत रीना जनबंधू यांना नागपूर येथे राज्य गुप्तवार्ता विभागाच्या उपायुक्तपदी पदस्थापना देण्यात आली आहे . नागरी हक्क संरक्षण कक्ष नागपूरचे अधीक्षक सदाशीव वाघमारे यांची वर्धा येथे अप्पर अधीक्षकपदी बदली करण्यात आली आहे .

## महापारेषण अधिकाऱ्यांची कानउघाडणी

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :
मी ऊर्जा खात्याचा पाच वर्ष मंत्री होतो, त्यामुळे मला या विभागातील खडानखडा (वायर आणि वायर) माहिती आहे. मला थातूरमातूर माहिती देऊ नका, माहीत नसेल तर थेट नाही म्हणून सांगा, अशा शब्दात महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

येथील प्रकाश-सरिता इमारतीत त्यांनी महावितरण व महापारेषण अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला आ. प्रताप अडसड, आ. उमेश यावलकर, आ. प्रवीण तायडे, आ. राजेश वानखडे, महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके तथा महापारेषणचे मुख्य अभियंता जयंत विके यांच्यासह सर्व त्रउर्वरित. पान ४ बडनेरालगत महावितरणच्या जागेत १.४ मेगावॅटचा प्रकल्प मागील सव्वा तीन वर्षांपासून बंद आहे, ही बाब दैनिक दिव्य मराठीने समोर आणली आहे. आजच्या बैठकीत पालकमंत्र्यांनी याबाबत महावितरण अधिकाऱ्यांनाही विचारणा केली. तसेच हा प्रकल्प तीन वर्षांपासून बंद आहे, ही बाब मुख्यमंत्र्यांना कळली तर काय होईल, याची कल्पना तुम्हाला आहे का? अमरावतीत असलेली ही स्थिती चांगली नाही, असेही पालकमंत्र्यांनी म्हटले.

या प्रकरणात पालकमंत्र्यांनी तत्काळ मुख्यमंत्र्यांसोबत फोनवरून चर्चा करण्याचा प्रयत्नसुद्धा केला. महापारेषणच्या अधिकाऱ्यांना पालकमंत्र्यांनी विचारले की, ड्रोन सर्व्हे पूर्ण का केला नाही. त्यावर महापारेषणचे अधिकारी म्हणाले आमच्याकडे असलेल्या ड्रोनच्या बॅटरीचे बॅकअप २० मिनिटेच आहे. पालकमंत्र्यांनी महापारेषणचे सीएमडी संजीवकुमार यांना कॉल करून अडचणी सांगितल्या.

## सरकार वीज पुरवठ्याचे खासगीकरण करणार?

### महावितरणला 'पर्याय' देण्याचे धोरण उधळून लावणार, ॲड. आंबेडकरांचा रस्त्यावर उतरण्याचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी वीज पुरवठ्याच्या कथित खासगीकरणाविरोधात रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे. खासगी कंपन्यांना वीज पुरवठा करण्याचा परवाना दिल्यास वंचित बहुजन आघाडी त्याविरोधात रस्त्यावर उतरणार, असे ते म्हणालेत. त्यांच्या या भूमिकेमुळे भविष्यात हा मुद्दा सरकारला चांगलाच पोळण्याची चिन्हे आहेत.

प्रकाश आंबेडकर शनिवारी या प्रकरणी म्हणाले की, खासगी कंपन्यांना समांतर वीजपुरवठा परवाना दिल्यास वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरणार. राज्यात अदानी व टोरंट कंपनीकडून अनेक शहरांत वीज वितरणाच्या परवान्यासाठी अर्ज केलेत. खासगी कंपन्यांना वीजपुरवठा परवाना हा वीज मंडळाच्या खाजगीकरणाची सुरुवात असून सरकारने हे समांतर परवाने देऊ नये. अन्यथा या खाजगीकरण धोरणाविरोधात वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरेल.

राज्यात समांतर वीज परवाना, स्मार्ट मीटर योजना, २०० कोटींच्यावरील महापारेषणचे प्रकल्प टी.बी.सी.बी. पद्धतीने देण्याबाबतच्या धोरणांचे महावितरण व महापारेषण कंपनीचे खासगीकरण केले जात आहे.

महावितरणनेही मुंबई शहरातील कुलाबा माहिम, बांद्रा, दहीसर अशा एकूण १३ क्षेत्रात वीज वितरणासाठी परवाना अर्ज दाखल केला आहे. याला वंचित बहुजन आघाडीचा विरोध आहे.

विद्युत क्षेत्रातील विविध कामगार संघटनांचे एकत्रित संघटन असलेल्या महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रसिटी वर्कर्स फेडरेशन कडून महावितरणसह शासनाला राज्यव्यापी संपाचा इशारा देण्यात आला. त्याला वंचित बहुजन आघाडीचा पाठिंबा राहणार असून महावितरणच्या खासगीकरणाचे हे धोरण हाणून पाडण्यासाठी वर्कर्स फेडरेशनने महाराष्ट्रात आंदोलन करीत असल्यास त्याला पाठिंबा आणि कायदेशीर मदत करू. मुंबई, ठाणे, नागपूर, पुण्यातही महावितरणला 'पर्याय' उभा करण्याचे सरकारी धोरण यशस्वी होऊ दिले जाणार नाही, असे आंबेडकर म्हणाले.

## अतिवृष्टीग्रस्त मेहकरमध्ये साथरोग : आरोग्य विभागाची गावभेट

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २८ :
गेल्या दोन दिवसात झालेल्या पावसात सर्वाधिक अतिवृष्टी मेहकर तालुक्यातील ११ गावात झाली आहे. या अतिवृष्टीमुळे साथरोग बळावण्याची शक्यता आरोग्य विभागाने व्यक्त केली आहे.

त्या आधीच जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे वतीने अतिवृष्टी झालेल्या गावांना भेटी देत पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीची पाहणी करण्यात आली.भेटी दरम्यान विहिरी, जलशुद्धीकरण केंद्र पाहणी करून उघड्यावर शौचास न बसण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

जिल्हा सर्वेक्षण अधिकारी डॉ प्रशांत तांगडे यांनी मेहकर येथील तालुका आरोग्य अधिकारी अभिजीत पाटील यांची भेट घेऊन माहिती घेतली. यामध्ये ११ गावात पुरस्थिती उद्भवल्याची माहिती मिळाली. या गावांमध्ये दैनंदिन सर्व्हेक्षण, साथरोग प्रतिबंधात्मक उपाय योजना युद्धपातळीवर राबवण्याच्या तसेच शीघ्र प्रतिसाद पथक २४ तास कार्यान्वित ठेवण्याचे तसेच औषधसाठा उपलब्ध ठेवावा, असे आदेश देण्यात आले आहेत.

## प्रसिद्ध सॅक्सोफोन वादक इकबाल दरबार यांचे निधन

### उभे राहून दिली होती दिलीपकुमार यांनी दाद



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २८ :
जुन्या पिढीतील नामवंत, ऑर्केस्ट्रा विश्वातील प्रसिद्ध सॅक्सोफोन वादक आणि 'दरबार बँड' चे संस्थापक-संचालक इकबाल दरबार यांचे निधन झाले आहे. ते ७७ वर्षांचे होते.त्यांच्या मागे तीन मुले, एक मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे

ऑर्केस्ट्रा ही संकल्पना महाराष्ट्रात रुजवणाऱ्या काही मोजक्या कलावंतांमध्ये दरबार यांचा मानाचा उल्लेख होतो. त्यांच्या वादनाचे चाहते केवळ पुणे-मुंबईपुरते मर्यादित नव्हते तर बॉलिवूडमधील अनेक दिग्गज कलाकारही त्यांच्या वादनाने भारावून जात असत.

पुणे महानगरपालिकेत आयोजित एका कार्यक्रमात, ज्यात दिलीपकुमार यांचा सन्मान करण्यात आला होता, त्या वेळी 'मधुबन में राधिका नाचे रे' हे गीत इकबाल दरबार यांनी सॅक्सोफोनवर सादर केले. त्यांच्या त्या सादरीकरणाने दिलीपकुमार इतके भारावून गेले की त्यांनी उभे राहून त्यांना मानवंदना दिली आणि 'वन्स मोअर' ची मागणी केली.

इकबाल दरबार यांचे कार्य केवळ संगीतपुरते मर्यादित नव्हते. सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सेवाभाव ही त्यांच्या कार्यशैलीची खास वैशिष्ट्ये होती. दरवर्षी पुण्याच्या दगडूशेठ हलवाई गणपती विसर्जन मिरवणुकीची सुरुवात त्यांच्या दरबार बँडद्वारे सादर केलेल्या आरतीनेच होत असे. हे केवळ परंपरेचे नव्हे, तर समाजाशी असलेल्या त्यांच्या नात्याचे प्रतीक होते.

त्यांनी सीमेवर जाऊन आपल्या वादनाने भारतीय जवानांचे मनोरंजन केले आणि त्या कार्यक्रमातून मिळालेला निधी कृतज्ञता निधी म्हणून सैन्याला दिला. तसेच 'भोई फाउंडेशनच्या' 'पुण्याजागर' उपक्रमासाठीही त्यांनी कृतज्ञता निधी दिला होता.

त्यांनी स्थापन केलेल्या 'मोहम्मद रफी आर्ट फाउंडेशन'च्या माध्यमातून गरजू कलाकारांना वैद्यकीय आणि आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी ते झटत होते. बँडमधील कलाकार व्यसनमुक्त व्हावेत यासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांना योग्य वैद्यकीय मदत मिळावी यासाठीही ते अहोरात्र झटले.

## ताडोबा प्रकल्पातील व्याघ्रदर्शन महागले



■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २८ :
व्याघ्रप्रकल्पातील सफारी सर्वसामान्यांसाठी कधीच परवडणारी नव्हती. त्यानंतरही केवळ व्याघ्रदर्शनासाठी म्हणून कसेबसे पैसे जमवून हे सर्वसामान्य नागरिक ताडोबात येत होते.

मात्र, आता पुन्हा ही सफारी महागली आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातील बफरच नाही तर गाभा क्षेत्रातही सफारी करणाऱ्या पर्यटकांना आता अतिरिक्त पैसे मोजावे लागणार आहेत.

ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाने जागतिक पर्यटन नकाशावर नाव कोरले आहेत. भारतातीलच नाही तर भारताबाहेरील पर्यटकांसाठी हा व्याघ्रप्रकल्प पहिली पसंती आहे. यात सेलिब्रिटीचा समावेश देखील आहे. सहज होणाऱ्या व्याघ्रदर्शनामुळे वन्यजीव छायाचित्रकारांची देखील गर्दी या व्याघ्रप्रकल्पात होते.

मात्र, आता या व्याघ्रप्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातच नाही तर बफर क्षेत्रात देखील सफारी करणाऱ्या पर्यटकांना हजार रुपये अतिरिक्त शुल्क मोजावे लागणार आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातील पर्यटनाच्या नव्या दरपत्रकानुसार आता गाभा क्षेत्रात पर्यटनासाठी आठ हजार ८०० रुपये मोजावे लागणार आहेत. तर सुटीच्या दिवशी म्हणजेच शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी १२ हजार ८०० रुपये सफारीसाठी मोजावे लागणार आहेत.

सफारीच्या एक ते ५९ दिवसाआधी पर्यटनासाठी नोंदणी केल्यास आठवड्याच्या दिवशी ५८०० रुपये आणि आठवड्याच्या शेवटी ६८०० रुपये इतका खर्च येणार आहे. येत्या १ जुलैपासून ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील पर्यटन तीन महिने बंद असणार आहे. त्यानंतर १ ऑक्टोबरला पर्यटकांसाठी गाभा क्षेत्रातील सफारी सुरू होणार आहे. त्यानंतरच हे नवे दर लागू होणार आहेत.

दरम्यान, बफर क्षेत्रातील पर्यटन शुल्कात देखील वाढ झाली असून येत्या एक जुलैपासूनच ही दरवाढ लागू होणार आहे. सहा हजार रुपये त्यासाठी आकारण्यात येणर आहेत. तर आठवड्याच्या शेवटी शनिवार आणि रविवारी तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सात हजार रुपये शुल्क आकारले जाणार आहे. व्याघ्रप्रकल्पाच्या ह्यमायताडोबाह्न या संकेतस्थळावर देखील हे नवे दर प्रदर्शित करण्यात आले आहेत.

येत्या १ जुलैपासून पावसाळ्यात गाभा क्षेत्र पर्यटनासाठी बंद राहणार आहेत. तर एक ऑक्टोबरपासून पुन्हा ते खुले होणार आहेत. यादरम्यान बफर क्षेत्रातील आगरझरी, देवाडा, जुनोना, कोलारा चौरदेव, बेलारा, अलिझंझा, नवेगाव बफर हे क्षेत्र पर्यटनासाठी खुले राहणार आहे, असे ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. प्रभुनाथ शुक्ल यांनी कळवले आहे.